मराठी समाजशास्त्र परिषद – व्यक्ती परिचय ग्रंथ

संपादक : डॉ. राहुल भगत

मराठी समाजशास्त्र परिषद

व्यक्ती परिचय ग्रंथ

संपादक

डॉ. राहुल भगत

मराठी समाजशास्त्र परिषद

व्यक्ती परिचय ग्रंथ

संपादक

डॉ. राहुल भगत

प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख,
एस. एन. मोर कला, वाणिज्य व श्रीमती जी. डी. सराफ
विज्ञान महाविद्यालय, तुमसर जि. भंडारा ४४१९१२.

मराठी समाजशास्त्र परिषद : व्यक्ती परिचय ग्रंथ
Marathi Samajshastra Parishad: Vyakti Parichay Granth.

प्रकाशक:
डॉ. नारायण कांबळे,
अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद.

संपादक:
डॉ. राहुल भगत,
प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख,
एस. एन. मोर कला, वाणिज्य व श्रीमती जी. डी. सराफ
विज्ञान महाविद्यालय, तुमसर जि. भंडारा – ४४१९१२.

आवृत्ती: मार्च, २०२१.

सर्वाधिकार:
अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद,
नोंदणी क्र. महाराष्ट / २७–८३ औरंगाबाद.

ISBN: 978-81-923377-5-3

अक्षर जुळवणी:
दर्शन कम्प्युटर, तुमसर.

मुद्रक:
आस्था प्रिंटस्, नागपूर.

मराठी समाजशास्त्र परिषदेच्या सदस्यांसाठी विनामूल्य.

अनुक्रमणिका

अ. क्र. पृष्ठ क्रमांक

१. प्रस्तावना ..... डॉ. उत्तमराव भोईटे ... १

२. दोन शब्द.... डॉ. नारायण कांबळे ... ३

३. संपादकीय..... ... ५

४. मराठी समाजशास्त्र परिषदेची वाटचाल.... १९८३ ते २०२० ... ७

५. मराठी समाजशास्त्र परिषदेच्या समाजशास्त्र संशोधन पत्रिकेचा प्रवास १९८७ ते २०२० ... ३४

६. महाराष्ट्रातील समाजशास्त्राच्या विकासात दिवंगत समाजशास्त्रज्ञांचे योगदान..... ... ४३

७. महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांचे समाजशास्त्राच्या विकासातील योगदान.... ... ५३

८. महाराष्ट्रातील विद्यापीठे व महाविद्यालयांतील समाजशास्त्र विषयाचे अभ्यासक ... ... ५८ ते १४९

९. परिशिष्टे : –

अखिल भारतीय समाजशास्त्र परिषदेतर्फे जीवन गौरव पुरस्कार प्राप्त महाराष्ट्रातील समाजशास्त्राचे प्राध्यापक... ... १५०

मसप जीवन गौरव पुरस्कार प्राप्त महाराष्ट्रातील समाजशास्त्राचे प्राध्यापक... ... १५१

मसप चे अध्यक्ष, सचिव व कोषाध्यक्षांचा कार्यकाळ : १९८३–२०२०... ... १५२

समाजशास्त्र संशोधन पत्रिका: संपादक व कार्यकारी संपादक १९८७ ते २०२० ... ... १५३

मसप कार्यकारिणी २०१८ ते २०२० ... ... १५४

मसप कार्यकारिणी २०२० पासून १५५

मराठी समाजशास्त्र परिषदेची २०२० पर्यंत झालेल्या अधिवेशाचे स्थळ, दिनांक, संयोजक ... १५६

छायांकित मराठी समाजशास्त्र परिषद..... ... १५८ ते १६८

महाराष्ट्रातील विविध विद्यापीठे व महाविद्यालयांतील समाजशास्त्र विषयांचे अभ्यासक

अ

१. अवचट विद्या ... ५८
२. अवचार बळीराम परशराम ... ५८
३. अवचार स्मिता ... ५८
४. अवचार अमोल आदिनाथ ... ५९
५. अन्सारी शफीफा परवीन गफार ... ५९
६. अहिरे किशोर प्रताप ... ५९
७. अहिरे प्रतिभा भारत ... ५९

आ

८. आगलावे प्रदीप नागोराव ... ६०
९. आगलावे सरोज प्रदीप ... ६०
१०. आत्राम विठ्ठल शामराव ... ६१
११. आचार्य राजा धोंडिबा ... ६१

इ

१२. इंगोले कमलकिशोर बापूराव ... ६१
१३. इंगोले प्रणाली नारायणराव ... ६१

उ

१४. उबंरकर दिनकर एकनाथ ... ६२
१५. उकरंडे शिवाजी अशोक ... ६२
१६. उराडे दिवाकर हरीजी ... ६२

अं

१७. अंबुलगेकर कैलास गंगाधर ... ६२
१८. अंबोरे प्रदीप लक्ष्मणराव

क

१९. कढव गजेंद्र माणिकराव ... ६२
२०. कमला गणेश ... ६३
२१. कनकदंडे श्वेतांबरी प्र. ... ६३
२२. कनकदंडे मोहिनी शोभा प्रकाश ... ६३
२३. करवा जे. पी. ... ६३
२४. कराडे जगन ... ६३
२५. कराडे सुजाता जगन ... ६४
२६. करे बिभीषण दत्तात्रय ... ६४
२७. कऱ्हाड सुवर्णा भारत ... ६४
२८. कंधारे नंदा पंढरीनाथ ... ६५
२९. कांबळे स्निग्धा राजेश ... ६५
३०. कांबळे भरत मसाजी ... ६५
३१. कांबळे प्रविण मानसिंग ... ६५
३२. कांबळे रमेश ... ६५
३३. कांबळे राजेंद्र जनार्दन ... ६६
३४. कांबळे संभाजी शंकर ... ६६
३५. कांबळे संजयकुमार ... ६६
३६. कांबळे चंद्रकांत धनाजी ... ६६
३७. कांबळे नारायण तुकाराम ... ६७
३८. कांबळे–जगतकर अर्चना राजकुमार ... ६७
३९. कांबळे वसंत निवृत्ती ... ६७
४०. कांबळे सी. टी. ... ६७
४१. कांबळे एन. आर. ... ६८
४२. कांबळे दत्ता दौलाजी ... ६८
४३. काळे संपत चंद्रभान ... ६८
४४. काळे आनंदा भिकुजी ... ६८
४५. काळे खंडू संभाजी ... ६८
४६. काळे रेवणनाथ भिका ... ६९
४७. कावळे बी. एन. ... ६९
४८. कावरे संतोष अ. ... ६९
४९. कोळेकर संजय ... ६९
५०. कोते अंगद व्यंकटराव ... ६९
५१. कोल्हे मारोती विठ्ठलराव ... ६९
५२. कोसे तुळसीदास शामराव ... ७०
५३. कुमावत रामचंद्र गोविंद ... ७०
५४. कुंभार समाधान लोटन ... ७०
५५. कुंभारे संजय श्रीहरी ... ७०
५६. कुंभारे महेंद्र नारायणजी ... ७०
५७. कुकडे सुनिता जगन्नाथराव ... ७०
५८. कुकलारे नंदकुमार भिमराज ... ७१
५९. कुलकर्णी शालीनी बंसीधरराव ... ७१
६०. कुलकर्णी प्रभाकर काशिनाथ ... ७१
६१. कुमरे दिलीप दामूजी ... ७१
६२. किर्दक बी. एच. ... ७१
६३. केंद्रे बालाजी एन. ... ७१

ख

६४. खडके सुधा मुरलीधर ... ७२
६५. खर्चे जसश्री विनय ... ७२
६६. खंदारे शाम एस. ... ७२
६७. खंडारे राहुल सारंगधर ... ७३
६८. खंडागळे चंद्रकांत रघुनाथ ... ७३
६९. खोब्रागडे भाऊराव नत्थुजी ... ७३
७०. खाडे श्रीराम किसनराव ... ७३
७१. खाडे अनुराधा एम. ... ७३
७२. खंडेराव प्रसेनजीत हरीश ... ७४
७३. खेडकर विनोद बाबासाहेब ... ७४
७४. खैरनार दिलीप रामदास ... ७४

ग

७५. गगनग्रास ज्योती सुहास ... ७५
७६. गडकरी मंगला आय. ... ७५
७७. गडवाल अे. रहीम अे. मुजीब ... ७५
७८. गडमे अंगद मनोहर ... ७५
७९. गव्हाणे–गोटे शुभांगी ... ७६
८०. गजभिये प्रदीप हरीश्चंद्र ... ७६
८१. गायकवाड मारोती मल्हारी ... ७७
८२. गायकवाड शिवाजी पांडुरंग ... ७७

८३. गायकवाड विलास माणिकराव ... ७७
८४. गायकवाड श्रीकांत ... ७७
८५. गायकवाड अनिता ... ७८
८६. गायकवाड प्रभाकर काशिनाथ ... ७८
८७. गायगोळ सुनिल प्रल्हाद ... ७८
८८. गाडेकर अनिल म्हाळाप्पा ... ७८
८९. गादेवार लिना विलास ... ७८
९०. गावंडे अमरिश श्रीकृष्ण ... ७८
९१. गावंडे अनिल रामचंद्र ... ७९
९२. गांधी बानायत ... ७९
९३. गांगुर्डे संतोष गोविंद ... ७९
९४. गिरी सुर्यकांत अनुरथ ... ७९
९५. गोखले सुजाता ... ७९
९६. गोरे भागवत दगडूबा ... ७९
९७. गोरे संदिप रामराव ... ७९
९८. गोडगे अंकुश मच्छिंद्रराव ... ८०
९९. गुंजाळ संग्राम विठ्ठलराव ... ८०
१००. गुप्ता अनिलकुमार हनुमानदास ... ८०

घ

१०१. घोडके यादव रावसाहेब ... ८०
१०२. घोडगे ज्ञानेश्वर धर्माजी ... ८०
१०३. घोडेस्वार प्रवीण ... ८१
१०४. घोगरे किशन काशिनाथ ... ८१
१०५. घाटुर्ले विलास काशिनाथजी ... ८१
१०६. घेज्जी विजय कल्लप्पा ... ८१

च

१०७. चढढा गिता ... ८१
१०८. चव्हाण दिलीप सवाईराम ... ८२
१०९. चव्हाण विठ्ठल गोपा ... ८२
११०. चव्हाण विलास बळीराम ... ८२
१११. चव्हाण राज पुण्णू ... ८२
११२. चव्हाण संजय किसनराव ... ८२
११३. चव्हाण ज्ञानेश्वर शेषराव ... ८२
११४. चव्हाण गंगाधर बाळु ... ८३
११५. चाटसे मधुकर हरी ... ८३
११६. चौधरी अजय आय. ... ८३
११७. चौधरी संदीप मुरलीधर ... ८३
११८. चौधरी नारायण राजाराम ... ८४
११९. चौधरी दिपक ... ८४
१२०. चौधरी माधुरी बबनराव ... ८४

ज

१२१. जाधव बाबुराव संभाजी ... ८४
१२२. जाधव महेंद्रकुमार आनंदराव ... ८५
१२३. जाधव दशरथ धानू ... ८५
१२४. जाधव अश्रू पुंजाजी ... ८५
१२५. जाधव अर्जुन पांडुरंग ... ८५
१२६. जाधव सुरेश विठ्ठल ... ८५
१२७. जाधव विनोद विठ्ठलराव ... ८५
१२८. जाधव सुलोचना उध्दव ... ८६
१२९. जायभाये अनिलकुमार विठोबा ... ८६
१३०. जांभूळकर मिलींद रामदास ... ८६
१३१. जोशी बी. एल. ... ८६
१३२. जोशी–टेंभूरणीकर अंजली ... ८७
१३३. जोसेफ एम.टी. ... ८७
१३४. जैन अनिल पी. ... ८७

झ

१३५. झाडे रामचंद्र एस. ... ८८
१३६. झाडे माधुरी हरिभाउ ... ८८

ट ... ८८

१३७. टापरे समृध्दी मदन ... ८८
१३८. टेंगसे आत्माराम आप्पाराव ... ८८
१३९. टेंगसे सुनिता आत्माराम ... ८८

ठ

१४०. ठाकरे अनिल खुशालराव ... ८८
१४१. ठाकरे संजय भैयाजी ... ८९
१४२. ठाकुर सुरेंद्र जी. ... ८९
१४३. ठाकूर सी. एस. एस. ... ८९
१४४. ठोंबरे मधुकर दत्तात्रय ... ९०
१४५. ठोंबरे अस्मिता रामभाउ ... ९०

ड

१४६. डंके जयश्री अभिमन्यू ... ९०
१४७. डेरे विशाखा जगन्नाथ ... ९०
१४८. डोगर शहादेव शिवाजीराव ... ९०
१४९. डोंगरे भगवान भाउराव ... ९०

ढ

१५०. ढाकरे मेघशाम नामदेवराव ... ९०
१५१. ढोले शेकोबा परशुराम ... ९१
१५२. ढोमणे छाया सुरेश ... ९१

त

१५३. तंगलवाड दिगांबर माधवराव ... ९१
१५४. तंगलवाड दत्ता माधवराव ... ९१
१५५. तांबडे सुलभा सुभाषचंद्र
१५६. तांबे श्रृती ... ९१
१५७. ताजणे शोभा पांडुरंगजी ... ९२
१५८. तायडे पद्मानंद मनोहर ... ९२
१५९. तेंडूलकर अनघा ... ९२

द

१६०. दंडारे सुरेखा अशोक ... ९२
१६१. दमकोंडवार बालाजी गंगाधरराव ... ९३
१६२. दहिकांबळे शिवाजी धोंडींबा ... ९३
१६३. दामोदर दिपक राघोजी ... ९३
१६४. दामावले दगडू नरसिंग ... ९३
१६५. दाडगे सुरेखा वैजनाथराव ... ९३
१६६. दुधे संजय संतोष ... ९३

१६७. दुधे दामोदर चंद्रभान ... ९४
१६८. दुतोंडे शाम रामराव ... ९४
१६९. देशमुख शामला माधवराव ... ९४
१७०. देशमुख भालचंद्र रूपराव ... ९४
१७१. देशमुख शिरीश गुलाबराव ... ९५
१७२. देशमुख प्रकर्ष सुभाषराव ... ९५
१७३. देशपांडे मेघा ... ९५
१७४. देसले मधुकर आत्माराम ... ९५
१७५. देसाई प्रतिभा बाबुराव ... ९५
१७६. देसाई सतिश ... ९६
१७७. देसाई कृष्णाजी मारोती ... ९६
१७८. देवर स्मिता रामेश्वर ... ९६
१७९. दिवटे–भिल्लारे विद्या दिपक ... ९६
१८०. दिघोरे विजय शंकरराव ... ९६

ध

१८१. धनवडे सुरेश विठ्ठलराव ... ९७
१८२. धनवे आरती मिलींद ... ९७
१८३. धारवाडकर दिपक सुधाकर ... ९७
१८४. धुतुरे मधुकर गंगाराम ... ९७
१८५. धोकटे मंगलमुर्ती शशीकांतराव ... ९७

न

१८६. नगराळे मोहन भानुदास ... ९७
१८७. नळगीरकर मंजुषा मोतीराम ... ९८
१८८. नडाफ बाबासाहेब रहीमन ... ९८
१८९. नवगणकर राजाभाऊ व्यंकटराव ... ९८
१९०. नामुर्ते ज्ञानेश्वर एस. ... ९८
१९१. नायक के. बी. ... ९८
१९२. नायरे मालीनी गोपाळ ... ९९
१९३. नारगुडे प्रशांत तान्हाजी ... ९९
१९४. नाईक विठ्ठल धोंडीराम ... ९९
१९५. नाईक सुजाता रामदासजी ... ९९
१९६. निंबार्ते गोपीचंद एन. ... ९९
१९७. निनावे भूपेंद्र मनोहर ... ९९
१९८. निखाडे राजू डी. ... ९९
१९९. निसर्गंध प्रभाकर रामराव ... १००
२००. निसर्गंध सिध्दार्थ ... १००

प

२०१. परळकर शशीकांत दत्तोपंत ... १००
२०२. पवार बळीराम वसंतराव ... १००
२०३. पवार दिपक कृष्णराव ... १००
२०४. पवार सुभाष किशनराव ... १०१
२०५. पवार सुभाष लक्ष्मण ... १०१
२०६. पवार सुरेंद्र धनसिंग ... १०१
२०७. पवार भानुदास ... १०१
२०८. पटले भरतसिंग अमरसिंग ... १०१
२०९. पगारे चुडामन नवल ... १०१
२१०. पलसाने वंदना ... १०२
२११. पाटील अमोल अशोककुमार ... १०२
२१२. पाटील धनराज अण्णाराव ... १०२
२१३. पाटील प्रमोद देविदास ... १०३
२१४. पाटील राजेंद्र भूपाल ... १०३
२१५. पाटील प्रिती पुरूषोत्तम ... १०३
२१६. पाटील राकेश भगवान ... १०३
२१७. पाटील उषा बाहुबली ... १०३
२१८. पाटील लक्ष्मण गजानन ... १०४
२१९. पाटील संदीप दिलीप ... १०४
२२०. पाटील सुनिल अजाबराव ... १०४
२२१. पाटील नानासाहेब बाळासाहेब ... १०४
२२२. पाटील प्रदीप दाजीबा ... १०४
२२३. पाटील श्रीधर नरसिंगराव ... १०४
२२४. पाटील खेमराज वसंत ... १०५
२२५. पडोळे ज्ञानोबा विठ्ठलराव ... १०५
२२६. पासवान क्रिष्णा ... १०५
२२७. पाटेकर बंडू भाऊसाहेब ... १०५
२२८. पांडे दया ... १०५
२२९. पिलगुलवार श्रीनिवास ... १०५
२३०. पिसे पितांबर विठोबाजी ... १०५
२३१. पुंडगे भिमराव दलितराव ... १०६
२३२. पेटकर हरिदास उध्दवराव ... १०६
२३३. पोटे ज्योती अरविंद ... १०६
२३४. पोपळघट राजू शेषराव ... १०६
२३५. पैठणे असाराम सखाराम ... १०६
२३६. पौडमल संध्या अरूण ... १०७
२३७. पौडमल अरूण विठ्ठल ... १०७

फ

२३८. फुलसुंदर आरती अरूण ... १०७
२३९. फुले सुशिला ... १०७
२४०. फिसफिसे तुकाराम रामराव ... १०७

ब

२४१. बहादे गणेश नथ्थुजी ... १०८
२४२. बडवणे–भावसार रेणुका दशरथ ... १०८
२४३. बर्डे नंदलाल भिमराव ... १०८
२४४. बडगे सागर लोकनाथ ... १०८
२४५. बगाटे राजेंद्र फकिरा ... १०८
२४६. बागवान सादीक नाजिर ... १०८
२४७. बारसागडे राजेंद्र यादवराव ... १०९
२४८. बारसागडे दिलिप केशवराव ... १०९
२४९. बारीक बिष्णू चरण ... १०९
२५०. बामणे मारोती मोतीराम ... ११०
२५१. बांडे पुरूषोत्तम रामराव ... ११०
२५२. बिरादर प्रतिभा रंगराव ... ११०
२५३. बोबडे, प्रकाश सदाशिव ... ११०
२५४. बोरकर अशोक टी. ... १११
२५५. बोरकर नलिनी ईश्वरदास ... १११

२५६. बोरकर आशिष रमेश ... १११
२५७. बोरसे कैलाश बी. ... १११
२५८. बुरडे साधना बाबुराव ... १११

भ

२५९. भड रमेश श्रीराम ... ११२
२६०. भगत राहुल जनार्दन ... ११२
२६१. भगत राजकुमार किसनराव ... ११२
२६२. भगत देविदास श्रीराम ... ११२
२६३. भगत संजय ज्योतिराम ... ११३
२६४. भवरे प्रियदर्शन ... ११३
२६५. भदाने राजू लोटन ... ११३
२६६. भालेराव साहेबराव पंढरीनाथ ... ११३
२६७. भिसे रामचंद्र मुंजाजी ... ११३
२६८. भिंगारे नितिन रमेशराव ... ११४
२६९. भुजाडे प्रमिला ... ११४
२७०. भोईटे, उत्तम बी. ... ११४
२७१. भोसले बी. व्ही. ... ११५
२७२. भोसले बालाजी रामेश्वरराव ... ११६
२७३. भोसले स्मृती ... ११६
२७४. भोसले हिरालाल का. ... ११६
२७५. भैसारे सुनंदा मारोतराव ... ११६
२७६. भांगे विजय रामक्रिष्ण ... ११७
२७७. भांगे कालिदास मारूती ... ११७
२७८. भुजबळ वर्षा रामभाउ ... ११७

म

२७९. मते कविता वि. ... ११७
२८०. मधाळे शोभा आबासाहेब ... ११७
२८१. मनवर आनंद गोविंदराव ... ११८
२८२. मनगटे पुरूषोत्तम भगवंता ... ११८
२८३. मनाळ भगवान सुरेश ... ११८
२८४. मलशेटट्टे वैजनाथ मन्मथअप्पा ... ११८
२८५. मलवाडे वेदप्रकाश अविनाश ... ११८
२८६. मसराम माया बापूराव ... ११९
२८७. मंगळेकर रमेश एस. ... ११९
२८८. मकवाना एम. एच. ... ११९
२८९. मलिक बिभूती भूषण ... ११९
२९०. महाजन जयश्री तुळशीराम ... १२०
२९१. मांजरे रामकिशन मुकींदराव ... १२०
२९२. मानकर स्नेहलता सोनबाजी ... १२०
२९३. माने प्रल्हाद मारूती ... १२१
२९४. माटे सुधाकर किसन ... १२१
२९५. मालाचे रीता ... १२१
२९६. माळोदे शशिकांत भाउसाहेब ... १२१
२९७. मायी सुनिल संभाजी ... १२२
२९८. मिसाळ हनुमंत दामोधर ... १२२
२९९. मिश्रा रविश्री ... १२२
३००. मिरांडा परपेटुआ ... १२२
३०१. मस्के दिलीप सिताराम ... १२२
३०२. म्हस्के बापूसाहेब लक्ष्मणराव ... १२३
३०३. मेंढेकर संतोष पंढरीनाथ ... १२३
३०४. मेश्राम प्रदीप के. ... १२३
३०५. मेश्राम अर्चना चंद्रभान ... १२४
३०६. मेश्राम बबन पवनदास ... १२४
३०७. मोरे रामेश्वर माधवराव ... १२४
३०८. मोरे नाथराव बालासाहेब ... १२४
३०९. मोरे गंगाधर नागोराव ... १२४
३१०. मोरे मंजू बळीराम ... १२४
३११. मोटे दादासाहेब उत्तमराव ... १२५
३१२. मोकासरे गणेश तुमाराम ... १२५
३१३. मोगल सिताराम के. ... १२५
३१४. मोहबंसी अजयकुमार शंकरलाल ... १२५
३१५. मुधोळकर गजानन रामकृष्णराव ... १२५
३१६. मुंढे दत्तात्रय प्रभुराव ... १२५
३१७. मुंडे बालाजी पाटलोबा ... १२६
३१८. मुंडे रामकिशन हरिदास ... १२६
३१९. मुनेश्वर कविता दिगंबर ... १२६
३२०. मुसळे आनंद रामदास ... १२६
३२१. मुळे गणेश दत्तात्रय ... १२६
३२२. मौंदेकर साधना विठठ्लराव ... १२६

य

३२३. यादव संतोष विश्वनाथ ... १२६
३२४. येळणे घनशाम ... १२६
३२५. येरकलवार मनोहर भिमराव ... १२७
३२६. येपूरवार रंजना पांडुरंग ... १२७
३२७. येवले सुधीर आश्रुबा ... १२७

र

३२८. राऊत नंदकिशोर उकंडराव ... १२८
३२९. राऊत किशोर उत्तमराव ... १२८
३३०. राऊत दयानंद उत्तमराव ... १२८
३३१. राठोड ईश्वर लक्ष्मण ... १२८
३३२. राठोड रमेश धोंडीराम ... १२८
३३३. राठोड उल्हास रामजी ... १२९
३३४. राठोड विक्रम काशिनाथराव ... १२९
३३५. राठोड शेषराव कनिराम ... १२९
३३६. राठोड मनोज गंगाराम ... १२९
३३७. राठोड दत्तराव उत्तमराव ... १२९
३३८. राठोड वसंत भाउराव ... १२९
३३९. राजुरकर सुमेध सुभाषराव ... १३०
३४०. रामटेके लालचंद किसन ... १३०
३४१. रामटेके प्रेरणा एस. ... १३०
३४२. रामटेके पुरूषोत्तम वारलू ... १३०
३४३. राव मनिषा ... १३०
३४४. रायठक दिपमाला विश्वनाथ ... १३१
३४५. रासकर सुवर्णा सुरेश ... १३१

३४६. रेणावीकर माधवी दिगंबर ... १३१

ल

३४७. लष्कर विनायक सुभाष ... १३१
३४८. लांजेवार साधना विजय ... १३२
३४९. लाड रंजना हेमराज ... १३२
३५०. लाड हेमराज गणपत ... १३२
३५१. लाडे जयमाला पुंडलिकराव ... १३२
३५२. लुईस रोनाल्ड डेव्हिड ... १३२

व

३५३. वखर्डे सोनाली बळीराम ... १३२
३५४. वर्धन अविनाश शिवाजी ... १३३
३५५. वायभासे शिवाजी विठ्ठलराव ... १३३
३५६. वाघ पंढरी नारायणराव ... १३३
३५७. वाघ मंदा चिंतामणराव ... १३३
३५८. वाघमारे सुरेश ... १३३
३५९. वाघमारे सुभाष राजन्ना ... १३४
३६०. वाघ रविंद्र दगडू ... १३४
३६१. वाघ क्रिष्णा ... १३४
३६२. वाघमारे दिपाली शंकर ... १३४
३६३. वाठ अंजली आर. ... १३५
३६४. वाढई रजनी डब्ल्यू. ... १३५
३६५. वासेकर महेंद्र भाऊराव ... १३५
३६६. वानखेडे वैशाली ... १३५
३६७. वानखेडे अनिल बळीराम ... १३५
३६८. वाळके केशव ... १३५
३६९. विखार रविंद्र विठोवा ... १३६
३७०. विचारे सोनाक्षी उदयराज ... १३६
३७१. विवेक पी. एस. ... १३६
३७२. वेले गजानन शंकरराव ... १३७
३७३. वैष्णव प्रविण रमेशदास ... १३७

श

३७४. शिंदे महादेव सुभेदार ... १३७
३७५. शिंदे विनायक बाजीराव ... १३७
३७६. शिंदे दत्तू मारूती ... १३७
३७७. शिंदे नवनाथ श्रीरंग ... १३८
३७८. शिंदे अखिलेश विश्वासराव ... १३८
३७९. शिंदे सुनिल गणपत ... १३८
३८०. शिंदे दिपक हरिभाउ ... १३८
३८१. शिंदे उमेश बाळासाहेब ... १३८
३८२. शिंदे पंडीत मुंजाजी ... १३८
३८३. शिंदे अे. टी. ... १३९
३८४. शिनगारे बालाजी पांडुरंग ... १३९
३८५. शेख सलीम अहमद ... १३९
३८६. शेख अजहर इकबाल ... १३९
३८७. शेंडे कृष्णा चिमणाजी ... १३९
३८८. शेंडे ज्ञानेश्वर तुळशीराम ... १३९
३८९. शेंडे विनोद श्रावण ... १४०
३९०. शेटकर सिध्देश्वर रामचंद्र ... १४०
३९१. शेटे सिमा विठ्ठलराव ... १४०
३९२. शेवाळे विकास विठ्ठल ... १४०
३९३. शृंगारे विकास प्रभाकर ... १४०

स

३९४. सकटे मच्छिंद्र ... १४१
३९५. सहारे पद्माकर ... १४१
३९६. सरप निलिमा शंकरराव ... १४१
३९७. सरोदे उषा सावळाराम ... १४१
३९८. ससाणे सतिश गंगाराम ... १४२
३९९. ससाणे जगदीश केशवराव ... १४२
४००. साने निता ... १४२
४०१. साखरकर कल्याण रामचंद्र ... १४२
४०२. साखरकर विनायक रामचंद्र ... १४२
४०३. साखरकर रूपाली कल्याण ... १४३
४०४. सांभारे रूपाली विश्वनाथ ... १४३
४०५. साळोक लक्ष्मणसिंग हिलालसिंग ... १४३
४०६. साळुंखे संजय ... १४३
४०७. साळुंके इंदू चंद्रकांत ... १४४
४०८. सावळे संजय दत्तात्रय ... १४४
४०९. सावरगांवकर अरूणा शंकरराव ... १४४
४१०. सावंत संजय ज्ञानोबा ... १४५
४११. सेलुकर ज्योती सुभाष ... १४५
४१२. सोंडगे तात्याराम परमेश्वर ... १४५
४१३. सोनकांबळे हेमंत नक्ष्मणराव ... १४५
४१४. सोनवणे प्रशांत विष्णू ... १४५
४१५. सोनवणे किशोर वसंतराव ... १४६
४१६. सोनटक्के धनंजय काशिनाथ ... १४६
४१७. सोमवंशी अल्का बाबाराव ... १४६
४१८. सोमवंशी शामसुंदर शंकरराव ... १४६
४१९. सालोटकर अशोक नामदेवराव ... १४७
४२०. स्वाईन बी. के. ... १४७
४२१. सिंगल जयसिंग पोपटसिंग ... १४७
४२२. सुडेवाड सत्यनारायण व्ही. ... १४७
४२३. सुखदेवे दिपक मुरहारी ... १४८
४२४. सुर्यवंशी बाळासाहेब रावसाहेब ... १४८
४२५. सुर्यवंशी युवराज जयदेव ... १४८
४२६. सुरवसे किरण गणपतराव ... १४८

ह

४२७. हाडाळे संदीप महादेवराव ... १४८
४२८. हारोडे रजनी ... १४८
४२९. हिवाळे साहेबराव दगडू ... १४९
४३०. हेंडगे रंगराव पांडूरंग ... १४९
४३१. होले सचिन ज. ... १४९

प्रस्तावना....

१९५८–६० मध्ये मी, एम. ए. समाजशास्त्र वर्गात विद्यार्थी होतो. १९६० जूनमध्ये नाशिकच्या एच. पी. टी. महाविद्यालयात समाजशास्त्र विषयाचा प्राध्यापक म्हणून माझ्या शिक्षकी पेशाची सुरूवात केली. १९६० ते २०२०, एकूण साठ वर्षाचा हा प्रदीर्घ कालखंड. हा कालखंड महाराष्ट्रातील समाजशास्त्र विषयाच्या दृष्टिने महत्वाचा आहे. या कालखंडात महाराष्ट्रात अध्ययन, अध्यापन, संशोधन या अंगांनी समाजशास्त्राचा लक्षणिय असा जो विकास झाला त्याच्या परीघावरचा का होईना मी साक्षीदार आहे.

या कालखंडात महाराष्ट्रातील समाजशास्त्र शिकण्याची सोय असलेल्या महाविद्यालये, विद्यापीठे यांच्या, तसेच तिथे शिकविणाऱ्या प्राध्यापकांच्या आणि शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत झपाट्याने वाढ झाली. अभ्यासक्रमामध्ये कालमानानुसार वैविध्य आले. संशोधन क्षेत्राचा परीघ वाढला. लिहिणाऱ्यांची संख्या वाढली. त्याच बरोबर समाजशास्त्राच्या प्राध्यापकी व्यवसायाला विशिष्ट असे स्वरूप देण्याचे यशस्वी असे प्रयत्न झाले. महाराष्ट्र राज्य पातळीवर कार्यरत असलेली मराठी समाजशास्त्र परिषदेची स्थापना व तिचा विकास हा या प्रयत्नांचा विलोभनिय असा अविष्कार आहे.

विंध्य पर्वताच्या दक्षिण भूभागावर राहणारे लोक हे प्रारंभशूर असतात. नव्या चांगल्या उपक्रमांचा प्रारंभ करण्याची त्यांना आवड असते, परंतु त्याचे सातत्य ते टिकवतीलच अशी खात्री देता येत नाही, अशा अर्थाचे 'प्रारंभ प्रिय: खलु दाक्षिणात्य:' असे एक प्राचिन संस्कृत सुभाषित आहे. ते आपण प्रयत्नपूर्वक खोटे ठरविले. १९८०–८१ मध्ये स्थापन केलेली मराठी समाजशास्त्र परिषद आपण केवळ जतन केली नाही तर चांगली जोपासली. कार्यप्रवण आणि कार्यसमृध्द केली. आत्तापर्यंत परिषदेची महाराष्ट्राच्या निरनिराळया भागात अगदी 'चांद्या पासुन बांद्या पर्यंत' अधिवेशने झाली. चर्चासत्रे आयोजित करण्यात आली. परिषदेची सदस्य संख्या आणि तिच्या उपक्रमांमध्ये भाग घेणाऱ्यांची संख्या सातत्याने वाढते आहे. फारसे आर्थिक पाठबळ नसतांनाही परिषदेच्या समाजशास्त्र संशोधन पत्रिका या मुखपत्रिकेचे अंकही नियमितपणे प्रकाशित झाले आहेत. जेष्ठांसाठी जीवन गौरव पुरस्कार, नवोदित लेखक, संशोधकांच्या नव्या ग्रंथासाठी व उत्कृष्ट शोध निबंधासाठी पुरस्कार असे उपक्रम सुरू झाले. एक 'व्यक्ती परिचय पुस्तिका' यापूर्वी डॉ. सुधा काळदाते यांनी १९८७ मध्ये प्रकाशित केली होती त्यानंतर तब्बल ३३ वर्षानी आता हा दुसरा 'व्यक्ती परिचय ग्रंथ' मराठी समाजशास्त्र परिषदेचे कोषाध्यक्ष व तुमसर जि. भंडारा येथील सेठ नरसिंगदास मोर महाविद्यालयातील समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राहुल भगत यांच्या संपादनाखाली प्रकाशित होतो आहे. २००६ ला राहुल ने त्याच्या महाविद्यालयात समाजशास्त्र परिषदेचे १७ व्या अधिवेशनाचे यशस्वी आयोजन केले होते. त्या अधिवेशनाला मी अध्यक्ष म्हणून उपस्थित होतो. तेंव्हापासून राहुल कायम आठवणीत आहे. आज त्याचा हा प्रयत्न बघून त्याचे कौतूक करावे तितके कमी आहे.

मराठी समाजशास्त्र परिषदेने इतर प्रादेशिक परिषदांनाही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या पंखबळ दिले आहे. परिषदेच्या या वाटचालीत महाराष्ट्रातील समग्र समाजशास्त्र शिक्षकांचे मोठे योगदान आहे. जेष्ठांचे सक्रीय मार्गदर्शन आणि नवागतांचा अमाप उत्साह यांची ही संयुक्त फलनिष्पत्ती आहे.

वस्तुत: प्राध्यापकी हा एकाकी राहून करावयाचा व्यवसाय नाही. या व्यवसायासाठी आवश्यकता असणारा 'प्राध्यापकी पिंड' तयार होण्यासाठी अविरत ज्ञानसाधना, आवश्यक ग्रंथादि साधनाव्यतिरिक्त समव्यावसायिकांबरोबरची बौध्दिक आंतरक्रिया हा ज्ञानप्राप्तीचा एक महत्वाचा स्त्रोत. या आंतरक्रियांसाठी आवश्यक असणाऱ्या संधी प्राध्यापकांना अधिकाधिक उपलब्ध करून देणे आणि प्राध्यापकांनी त्यांचा अधिकाधिक फायदा करून घेणे ही गोष्ट प्राध्यापकांचे विचारविश्व व्यापक व समृध्द करण्यासाठी आवश्यक आहे. या दृष्टिने परिषदेसारख्यां व्यावसायिक संघटनेची बांधणी आणि तिच्यावतीने आयोजित केल्या जाणाऱ्या अधिवेशने, चर्चासत्रे, परिसंवाद यांसारख्या ज्ञानोत्सवाचे महत्व अमापचं. ज्यांची बौध्दिक क्षमता कीव करण्याजोगी असते असेच लोक या ज्ञानयज्ञांना कुंभमेळे म्हणून हिणवतात.

कार्डिनल न्यूमन या शिक्षणतज्ञाने त्यांच्या 'युनिव्हर्सिटी' या लेखात जेष्ठांचे व नवागतांचे एकत्रित येण्याचे महत्व विशद केले आहे. विद्यापीठाच्या परिसरात ज्ञानवंताच्या व्यक्तीमत्वाचा प्रभाव तेथील विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाच्या जडणघडणीवर नकळत पडत जातो, असे त्यांनी प्रतिपादले आहे. नेमके तसेच या अधिवेशने, परिसंवादामधून घडते. येथे अनुभवी व नवोदित एकत्रित येतात. विचारांची देवाण–घेवाण होते. शंकाचे निराकरण होवू शकते. विषयविश्वात नव्याने आलेल्या व होवू घातलेल्या घडामोडीचे भान निर्माण होते. या अशा प्रसंगी व्यवसायातील ज्ञानवंतांची भेट होणे हा एक विलक्षण आनंददायी अनुभव असतो. १९६० मध्ये मुंबईच्या टाटा इंस्टिटयूट ऑफ सोशल सायंसेस मध्ये आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय समाजशास्त्र परिषदेला मी गेलो होतो. ईतर उद्देशाप्रमाणेच, ज्यांचे ग्रंथ वाचून मी एम. ए. झालो त्या प्रा. घुर्ये, प्रा. ए. आर. देसाई इत्यादींचे दर्शन व्हावे हा एक उद्देश होता. धीरगंभीर घुर्यांची मूर्ती आणि संध्याकाळी संस्थेच्या बागेत झाडाखाली बसून तरूण प्राध्यापकांचे बौध्दिक घेणारे देसाई अद्यापही माझ्या नजरेसमोर आहेत. सभास्थानी सेवाजेष्ठ समाजशास्त्रज्ञ काय बोलतात, कसे बोलतात, एखाद्या मुद्याची मांडणी कशी करतात, या साऱ्यांचे इष्ट असे संस्कार नव्या पिढीतील प्राध्यापकांवर होतात. आणखी एक महत्वाची गोष्ट म्हणजे अधिवेशने, परिसंवाद यासाठी अनेक समव्यवसायी एकत्रित येतात. काही काळ का होईना परस्परांच्या सहवासात असतात. सहभागी प्राध्यापकांच्या मनांमध्ये आपण एका व्यापक समुहाचे सदस्य आहोत ही अस्मिता फुलवणारे भान निर्माण होते. हे भान अनेकदृष्टया महत्वाचे, अंहकार वाढविणारे त्याचबरोबर व्यवसायाच्या मर्यादा व उत्तरदायित्व मनावर बिंबविणारे असते. यादृष्टिने मराठी समाजशास्त्र परिषदेने आयोजित केलेल्या तीन

दशकी अधिवेशनाचे मोल न मोजण्याएव्हढे आहे. मराठी समाजशास्त्र परिषदेच्या वार्षिक अधिवेशनासारखे महाकाय, बहुआयामी प्रकल्प सिध्दिस नेणे हे महाप्रयासाचे काम. सहभागी सदस्यांनी पाहुणेगिरी केली तर ते अधिक कष्टमय होते.

या ग्रंथामध्ये संपादक डॉ. राहुल भगत व त्यांच्या सहकाऱ्यांनी देखील परिषदेच्या निरनिराळया अधिवेशनांच्या कार्यवृत्तांचे संकलन समाविष्ट केलेले आहे. ते वाचल्यावर मराठी समाजशास्त्र परिषदेने संपादीत केलेल्या व्यावसायिक यशाचे परिमाण जाणवते. चर्चा विषयांची विविधता आणि सदस्यांचा वाढता सहभाग हे त्या यशाचे दर्शकांक. या सर्व अधिवेशनाच्या आयोजकांचे मनापासुन कौतुक त्याचबरोबर ज्या श्रेष्ठींनी ही परिषद स्थापन करण्यात पुढाकार घेतला व तिला पंखबळ दिले त्या सर्वांना कृतज्ञतापूर्वक अभिवादन. त्यांच्या उमेदीशिवाय हे होवूच शकले नसते.

गेली काही वर्षे मी समाजशास्त्र प्राध्यापकी व्यवसायाशी संलग्नित आहे. व्यवसायाशी निगडित अशा काही गोष्टींची बोचणी माझ्या मनाला लागून राहिली आहे. वानगीदाखल त्यातील काहींचीच मांडणी मी इथे करणार आहे. शक्यता आहे त्यावर इतरही काहीजण विचार करतील.

राज्यशास्त्र, अर्थशास्त्र यांसारख्या इतर सामाजिक शास्त्रांपेक्षा समाजशास्त्र विषयाचे अध्यापन आणि काही प्रमाणात संशोधन करणे अधिक अडचणीचे असते, असा निष्कर्ष आपल्या पैकी अनेकांच्या अनुभवांवरून काढता येवू शकेल. बहुआयामी सामाजिक वास्तव हा या शास्त्राच्या अभ्यासाचा केंद्रबिंदू आहे. एक विज्ञान म्हणून हा विषय शिकवितांना बौध्दिक वा वैचारिक तटस्थता पाळणे आवश्यक आहे. परंतु या वास्तवातंर्गत असलेल्या जात, धर्म, पंथ, उपपंथ, वास्तव्य स्थान इत्यादी घटकांच्या मुशीत प्राध्यापकांचा वैचारिक पिंड आणि मनोरचना तयार झालेली असते. त्यातुन त्यांच्या मनात आप–पर–भाव निर्माण होतो. त्यामुळे त्या वास्तवाविषयी तटस्थपणे बोलण्यासाठी त्याला बरीच मोठी वैचारिक कसरत करावी लागते. त्याची वर्गातील विचारांची मांडणी आणि वर्गाबाहेरचे त्याचे वर्तन यात बरीच विसंगती निर्माण होते. तिथे त्याला स्वत:शीच वैचारिक प्रतारणा करावी लागते. जातीभेद नष्ट करण्यासाठी एक प्रभावी उपाय म्हणून आंतरजातीय विवाहाचे समर्थन वर्गात करावयाचे आणि स्वत:च्या मुला–मुलींच्या विवाहाबाबत स्वजातीच्या वर्तूळातच घुटमळत राहायचे. असा दुटप्पीपणा स्वाभाविकपणे त्यांच्या वर्तनात येतो. याशिवाय वर्गातील बहुसंख्य असलेल्या विद्यार्थ्यांची जात, धर्म, संस्था चालकांची सामाजिक, राजकीय पार्श्वभूमी इत्यादींचे भान प्राध्यापकाला ठेवणे गरजेचे होते. प्रत्येक क्षणी तुम्हाला तुमची जात, धर्म, प्रादेशिकता याची आठवण करून देणारे बाह्य वातावरण आपण बदलू शकत नाही. मात्र आपल्या व्यावसायिक परस्पर संबंधामध्ये हे घटक ढवळाढवळ करणार नाहीत याची काळजी आपण घेवू शकतो. दुसरा प्रश्न आहे माध्यमाचा. आपल्या विषयाचे आकलन विद्यार्थ्यांना सहजसुलभ व्हावे व आपला विषय विद्यार्थीप्रिय व्हावा यासाठी आपण प्रारंभीच्या काळात मराठी अध्यापनाचा पुरस्कार केला. मराठीतून शिकविण्यास सुरूवात केली, मराठीतून ग्रंथरचना केली. परंतु सांप्रती समाजशास्त्राच्या अध्ययन, अध्यापन व संशोधनातून इंग्रजीचे समूळ उच्चाटन झाल्यासारखे दिसत आहे. ग्रंथालयातील इंग्रजी भाषेतील ग्रंथावर धुळ साचते आहे. इंग्रजी नियतकालिके उघडली जात नाही. परिणामी जगात इतरत्र नव्याने निर्माण होत असलेल्या समाजशास्त्रीय ज्ञानापासून आपण स्वत:ला व आपल्या विद्यार्थ्यांना वंचित ठेवण्याचे बौध्दिक पाप करतो आहोत, असे मला वाटते. हे कसे टाळता येईल. मराठी माध्यम ठेवूनही मूलभूत आणि महत्वाच्या संकल्पना व सिध्दांत यांचे विवरण इंग्रजीत करणे शक्य आहे का? हे व्यावसायिक पातळीवर चर्चा करून ठरवावे लागेल. विद्यार्थ्यांचे वैचारिक विश्व मर्यादित ठेवणे ही गोष्ट आपल्या विषयाच्या भवितव्याला हानी पोहोचवेल.

तिसरा प्रश्न आहे तो संशोधन विषयक. शासकीय शैक्षणिक धोरणामुळे प्राध्यापकांच्या जीवनात संशोधन कार्याला प्रचंड व्यावहारिक महत्व आले आहे. पीएच. डी. पातळीवरच्या संशोधनाचा घसरत चाललेला दर्जा इतर विषयांप्रमाणे आपल्या बाबतीतही चिंतेचा विषय झाला आहे. या बाबतीत विस्ताराने खूप काही लिहीण्याजोगे आहे. एखाद्या चांगल्या योजनेचा बोजवारा वाजविण्यात आपण पारंगत आहोत असे बोलले जाते आहे. विद्यार्थ्यांच्या पीएच. डी. संशोधन विषयाची निवड करणारे, त्याला मार्गदर्शन करणारे आपण, प्रबंधाच्या परीक्षकांची निवड करणारे आणि इतरांच्या प्रबंधाचे मूल्यमापन करणारे आपणच. यामुळे दर्जा घसरणीत आपण अग्रभागी आहोत. व्यावसायिक पातळीवर याचे चिंतन होणे आवश्यक आहे, असे मला वाटते. मराठी समाजशास्त्र परिषदेच्या विद्यमान पदाधिकाऱ्यांनी व्यक्ती परिचय ग्रंथाचा प्रकल्प हाती घेतला आणि डॉ. राहुल भगत यांनी तो व्यावसायिक उत्तरदायित्वाच्या भावनेने संपन्न केला. त्यांचे व मराठी समाजशास्त्र परिषदेच्या पदाधिकाऱ्यांचे मनपूर्वक अभिनंदन. परीषदेच्या विविध अधिवेशनांच्या कार्यवृतांचे केलेले संकलन हा या ग्रंथातील एक महत्वाचा भाग. त्यामुळे या ग्रंथाला एका ऐतिहासिक दस्तऐवजाचे मोल प्राप्त झाले आहे. डॉ. राहुल भगत यांनी ग्रंथ संपादनाचे काम हाती घेतले नसते तरीही त्यांच्या व्यावसायिक उपलब्धीच्या मोजमापात काही फरक पडला नसता. इतरांनीही ही उत्तरदायित्वाची भावना दाखविली असती तर चांगले झाले असते. पुन्हा एकदा डॉ. राहुल भगत आणि परिषदेच्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन आणि परिषदेच्या भावी वाटचालीतील यशासाठी शुभेच्छा.

डॉ. उत्तमराव भोईटे, *माजी प्राध्यापक व सामाजिक विचारवंत, माजी कुलगुरू, यशवंतराव चव्हाण म. मुक्त विद्यापीठ, नाशिक. माजी कुलगुरू, भारती विद्यापीठ, पुणे. माजी अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद, माजी अध्यक्ष, अखिल भारतीय समाजशास्त्र परिषद, दिल्ली.*

दोन शब्द....

महाराष्ट्रातील समाजशास्त्राच्या अभ्यासकांसाठी मराठी समाजशास्त्र परिषदेने आजपर्यंत विविध उपक्रम राबविले आहेत. समाजशास्त्राच्या विकासात महाराष्ट्रातील विद्यापीठाने व समाजशास्त्राच्या अभ्यासकांनी जे योगदान दिले त्याचा लेखाजोखा घेण्याचे काम बरेच दिवसांपासून मराठी समाजशास्त्र परिषदेच्या डॉ. सरोज आगलावे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू होते. यापूर्वीसुध्दा अशाप्रकारचा परिचय ग्रंथ प्रकाशित व्हावा यासाठी परिषदेच्या अनेक अध्यक्षांनी आपापल्या परीने भरपूर प्रयत्न केले आहेत परंतू काही अपरिहार्य कारणास्तव परिचय ग्रंथाचे कार्य रेंगाळले होते. मात्र यावेळी 'व्यक्ती परिचय ग्रंथ' या नावाने महाराष्ट्रातील समाजशास्त्राच्या अभ्यासकांच्या बाबत ग्रंथनिर्मिती करण्याचा प्रयत्न पूर्णत्वास गेला आहे. यापूर्वी आदरणीय डॉ. सुधाताई काळदाते यांनी १९८७ मध्ये अशाप्रकारची परिचय पुस्तिका प्रकाशित केली होती. तथापी त्यावेळी परिषद सुरू होवून फारच थोडे दिवस झाले होते त्यामुळे त्या परिचय पुस्तिकेत फारच थोडया लोकांचा समावेश होता. मराठी समाजशास्त्र परिषदेला आज जवळपास ३८ वर्ष होत आहे. तसेच परिषदेच्या सदस्यांची संख्याही मोठया प्रमाणात वाढली आहे, आणि २०२० हे वर्ष भारतातील समाजशास्त्राचे शतकपूर्ती वर्ष म्हणून साजरे करीत असतांना मराठी समाजशास्त्र परिषदेच्या सदस्यांचा परिचय असलेला ग्रंथ प्रकाशित व्हावा ही सर्वच सदस्यांची ईच्छा होती. परिषदेच्या सर्व सदस्यांची ईच्छा विचारात घेऊन तसेच भारतातील समाजशास्त्राच्या शतकपूर्ती निमित्ताने मराठी समाजशास्त्र परिषदेच्या डॉ. सरोज आगलावे यांच्या कार्यकारीणीच्या कल्पनेतून हा ग्रंथ आकाराला आला आहे, तो माझ्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात प्रकाशित होतो आहे, आणि हा ग्रंथ आता आम्ही मराठी समाजशास्त्र परिषदेच्या सदस्यांच्या हाती देतो आहे, याचा मला विशेष आनंद होतो आहे.

महाराष्ट्रातील विविध समाजशास्त्राच्या अभ्यासकांच्या विविध पैलूंचा शोध यानिमित्ताने घेतला गेला आहे. खरेतर अशा पध्दतीचे काम करणे अत्यंत जिकिरीचे असते मात्र संपादक डॉ. राहुल भगत व संपादकीय मंडळानी हे काम अत्यंत जबाबदारीने पूर्णत्वास नेले आहे. या ग्रंथामध्ये मराठी समाजशास्त्र परिषदेची स्थापना व स्थापनेपासूनची परिषदेची वाटचाल, मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र आणि आता पिअर रिव्हयू असलेली 'समाजशास्त्र संशोधन पत्रिका' चा प्रवास, त्याचबरोबर महाराष्ट्रातील समाजशास्त्राच्या विकासात विविध समाजशास्त्रज्ञांचे असलेले योगदान, महाराष्ट्रात समाजशास्त्र हा विषय अधिकाधिक विद्यार्थ्यापर्यंत नेण्यासाठी महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांचे योगदान, या संदर्भाने संपूर्ण आढावा घेण्याचा प्रयत्न संपादक मंडळाने केलेला दिसून येतो. या ग्रंथात जवळपास तिनशे पन्नास समाजशास्त्राच्या प्राध्यापक, अभ्यासक व संशोधक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कारकिर्दीबदद्ल थोडक्यात आढावा घेतला गेला आहे. समाजशास्त्राच्या अभ्यासकांच्या परिचयाबरोबरच त्यांच्या धारणा, प्रेरणा व आकांक्षा देखील यानिमित्ताने शोधण्यात आल्या जेणेकरून या क्षेत्रात येऊ घातलेल्या नवोदितांना त्या मार्गदर्शक ठरतील. मुंबई विद्यापीठातील प्रा. पॅट्रिक गिडीस यांच्यापासून ते वर्तमानात असलेल्या अनेक विचारवंतानी समाजशास्त्राबाबतचे जे योगदान दिले आहे त्याचा थोडक्यात आढावा येथे घेतला गेलेला आहे. कारण त्यांचे कार्य हे उद्याच्या संशोधकांना मार्गदर्शक व प्रेरणा देणारे ठरणार आहे व त्यातून त्यांच्या संशोधनाची दिशा ठरणार आहे.

अगोदरच्या पिढीने चाललेल्या पाऊलवाटेवरूनच नंतरची पिढी त्याच पाऊलवाटेवरून जातांना दिसून येते. असे असले तरी वर्तमानात एकूणच सांस्कृतिक सामाजिक बदलांमुळे जगण्याच्या कक्षा आता रूंदावल्या आहेत. पाऊलवाटेच्याऐवजी आता लोक महामार्गाने प्रवेश करू लागले आहेत आणि हे होणे काळाच्या ओघात अत्यंत आवश्यक आहे. समाज परिवर्तन हा समाजाचा स्थायीभाव असतो या पार्श्वभूमीवर नवे नवे बदल व त्याचा धांडोळा समाजशास्त्राने घेतला आहे. अलीकडे समाजशास्त्र विषयाची आवड विद्यार्थ्यामध्ये मोठयाप्रमाणावर निर्माण झाल्यामुळे संशोधनही भरीव होत आहे. समाजशास्त्र हा विषय घेणाऱ्यांची संख्या आता वाढू लागली आहे. बदलणाऱ्या युगामध्ये तर समाजशास्त्र अत्यंत महत्वाचे ठरले आहे आणि भविष्यातही ते महत्वाचेच राहणार आहे यात शंका नाही. जोपर्यंत मानवी समाज अस्तित्वात आहे तोपर्यंत समाजशास्त्राचे महत्व दिवसेंदिवस वाढतच राहणार आहे.

अलीकडे संशोधक समाजशास्त्रात नवे नवे प्रकल्प हाती घेवू लागले आहेत व सामाजिक समस्यांचा अभ्यास करू लागले आहेत. पूर्वीच्या समाजशास्त्रज्ञांनी आपल्या ज्ञानाद्वारे समाजशास्त्राच्या विकासात आपापल्या परीने भर टाकण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. अनेक संशोधक व अभ्यासक नव्या जोमाने नवनवीन पध्दतीतून समाजाचे आकलन व अर्थबोधन करतांना दिसून येत आहेत. त्यांचे कर्तृत्वही भरीव स्वरूपाचे आहे. त्यांच्या एकूण कार्याचा परिचय उद्याच्या पिढीला झाला पाहिजे यासाठीचा हा अटट्हास दिसून येतो.

समाजशास्त्राच्या विकासाबाबत काही मर्यादा दिसून येतात त्या म्हणजे अध्ययन व अध्यापन करतांना भाषेचा प्रश्न सातत्याने पुढे येतांना दिसून येतो. समाजशास्त्राचे ग्रंथ हे मूलत: इंग्रजी भाषेतून असल्यामुळे त्याचे आकलन करण्यात मराठी अभ्यासक कमी पडतो आहे. म्हणून समाजशास्त्राचे इंग्रजी भाषेतील महत्वपूर्ण ग्रंथ मराठी भाषेतून प्रकाशित होणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे अगदी शेवटच्या स्तरांपर्यंत हा विषय घेऊन जाण्यासाठी अभ्यासकांना मदत होईल. असे असले तरी मराठी भाषेचा आधार घेऊन अनेक अभ्यासकांनी समाजशास्त्रात मुलभूत असे संशोधन केलेले आपणाला दिसून येते.

या ग्रंथाच्या संदर्भाने बोलायचे झाल्यास या ग्रंथाचे स्वरूप पाहता एवढे सोपे हे काम निश्चितच नव्हते. महाराष्ट्रातील समाजशास्त्र विषयाच्या सर्व प्राध्यापकांना एका माळेत गुंफण्यासाठी संपादक डॉ. राहुल भगत यांची ही कसरत

कौतुकास्पद आहे. सदरहू ग्रंथाची मांडणी व निर्मिती करीत असतांना परिषदेचा कार्यकाळ संपत आल्याने अमरावती येथे झालेल्या मराठी समाजशास्त्र परिषदेत माझ्या अध्यक्षतेखाली नवीन कार्यकारिणी निवडून आली. जानेवारी २०२० मध्ये नविन कार्यकारिणी अस्तित्वात आली परंतू लगेच मार्च मध्ये कोविड–१९ च्या प्रादुर्भावामूळे लॉकडाऊनमुळे लागलेल्या प्रवासविषयक प्रतिबंधामुळे नागपूरला जाऊन कार्यभार स्विकारण्यास आम्हाला जाता आले नाही. शेवटी डॉ. सरोज आगलावे व त्यांच्या कार्यकारिणीने परिषदेचा कार्यभार ऑनलाईन पध्दतीने आमच्याकडे सोपविला.

परिषदेच्या कार्यकारिणीतील बदलामूळे या ग्रंथाचे काम पुन्हा रेगांळते की काय अशी भिती डॉ. राहुल भगत यांना होती. यासंदर्भात डॉ. राहुल भगत यांनी संकलित केलेले बायोडेटा आणि इतर सर्व माहिती आमच्या नविन कार्यकारिणीला सुपूर्द करण्याची तयारी दर्शविली आणि व्यक्ती परिचय ग्रंथाचे हे कार्य पूर्ण करण्याची विनंती आम्हाला केली होती. परंतू मी त्यांना स्पष्ट सांगीतले की, 'सर या कामासाठी अजून वेळ लागला तरी हरकत नाही परंतू हे कार्य तुमच्या कार्यकारिणीने सुरू केले आहे त्यामूळे ते तुम्हीच पूर्णत्वास न्या आणि हा ग्रंथ पूर्ण करा'. तसेही यादरम्यान या ग्रंथाचे काम अंतिम टप्प्यात आले होतेच आणि हा ग्रंथ पूर्णत्वास नेण्याची जबाबदारी डॉ. राहुल भगत यांनी माझ्या आग्रहास्तव पुन्हा आपल्या खांद्यावर घेतली. परंतू त्यानंतर लागलेल्या लॉकडाऊनमूळे ती पूर्णत्वास नेण्यास वेळ लागला हे निर्विवाद सत्य आहे.

अध्यापन आणि संशोधनासोबतच मराठी समाजशास्त्र परिषदेने विषयाच्या उत्तरदायित्वाच्या भूमिकेतून नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले आहे. हा ग्रंथ छपाई योग्य करण्यासाठी यावर फार मोठी मेहनत करावी लागेल असे मी संपादकांना सुचविले. समाजशास्त्राचे विचारविश्व व्यापक स्वरूपाचे असल्याने या पार्श्वभूमीवर समाजशास्त्राच्या अभ्यासकांचा परिचय व त्यांच्या वैचारिक पातळीवर त्यांच्या समग्र लेखनाचे आणि कार्याचे काही प्रमाणात का होईना परिशीलन करणे हा या ग्रंथ निर्मिती मागचा हेतू आहे.

परिषदेचा कार्यभार प्रत्यक्ष ०१ जुलै २०२० रोजी माझ्याकडे आल्यानंतर या व्यक्तीपरिचय ग्रंथाच्या कामाला अग्रक्रम देण्याचे ठरविले. त्यानूसार डॉ. राहुल भगत यांनी या कार्याला अग्रक्रम द्यावा म्हणून मी सतत त्यांचा पाठपुरावा केला. सदर ग्रंथ आता नव्या कार्यकारिणीच्या कालखंडात व माझ्या अध्यक्षतेखाली प्रकाशित होत आहे. प्रस्तुत ग्रंथ हा आपण ज्या विषयाचे अध्यापन करतो त्याच्या पुर्वीच्या व वर्तमान युगाशी स्वत:ला जोडून घेण्यासाठी महत्वपूर्ण आहे. या ग्रंथाचे वाचकांतर्फे स्वागत होईल याचा मला विश्वास आहे.

डॉ. नारायण कांबळे, *अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद, प्राध्यापक,* पदवी व पदव्यूत्तर समाजशास्त्र विभाग, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, शिरूर ताजबंद, ता. अहमदपूर जि. लातूर.

संपादकीय....

१९८५ मध्ये पुणे विद्यापीठात संपन्न झालेल्या मराठी समाजशास्त्र परिषदेच्या चवथ्या अधिवेशनात डॉ. सुधा काळदाते यांची अध्यक्ष म्हणून निवड झाली होती. नवीन अध्यक्षा डॉ. सुधा काळदाते व कार्यकारी मंडळाच्या इतर सदस्यांनी काही नवीन उपक्रम हाती घेण्याचे ठरविले. त्या उपक्रमाचाच एक भाग म्हणजे मराठी समाजशास्त्र परिषदेची व्यक्ती परिचय पुस्तिका/ग्रंथ हा होय. डॉ. सुधा काळदाते यांच्या प्रयत्नामूळेच मराठी समाजशास्त्र परिषदेची पहिली व्यक्ती परिचय पुस्तिका १९८७ मध्ये प्रथमच प्रकाशित होऊ शकली. आणि त्यानंतर तब्बल ३३ वर्षानी मराठी समाजशास्त्र परिषदेच्या वतीने परिषदेच्या अध्यक्षा डॉ. सरोज आगलावे यांच्या मार्गदर्शनात आम्ही मराठी समाजशास्त्र परिषदेचा व्यक्ती परिचय ग्रंथ प्रकाशित करीत आहोत. या व्यक्ती परिचय ग्रंथाचे आपण उत्स्फुर्त स्वागत कराल ही अपेक्षा!

भारतात समाजशास्त्राच्या अध्ययनाला सुरूवात होऊन शंभर वर्ष झालीत त्यानिमित्ताने आपण समाजशास्त्राचे शताब्दी वर्ष साजरे करीत आहोत. जानेवारी, २०२० मध्ये अमरावती येथे झालेले परिषदेचे ३० वे अधिवेशन आपण 'भारतातील समाजशास्त्राची शताब्दी' या विषयांवरच आयोजित केले होते. भारतातील समाजशास्त्राची शताब्दीच्या निमित्ताने मराठी समाजशास्त्र परिषदेचा व्यक्ती परिचय ग्रंथ प्रकाशित करावा असा विचार कोषाध्यक्ष डॉ. राहुल भगत यांनी परिषदेच्या कार्यकारिणीच्या सभेत ठेवला. या विचाराला मराठी समाजशास्त्र परिषदेच्या अध्यक्षा, डॉ. सरोज आगलावे, सचिव, डॉ. दिपक पवार, कार्यकारिणी सदस्य, डॉ. साहेबराव भालेराव, प्रा. प्रविण घोडेस्वार, डॉ. हनुमंत मिसाळ, प्रा. नंदकिशोर राऊत, डॉ. रामेश्वर मोरे, डॉ. सतीश देसाई, डॉ. भरतसिंग पटले, डॉ. अशोक सालोटकर, डॉ. ज्योती पोटे, डॉ. चुडामन पगारे, डॉ. विकास शेवाळे या सर्वच सदस्यांनी उत्स्फुर्त पाठिंबा दिला. व्यक्ती परिचय ग्रंथाच्या निमित्ताने महाराष्ट्रातील समाजशास्त्राचे प्राध्यापक, संशोधक, अभ्यासक व विद्यार्थी यांची माहिती संकलित होईल व त्या माध्यमातून परिषदेचा एक उपयुक्त दस्तऐवज व संदर्भग्रंथ म्हणून व परस्पर संपर्काच्या दृष्टीने त्याचा उपयोग होईल हा या ग्रंथाचा महत्वाचा उद्देश आहे.

मराठी समाजशास्त्र परिषदेचा व्यक्ती परिचय ग्रंथ प्रकाशित व्हावा अशी अनेकांची प्रबळ ईच्छा होती. यासाठी या अगोदरचे मराठी समाजशास्त्र परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. सुरेश वाघमारे, डॉ. जगन कराडे, डॉ. दिलीप खैरनार, डॉ. स्मिता अवचार इत्यादींनी प्रयत्न केले होते. परंतु त्यांच्या प्रयत्नाला यश येऊ शकले नाही. कारण या परिचय ग्रंथासाठी मराठी समाजशास्त्र परिषदेच्या ज्या सदस्यांकडून माहिती हवी असते. ते सदस्य पाहिजे तसा प्रतिसाद देत नाहीत. हा आमचाच नाही तर याअगोदर मराठी समाजशास्त्र परिषदेच्या माजी अध्यक्षा दिवंगत डॉ. सुधाताई काळदाते यांनी १९८७ मध्ये जेंव्हा पहिली व्यक्ती परिचय पुस्तिका प्रकाशित केली होती, तेंव्हा त्यांनाही हाच अनुभव आला होता. १९८७ च्या परिचय पुस्तिकेच्या मनोगतात त्यांनी ही खंत व्यक्त केली होती. आज सुध्दा या ग्रंथासाठी जितक्या सदस्यांची माहिती हवी होती तेवढी प्राप्त झाली नाही हे आम्ही प्रामाणिकपणे कबूल करतो. या ग्रंथाच्या निर्मितीचे कार्य २०१९ पासूनच सुरू झाले होते. ऑक्टोबर २०१९ पासून मराठी समाजशास्त्र परिषदेच्या सर्व सदस्यांना व्हॉटसॲप, इमेल, दुरध्वनी इत्यांदीच्या माध्यमातून आवाहन करून आम्ही माहिती मागविण्याचा प्रयत्न केला. आम्हाला असा विश्वास होता की, मराठी समाजशास्त्र परिषदेचे आज जवळपास ११०० सदस्य आहेत. त्यापैकी अर्ध्या सदस्यांनी जरी माहिती पाठविली असती तर हा ग्रंथ अधिक मोठा झाला असता. परंतु खेदाने नमूद करावे लागते की, वारंवार विनंती करूनही ११०० पैकी फक्त ३५० सदस्यांनी या ग्रंथासाठी माहिती पाठविली. यापैकी जवळपास ३० टक्के लोकांनी आपली माहिती स्वत: पाठविली नाही तर त्यांची किंवा त्यांच्या विभाग प्रमुखाची परवानगी घेऊन त्यांच्या विद्यापीठ व महाविद्यालयांच्या वेबसाईटवरून आम्हाला ती घ्यावी लागली. सुरूवातीला ही माहिती सुध्दा असंबध स्वरूपाचीच होती. अर्धी इंग्रजी, अर्धी मराठी, कोणाचा फोटो नाही तर कोणाचे फॉन्ट बरोबर नाही. या सगळया अडचणीवर मात करीत कसेतरी ३५० सदस्यांची माहिती संकलित झाली. ती या ग्रंथात आम्ही समाविष्ट केली आहे. दुसरी महत्वाची बाब म्हणजे मराठी समाजशास्त्र परिषदेचे बाहेरील राज्यातील जे सदस्य आहेत त्यांनी मात्र एकाच विनंतीवर आपली माहिती पाठविली. परंतु महाराष्ट्रातील समाजशास्त्राच्या प्राध्यापकांनी मात्र आमच्या विनंतीला प्रतिसाद दिला नाही. अर्थात व्यक्ती परिचय ग्रंथासाठी अनेक समाजशास्त्राच्या प्राध्यापकांनी व मराठी समाजशास्त्र परिषदेच्या सदस्यांनी आपली माहिती का पाठविली नाही? हा एक स्वतंत्र संशोधनाचा विषय होऊ शकतो. तुर्तास ज्या सदस्यांनी या ग्रंथासाठी माहिती पाठविली, त्यांचे मात्र मनापासून आभार.

मराठी समाजशास्त्र परिषदेच्या या व्यक्ती परिचय ग्रंथाच्या निर्मितीच्या निमित्ताने परिषदेच्या सदस्यांशी ईमेल, व्हॉटस्अप, मोबाईल इत्यांदीच्या माध्यमातून पत्रव्यवहार झाला. परिषदेचे आजीव सदस्य होण्यासाठी व परिचय ग्रंथासाठी माहिती पाठविण्यासाठी महाराष्ट्रातील समाजशास्त्र प्राध्यापकांना व अभ्यासकांना आम्ही सतत आवाहन केले. म्हणून अनेकांनी आमच्या आवाहनाला प्रतिसाद दिला. आणि आज हा व्यक्ती परिचय ग्रंथ आपल्यासमोर आम्ही सादर करू शकलो याचा आम्हाला मनस्वी आनंद आहे. अर्थातच या परिचय ग्रंथासाठी ज्या अनेक प्राध्यापकांनी आपली माहिती पाठविली आणि प्रोत्साहन दिले त्यासाठी आम्ही त्यांचे आभारी आहोत. विशेषत: हा व्यक्ती परिचय ग्रंथ प्रकाशित व्हावा यासाठी ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ व अभ्यासक डॉ. उत्तम भोईटे, डॉ. श्रुती तांबे, डॉ. राजेंद्र पाटील, डॉ. जगन कराडे, डॉ. स्मिता अवचार, डॉ. प्रदीप आगलावे, डॉ. बी. के. स्वांई, डॉ. महेंद्रकुमार जाधव, डॉ. अरूण पौडमल, डॉ. दिलीप खैरनार, डॉ. सुरेश वाघमारे, डॉ. ज्योती गगनग्रास, डॉ. प्रशांत सोनवाणे, डॉ. कल्याण साखरकर, डॉ.

नारायण कांबळे, प्रा. संदिप चौधरी, प्रा. प्रियदर्शन भवरे, डॉ. सुधीर येवले इत्यादींनी आम्हाला सतत प्रोत्साहन दिले. त्यांच्या प्रोत्साहनामूळेच हे कार्य आम्ही यशस्वीपणे पूर्ण करू शकलो.

गोवा येथील २०१८ च्या परिषदेच्या अधिवेशनात २ वर्षासाठी मराठी समाजशास्त्र परिषदेची जबाबदारी माननिय सदस्यांनी आमच्यावर सोपविली. परिषदेच्या अध्यक्षा म्हणून डॉ. सरोज आगलावे, सचिव म्हणून डॉ. दिपक पवार व कोषाध्यक्ष म्हणून डॉ. राहुल भगत यांची निवड केली. त्यासाठी आम्ही मराठी समाजशास्त्र परिषदेच्या सर्व सन्माननीय सदस्यांचे हार्दिक आभारी आहोत. २०१८ ते २०२० या कालावधीच्या आमच्या कार्यकारिणीकडे मागील कार्यकारिणीने कारभार हस्तांतरीत केला तेव्हा १११६ आजीवन सभासद होते, गेल्या दोन वर्षात आम्ही नवीन आजीवन सभासदांची भर टाकली. त्यामुळे आज परिषदेच्या एकूण आजीवन सभासदांची संख्या ११६२ आहे. गेल्या काही वर्षात नवीन प्राध्यापक भरती झाली नसतांना जवळपास ५० नवीन आजीवन सदस्यांना आम्ही मराठी समाजशास्त्र परिषदेशी जोडू शकलो याचा आम्हाला आनंद व अभिमान सुध्दा आहे. आमच्या कार्यकारिणीच्या कार्यकाळातच 'समाजशास्त्र संशोधन पत्रिका' हे परिषदेचे मुखपत्र असलेले जर्नल 'पिअर रिव्हयू जर्नल' झाले असून आजीवन सभासदांचे शोधनिबंध प्रकाशित करण्याकरीता एक चांगला प्लॅटफार्म उपलब्ध झाला आहे. या काळात प्रकाशित शोधनिबंधाची संख्या व गुणवत्ता वाढविण्यात परिषद यशस्वी राहिली असे आम्हास वाटते. तसेच २०१८ ते २०२० या दोन वर्षाच्या कार्यकारिणीच्या काळात मराठी समाजशास्त्र परिषद अधिक लोकाभिमूख करण्यातही आम्ही यशस्वी राहीलो, असेही आम्हास वाटते. भविष्यातील कार्यकारिणीसुध्दा याप्रकारचे अधिक चांगले कार्य करेल आणि मराठी समाजशास्त्र परिषदेला यापेक्षा अधिक उंची प्राप्त करून देतील अशी आम्ही आशा व्यक्त करतो.

सदर व्यक्ती परिचय ग्रंथाच्या प्रस्तावनेसाठी समाजशास्त्राचे ज्येष्ठ प्राध्यापक व सामाजिक विचारवंत डॉ. ऊत्तमराव भोईटे सरांना प्रस्तावना लिहण्याचा आम्ही आग्रह केला. सरांची तब्येत फारशी साथ देत नसतांना आणि वार्धक्यामुळे लिहण्याचा सराव काहीसा मंदावला असतांनाही डॉ. भोईटे सरांनी या ग्रंथाला मनापासून दाद देत प्रस्तावना लिहीली त्यासाठी डॉ. भोईटे सरांचे आम्ही मनापासून आभार व्यक्त करतो. तसेच सदर ग्रंथाचे कार्य डॉ. सरोज आगलावे यांच्या अध्यक्षपदाच्या कारकीर्दीत सुरू केले होते आणि ते डॉ. नारायण कांबळे यांच्या अध्यक्षपदाच्या कारकीर्दीत संपन्न होत आहे. त्यामूळे या ग्रंथाच्या संदर्भात आम्ही मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. नारायण कांबळे यांना सुध्दा दोन शब्द लिहण्याचा आग्रह केला. आमच्या आग्रहाला मान देऊन डॉ. कांबळे सरांनी या ग्रंथाच्या संदर्भात दोन शब्द लिहीलेत त्यासाठी आम्ही त्यांचेही आभार व्यक्त करतो.

खरे पाहता जानेवारी २०२० च्या नंतर निवडून आलेल्या नव्या कार्यकारिणीने हे कार्य संपन्न करावे अशी आमचीही ईच्छा होती. परंतू नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. नारायण कांबळे आणि नवनिर्वाचित कार्यकारिणीच्या सदस्यांनी कार्यकारिणी बदलली तरी हे कार्य तुम्हीच पुर्णत्वास न्या, असा आग्रह केला आणि हा ग्रंथ लवकरात लवकर प्रकाशित व्हावा यासाठी त्यांनी सतत पाठपुरावा केला. तसेच २०२१ चा मराठी समाजशास्त्र संशोधन पत्रिकेच्या अंकाच्या संपादनाची जबाबदारी आणि व्यक्ती परिचय ग्रंथाच्या संपादनाची जबाबदारी सुध्दा डॉ. राहुल भगत यांच्यावर सोपविली त्याबदद्ल मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. नारायण कांबळे व त्यांच्या सर्व कार्यकारिणी सदस्यांचे हार्दिक आभार. कारण त्यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळेच हा व्यक्ति परिचय ग्रंथ आज आपल्या समोर येतो आहे.

शेवटी, हा ग्रंथ पुर्णत्वास जावा यासाठी मराठी समाजशास्त्र परिषदेचे सर्व माजी अध्यक्षांनी आम्हाला सतत प्रोत्साहन दिले त्यासाठी त्यांचे हार्दिक आभार. तसेच या ग्रंथासाठी आपली बहुमोल माहिती उपलब्ध करून देणाऱ्या महाराष्ट्रातील सर्व समाजशास्त्र विषयाच्या प्राध्यापक, विद्यार्थी व अभ्यासकांचे हार्दिक आभार. ग्रंथाच्या संदर्भातील आपले अभिप्राय आमच्यासाठी अमूल्य आहेत.

धन्यवाद!

डॉ. राहुल भगत, *संपादक.*
डॉ. सरोज आगलावे, *सहसंपादक.*
डॉ. दिपक पवार, *सहसंपादक.*

मराठी समाजशास्त्र परिषदेची वाटचाल: १९८१ ते २०२०

महाराष्ट्रात समाजशास्त्राच्या औपचारिक अध्यापनास सुरूवात होऊन १०० वर्ष पूर्ण झाली आहेत. १९१९ मध्ये मुंबई विद्यापीठामध्ये समाजशास्त्राच्या अध्यापनाला सुरूवात झाली. समाजशास्त्राच्या अभ्यासकांना रूची असणाऱ्या विषयांवर महाराष्ट्र पातळीवरील समाजशास्त्राच्या अध्यापकांमध्ये व अभ्यासकांमध्ये चर्चा व्हावी या दृष्टीने एक हक्काचे विचारपीठ असावे यादृष्टीने मराठी समाजशास्त्र परिषद अस्तित्वात आली. महाराष्ट्रामध्ये पदवी व पदव्यूत्तर वर्गासाठी मराठी माध्यमाचा स्वीकार बहूतेक विद्यापीठांनी केल्यामुळे मराठीमध्ये समाजशास्त्रीय विषयावर चर्चा होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र पातळीवरील संघटनेची आवश्यकता लक्षात होऊन १९८०–८१ मध्ये मराठवाडा विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाने पुढाकार होऊन मराठी समाजशास्त्र परिषदेची पायाभरणी केली. मराठवाडा विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाचे तत्कालीन प्रमुख डॉ. मा. गु. कुलकर्णी यांनी त्या संदर्भात मुंबई, पुणे, एस्. एन्. डी. टी., शिवाजी व नागपूर या विद्यापीठांच्या समाजशास्त्र विभाग प्रमुखांशी पत्रव्यवहार करून मराठी समाजशास्त्र परिषदेची पायाभरणी केली. आणि तेंव्हापासून आजपर्यंत मराठी समाजशास्त्र परिषद सतत प्रगतीच्या वाटेवर असलेली दिसते.

परिषदेचे पहिले अधिवेशन :– मराठी समाजशास्त्र परिषदेची अनौपचारिक सुरूवात परिषदेच्या औरंगाबाद येथील २७–२८ जून १९८१ रोजी झालेल्या पहिल्या अधिवेशनाने झाली. परिषदेच्या प्रथम अधिवेशनाचे उद्घाटक सुप्रसिध्द विचारवंत व मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. राम जोशी हे होते. तर अध्यक्षस्थान मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. बी. आर. भोसले यांनी भूषविले. मराठी समाजशास्त्र परिषदेच्या या पहिल्याच अधिवेशनाला १०० प्रतिनिधी उपस्थित होते आणि परिषदेत एकूण २७ शोधनिबंध सादर होऊन त्यावर चर्चा झाली.

१९८२ ला झालेल्या मसप च्या अधिवेशना संदर्भात माहिती उपलब्ध होऊ शकली नाही.

१९८३ ते १९८५– मराठी समाजशास्त्र परिषदेची सुरूवात जरी १९८१ ला झाली असली तरी परिषदेची पहिली कार्यकारिणी १९८३ मध्ये पुढीलप्रमाणे निवडण्यात आली होती.

अध्यक्ष–डॉ. एम. जी. कुलकर्णी, **सचिव–** श्री. वि. वि. देशपांडे, **कोषाध्यक्ष–** डॉ. सुधा काळदाते. **कार्यकारिणी सदस्य :–** डॉ. विलास संगवे, डॉ. वाय. बी. दामले, डॉ. धिरेंन्द्र नारायण, डॉ. त्रिं. ना. वाळुंजकर, डॉ. पु. ल. भांडारकर, डॉ. शैलजा जोशी, डॉ. सुधा गोगटे, डॉ. एस. एन. पवार, डॉ. रत्ना राव **कार्यालय,** मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

परिषदेचे दूसरे अधिवेशन मराठी समाजशास्त्र परिषदेचे दुसरे अधिवेशन नागपूर येथे ८ व ९ जानेवारी १९८३ रोजी हिस्लॉप महाविद्यालय, नागपूर यांच्या पुढाकाराने झाले. डॉ. भांडारकर हे संघटक सचिव होते. अधिवेशनाचे उद्घाटन नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू प्राचार्य जी. बी. कदम यांनी केले तर अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ. विलास संगवे हे होते. अधिवेशनाला जवळ–जवळ १०० प्रतिनिधी हजर होते. मराठी समाजशास्त्र परिषदेच्या नागपूरच्या दुसऱ्या अधिवेशनातच परिषदेच्या पुढील वाटचालीच्या दृष्टीने १२ जणांचे कार्यकारी मंडळ निवडण्यात आले. यामध्ये अध्यक्ष म्हणून डॉ. एम. जी. कुळकर्णी, सचिव, श्री. वि. वि. देशपांडे, खजिनदार, डॉ. सौ. सुधा काळदाते, व सदस्य म्हणून डॉ. व्ही. ए. संगवे, डॉ. वाय. बी. दामले, डॉ. धिरेंद्र नारायण, डॉ. टी. एन. वाळूंजकर, डॉ. पी. एल. भांडारकर, डॉ. एस्. एन्. पवार, डॉ. सुधा गोगटे, डॉ. रत्ना राव, सौ. शैलजा भालचंद्र जोशी यांची निवड करण्यात आली. मराठी समाजशास्त्र परिषदेच्या प्रथम कार्यकारणी निवडीनंतर परिषदेच्या नोंदणी संबंधी कार्यवाही सुरू झाली. १६–४–१९८३ रोजी परिषदेला संस्था नोंदणी अधिनियम १८६० प्रमाणे नोंदणीपत्र मिळाले व महाराष्ट्र / २७–८३ औरंगाबाद हा नोंदणी क्रमांक मिळाला. तसेच २७ जून १९८३ रोजी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीचे प्रमाणपत्र मिळाले. नोंदणी झाल्यामुळे परिषदेला औपचारिक स्वरूप प्राप्त झाले. पुढील वाटचालीला गती मिळाली. तसेच अनेक कायदेशीर जबाबदाऱ्या व मर्यादा आल्या. सभासद नोंदणी सुरू झाली; पण सभासद होण्याच्या दृष्टीने फारसा प्रतिसाद मात्र मिळाला नाही त्यामुळे या कालावधीत सभासद कमी होते.

परिषदेचे तिसरे अधिवेशन :– मराठी समाजशास्त्र परिषदेचे तिसरे अधिवेशन २८, २९, ३० जून १९८४ रोजी कोल्हापूर येथे समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या पुढाकाराने झाले. संघटकाची जबाबदारी डॉ. एस. एन. पवार, समाजशास्त्र विभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ यांनी स्वीकारली. अधिवेशनाचे उद्घाटन कुलगुरू प्राचार्य भोगीशयनम् यांनी केले तर अध्यक्ष म्हणून आंतरराष्ट्रीय ख्यातीचे समाजशास्त्रज्ञ डॉ. धनागरे, प्राध्यापक समाजशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ हे होते. त्यांचे अध्यक्षीय अभिभाषण महाराष्ट्रात खूप गाजले व त्यावर वृत्तपत्रात सुध्दा चर्चा झाली. या अधिवेशनाला १२५ प्रतिनिधी हजर होते. या अधिवेशनात ५ सत्रात विविध विषयांवर निबंध वाचन व चर्चा झाली. या अधिवेशनाचे एक वैशिश्टय म्हणजे 'डॉ. घुर्ये आणि भारतीय समाजशास्त्र' हा विषय ठेवून या अधिवेशनाच्या संयोजकांनी महाराष्ट्रातील नामवंत समाजशास्त्रज्ञांच्या योगदानावर चर्चा करण्याचा पायंडा सुरू केला.

१९८५–१९८८ अध्यक्ष–डॉ. सुधाताई काळदाते, **सचिव–डॉ.** वि. वि. देशपांडे, **कोषाध्यक्ष–**डॉ. रा. भि. बिलावर. **कार्यकारिणी सदस्य** :– डॉ. विलास संगवे, डॉ. धिरेंन्द्र नारायण, डॉ. द. ना. धनागरे, डॉ. पु. ल. भांडारकर, डॉ. श. नि. पवार, डॉ. त्रि. ना. वाळुंजकर, प्रा. सौ. शैलजा जोशी, प्रा. सा. वि. कुलट. **कार्यालय–**मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

परिषदेचे चवथे अधिवेशन :– १९८५ मध्ये परिषदेचे चौथे अधिवेशन कोण घेतील याची चिंता असताना डॉ. धनागरे यांनी पुढाकार घेतला व ते पुणे विद्यापीठात घेण्याचे मान्य केले. परिषदेचे चौथे अधिवेशन ८–९–१० जून १९८५ रोजी पुणे

विद्यापीठ समाजशास्त्र विभागाच्या पुढाकाराने संपन्न झाले. 'विकास आणि परिवर्तन' हा अधिवेशनाचा मुख्य विषय होता. त्याच्या अंतर्गत ४ सत्रांमध्ये विविध पैलूंवर चर्चा झाली. ५ वे सत्र 'डॉ. इरावती कर्वे यांचे समाजशास्त्राला योगदान' यावर होते. त्या अधिवेशनाचे उद्घाटन आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पदार्थविज्ञानशास्त्रज्ञ व पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. व्ही. जी. भिडे यांनी केले, तर अधिवेशनाला अध्यक्ष म्हणून सुप्रसिध्द मानववंशशास्त्रज्ञ प्रा. सौ. लीला दुबे या लाभल्या होत्या. या अधिवेशनात डॉ. सुधा काळदाते यांनी अध्यक्षपदाची सुत्रे हाती घेतली. याच अधिवेशनात एका विद्यापीठ क्षेत्रात परिषदेचे कार्यालय जास्तीत जास्त चार वर्ष रहावे असे ठरले. मराठवाडा विद्यापीठाची कालमर्यादा संपली होती. त्यामुळे १९८८ पासून परिषदेचे कार्यालय पुण्याला डॉ. द. ना. धनागरे यांच्या अध्यक्षतेखाली स्थलांतरीत झाले आणि दोन वर्षानंतर डॉ. उत्तम भोईटे अध्यक्ष झाले. नोव्हेंबर १९९१ मध्ये अर्जुननगर येथील अधिवेशनात पुणे विद्यापीठ क्षेत्राची कालमर्यादा मार्च ९२ मध्ये संपत असल्याने एप्रिल १९९२ पासून कार्यालय कोल्हापूर ला डॉ. श. नि. पवार यांच्या अध्यक्षतेखाली स्थलांतरीत झाले.

सन १९८६ मधील मराठी समाजशास्त्र परिषदेच्या अधिवेशना संदर्भात माहिती उपलब्ध होऊ शकली नाही.

परिषदेचे पाचवे अधिवेशन:— मराठी समाजशास्त्र परिषदेचे पाचवे अधिवेशन २६ व २७ डिसेंबर, १९८७ रोजी पैठण, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनाचा अहवाल उपलब्ध होऊ शकला नाही.

१९८८ मधील मराठी समाजशास्त्र परिषदेच्या अधिवेशना संदर्भात माहिती उपलब्ध नाही.

१९८८ ते १९९० अध्यक्ष — डॉ. द. ना. धनागरे, **सचिव** — डॉ. उत्तम भोईटे, **कोषाध्यक्ष** — प्रा. सु. रा. मोरे. **कार्यकारिणी सदस्य** :— डॉ. वि. वि. देशपांडे, प्रा. वि. कृ. जोशी, डॉ. श. नि. पवार, प्रा. एम. जे. कशाळीकर, डॉ. धीरेन्द्र नारायण, प्रा. लता मुरूगकर, प्रा. शैलजा जोशी, डॉ. बी. के. जोशी, प्रा. एम. एम. थारकर. **कार्यालय**—पुणे विद्यापीठ, पुणे.

परिषदेचे सहावे अधिवेशन:— मराठी समाजशास्त्र परिषदेचे सहावे अधिवेशन दिनांक २३ व २४ सप्टेंबर, १९८९ रोजी नागपूर विद्यापीठातील यशवंत महाविद्यालय, वर्धा येथे आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनाचा अहवाल उपलब्ध नाही.

१९९० ते १९९२ अध्यक्ष — डॉ. उत्तम भोईटे, **सचिव** — प्रा. माधव सोमण, **कोषाध्यक्ष** — प्रा. सु. रा. मोरे. **परिषदेचे कार्यालय**— पुणे विद्यापीठ, पुणे.

१९९० मधील मराठी समाजशास्त्र परिषदे च्या अधिवेशना संदर्भात माहिती उपलब्ध नाही.

परिषदेचे सातवे अधिवेशन:— मराठी समाजशास्त्र परिषदेचे सातवे अधिवेशन दिनांक १२ व १३ नोव्हेंबर, १९९१ रोजी देवचंद महाविद्यालय, अर्जुननगर, कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनाचा सुध्दा अहवाल उपलब्ध होऊ शकला नाही. तसेच १९९२ मधील मराठी समाजशास्त्र परिषदेच्या अधिवेशना संदर्भात माहिती उपलब्ध नाही.

१९९२ ते १९९६, अध्यक्ष — डॉ. एस. एन. पवार, **सचिव** — डॉ. राजेंद्र पाटील, **कोषाध्यक्ष** — डॉ. सर्जेराव साळुंखे. **कार्यालय**— शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. कार्यकारिणी सदस्य — प्रा. सी. टी. कांबळे, प्रा. पी. के. कुलकर्णी, प्रा. रत्ना राव, डॉ. प्रल्हाद जोगदंड, प्रा. शब्बीर शेख, डॉ. स्मिता अवचार, प्रा. टी. के. अत्तरदे, प्रा. के. ऊ. निबांळकर, प्रा. डी. जी. गुडधे, प्रा. एस. पी. पुनाळेकर. कार्यालयीन पत्ता:— द्वारा, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

डॉ. एस. एन. पवार, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात ८ नोव्हेंबर १९९३ ला मराठी समाजशास्त्र परिषदेच्या सभासदांची संख्या २७१ होती. ती ३१ डिसेंबर १९९३ पर्यंत २९६ इतकी झाली होती. डॉ. पवार यांच्या कार्यकारिणीने १ जानेवारी १९९३ ते ३१ डिसेंबर १९९३ या एका वर्षाच्या कार्यकाळात १०० आजीव सदस्यांची नोंदणी करण्याचा परिषदेच्या इतिहासातील एक विक्रमी उच्चांक साध्य केला. तसेच समाजशास्त्र संशोधन पत्रिकेचा तिसरा अंक पाच वर्षाच्या कालखंडानंतर प्रकाशित करण्याचे श्रेय सुध्दा डॉ. एस. एन. पवार यांच्या कार्यकारिणीला आहे.

कै. जय जोशी स्मृती पारितोषिकाचे रेंगाळलेले कार्य डॉ. पवार यांच्याच कार्यकाळात सुरळीत झाले. कै. जय जोशी स्मृती पारितोषिक या अंतर्गत, मराठीतून स्वतंत्रपणे लिहीलेल्या समाजशास्त्र विषयाच्या सर्वोत्कृष्ट पाठयपुस्तकाला पहिले पारितोषिक आणि सर्वोत्कृष्ट समाजशास्त्रीय संशोधनपर ग्रंथास दुसरे पारितोषिक देण्याचे याच कार्यकारिणीत ठरले होते. या दोन्ही पारितोषिकांची सुरूवातीची रक्कम रू. २५१ अशी होती ती १९९४—९५ मध्ये प्रत्येकी रू. १००० अशी करण्यात आली होती. १९९०—९१ मध्ये पाठयपुस्तकासाठी वि. वा. भिडे यांच्या 'ग्रामीण जीवन संघटन', प्राची प्रकाशन, मुंबई, १९९१ या ग्रंथाला प्राप्त झाले होते. १९९२—९३ या वर्षासाठी श्री. वि. वा. भिडे यांच्या 'जमातीचे समाजशास्त्र', प्राची प्रकाशन, मुंबई, १९९२. या ग्रंथाला प्राप्त झाले. तर संशोधनपर ग्रंथासाठी १९९०—९१ या वर्षात या पुरस्कारासाठी कोणीही ग्रंथ पाठवला नाही. १९९२—९३ या वर्षासाठी डॉ. गोविंद गारे व उत्तमराव सोनवणे यांच्या 'आदिवासी कला', गमभन प्रकाशन, पुणे, १९९३ या ग्रंथाला प्राप्त झाले होते. कै. जय जोशी स्मृती पारितोषिक सुरू करण्यासाठी प्रा. शैलजा जोशी यांनी अगोदरच रू. २००० ची रक्कम परिषदेकडे जमा केली होती आणि १९९४ मध्ये पुन्हा रू. १० हजाराची रक्कम परिषदेकडे सुपुर्द केली होती. प्रा. शैलजा जोशी, मुंबई यांनी १९९४ मध्ये कै. जय जोशी स्मृती पारितोषिक सुरू करण्यासाठी एकूण रू. १२ हजार परिषदेला देणगी दिली.

परिषदेचे आठवे अधिवेशन :— मराठी समाजशास्त्र परिषदेचे आठवे अधिवेशन मुळजी जेठा महाविद्यालयाच्या विद्यमाने दि. ७, ८ व ९ नोव्हेंबर, १९९३ रोजी जळगांव येथे संपन्न झाले. मराठवाडयातील भूकंपात मृत्यूमूखी पडलेल्या, तसेच समाजशास्त्राच्या प्रा. कै. चाफेकर, नी. स. वैद्य, पुरूषोत्तम धर, लोहेकर इ. ना विनम्र श्रध्दांजली वाहून परिषदेला प्रारंभ झाला. पहिल्या उद्घाटन सत्रात खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. जी. डी. तथा अण्णासाहेब बेंडाळे यांचे स्वागतपर

भाषण तसेच, मसप चे अध्यक्ष प्रा. डॉ. एस. एन. पवार आणि उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एन. के. ठाकरे यांची भाषणे झाली. एस. एन. डी. टी. विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. सुमा चिटणीस यांचे अध्यक्षीय भाषण झाले. त्यांनी अध्यक्षीय भाषणात सांगीतले की, 'मराठीतून पुस्तके मर्यादित आहेत. अनुवाद करून करून किती शिकविणार? मुळ इंग्रजी व अन्य भाषातील ग्रंथ हे वाचले पाहिजेतच. त्याशिवाय जर्नल्सही वाचली पाहिजेत. कारण त्यांचे कुणी भाषांतर करत नाही. शिकविणाऱ्यांनी तज्ञ नाही. पण निदान तज्ञाचे आसपास तरी जायचा प्रयत्न करायला हवा.'

प्रसिध्द समाजशास्त्रज्ञ प्रा. डॉ. विलास संगवे यांच्या अध्यक्षतेखाली 'साने गुरूजी आणि समाजप्रबोधन' या विषयांवर पहिले सत्र झाले. या सत्रात सानेगुरूजींचे एक विद्यार्थी, कुश्ठरोग्यांची सेवा करणारे एक समाजसेवक श्री. प्रकाशभाई मोहाडीकर यांनी सानेगुरूजींवर आपले विचार मांडले. सानेगुरूजींच्या व्यक्तीमत्वाचा प्रभाव जनमाणसांवर अधिक का पडावा? असा प्रश्न उपस्थित करून मोहाडीकर यांनी साने गुरूजींच्या सामाजिक प्रबोधनाच्या बैठकीची कारणमिमांसा त्यांच्या जीवनचरित्रातील विविध प्रसंगाच्या संदर्भात सोदाहरण स्पष्ट केली. प्रा. माणिक माने, कराड यांनी 'साने गुरूजींचे सामाजिक विचार' या विषयांवर निबंध वाचला. त्यांनी प्रामुख्याने गुरूजींचे स्त्रियांबाबत, जातीयतेबाबत, सामाजिक ऐक्य, धर्म, विवाह संस्था, कुटुंब कल्याणाबाबतच्या विचारांचे विश्लेषण केले. डॉ. एम. बी. शहा, धुळे यांनी 'सानेगुरूजी व समाजप्रबोधन' हा निबंध सादर केला. सामाजिक विभेद निर्माण करणाऱ्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी गुरूजींच्याकडे तीन गोष्टी होत्या, त्या म्हणजे मातृहृदय, मृदू व प्रसंगी कठोर होणारी वाणी व सर्वस्पर्श लेखणी. या आधिरेच गुरूजींनी अस्पृश्यता परिमार्जन, दुबळयावरील अन्यायाला वाचा फोडली, असे त्यांनी प्रतिपादन केले. डॉ. किसन पाटील यांनी 'साने गुरूजींच्या कवितेतील समाजप्रबोधन' या निबंधामध्ये तळागाळातील माणसांशी एकरूप होऊन हे जीवन सफल करण्याचा ध्येयवाद, ऐक्यवाद स्पष्ट केला. 'जनसंपर्क माध्यमे आणि सामाजिक परिवर्तन' या विषयांवर दिल्ली विद्यापीठातील ख्यातनाम प्रा. डॉ. बी. एस. बावीसकर यांचे अध्यक्षतेखाली दुसरे सत्र संपन्न झाले. डॉ. सौ. सुधा काळदाते यांनी प्रारंभीचे सामाजिक परिवर्तन ही बहुमितीय प्रक्रिया असून गेल्या दोन–तीनशे वर्षात पाश्चात्य देशांमधील वस्तू, व्यक्ती आणि व्यवस्था यांच्या प्रभावाखाली आशिया खंडातील देशात झालेले बदल याच प्रकारचे असल्याचे नमूद केले. पाश्चात्य देशांमध्ये विज्ञानामुळे होणारे परिवर्तन हळुहळू झाले म्हणून पचवता आले. आपल्याकडे झपाटयाने झाले म्हणून पचवता आले नाही, असे मत व्यक्त करून जनसंपर्क माध्यमे आणि सामाजिक परिवर्तन यातील आंतरक्रिया तपासून घेण्याची गरज स्पष्ट केली. राष्ट्रीय विकासांमध्ये सामाजिक परिवर्तन आणायचे असेल तर जनसंपर्क माध्यमांद्वारे प्रथमत: जनतेला विकासाबदद्लची माहिती मिळाली पाहिजे. कारण ती समाजाच्या संस्कृतीचाच एक भाग असते. दूरदर्शन हे करमणूकीचे साधन म्हणून ज्यांच्याकडे पोहचले अशा श्रीमंत, गरीब, व्यापारी इ. मध्ये गिऱ्हाईक संस्कृती निर्माण झाली. दूरदर्शनचे माध्यम आणखी प्रभावी करता येऊ शकेल. रेडिओची भूमिका शेतकऱ्यांबाबत फारच परिणामकारक होते हे नमूद करून सुधाताईंनी वृत्तपत्र, साहित्य, चित्रपट इ. जनसंपर्क माध्यमांची सामाजिक परिवर्तनातील भूमिका स्पष्ट केली. पैकी डॉ. एकनाथ माळी यांनी 'ग्रामीण रस्ते: जनसंपर्क आणि सामाजिक परिवर्तनाचे एक साधन' या शोधनिबंधात सामाजिक आणि सांस्कृतिक विकासाचे निर्देशक म्हणून साक्षरता, जनन व मृत्यूदर, दळणवळण, वृत्तपत्रे, करमणुकीची साधने, कुटुंब नियोजन इ. च्या संदर्भात ग्रामीण समाजात रस्त्यांचे स्थान विशद केले. प्रा. डॉ. रा. बा. कोल्हे यांनी आपल्या 'जनसंपर्क माध्यमे आणि सामाजिक परिवर्तन' या निबंधात वृत्तपत्रे, नभोवाणी, दूरदर्शन, चित्रपट या माध्यमांचा उहापोह करून सामाजिक परिवर्तनाच्या संदर्भात जनसंपर्क माध्यमे महत्वाची भूमिका केल्याने समाज परिवर्तनास प्रतिकूल मनोवृत्ती निर्माण झाल्याचे दिसते. म्हणून ऐक्यात्मक भावना वाढीस लावण्यासाठी प्रसंगी या जनसंपर्क माध्यमांवर कडक निर्बंध घालावेत व या माध्यमांचा उपयोग लोक प्रबोधनासाठी केला जावा असे प्रतिपादन केले.

'२१ व्या शतकाच्या उंबरठयावरील स्त्री' या विषयांवर प्रा. पेंडके यांच्या अध्यक्षतेखाली तिसरे सत्र झाले. या सत्रात डॉ. शेख शब्बीर यांनी 'एकविसाच्या शतकाच्या उंबरठयावरील भारतीय मुस्लिम स्त्री' हा निबंध सादर केला. सद्यस्थितीतील प्रचलित रीती–रीवाज, बाल विवाह, पडदा पध्दती, बहुपत्नीत्व, मौखिक व एकपक्षीय तलाक, शिक्षण व व्यवसायातील अल्पप्रमाण, कौटुंबिक निर्णय प्रक्रियेतील त्यांचा क्षुल्लक सहभाग, आर्थिक परावलंबित्व इ. घटकांना त्यांनी जबाबदार धरले. खुदा आणि पैगंबरांनी प्रतिपादन केलेली सर्व तत्वेच मुसलमानांनी अजिबात बदलून टाकली. पवित्र कुराण, सांस्कृतिक परंपरा इ. ची समीक्षा फक्त पुरूषांद्वारेच झाल्याने व दैवी कायद्याचा उपयोग स्वत:च्या फायद्यासाठी करून घेतल्याने अल्लाकडून मिळालेल्या सर्व अधिकारांपासून त्यांनी स्त्रीस वंचित ठेवले. त्यामुळे सुधारणात्मक कार्यक्रमांकडे त्या मंदगतीने आकर्शित होत आहेत. तथापि वरचेवर होणाऱ्या सांप्रदायिक विध्वंसामुळे मुस्लिमांमध्ये आपले सांस्कृतिक अस्तित्व टिकवून ठेवण्याच्या कटट्टरवादी शक्तींच्या प्रयत्नात एकविसाव्या शतकाच्या उंबरठयावरील स्त्री, तिच्यातील जाणीव जागृतींची पीछेहाट तर होणार नाही ना? अशी भिती त्यांनी व्यक्त केली. प्रा. राजेंद्र पाटील यांनी 'महाराष्ट्रातील स्त्रियांचे स्त्री–पुरूष प्रमाण, साक्षरता आणि कामकऱ्यांच्यामधील प्रमाण: एक आढावा' हा शोधनिबंध सादर केला. महाराष्ट्रातील १९०१ ते १९९१ या काळाचा विचार करता स्त्रियांचे प्रमाण कमी होत आहे. समाजातील सामाजिक, आर्थिक व वैद्यकीय घटकांचा परिणाम या प्रवाहावर होत असल्याचे दिसते. १९६१ ते १९९१ या काळामध्ये महाराष्ट्राची लोकसंख्या जरी दुपटीने वाढली तरी साक्षरतेचे प्रमाण चौपटीने वाढले गेले आहे. मुलींचे प्राथमिक शिक्षण आणि प्रौढ महिलांचे शिक्षण या दोन्ही क्षेत्रात महाराष्ट्रात उत्कृष्ट कार्य झाल्याचे दिसते. तरीही स्त्रियांच्यात निरक्षरतेचे प्रमाण मोठे आहे. हे दुर्लक्षित करता येणार नाही. १९८१ ते १९९१ या दशकाचा विचार केला असता एकूण स्त्री कामगारांचे प्रमाण एकूण लोकसंख्येशी असलेले प्रमाण वाढलेले आहे आणि

सर्वात जास्त टक्केवारी शेतमजुर वर्गामध्ये दिसते. शेतमजूर म्हणून काम करत असतांना अल्प वेतन, शारीरिक कश्ट आणि हंगामी व्यवसाय या सर्व घटकांचा परिणाम स्त्रियांवर होत असलेला दिसतो. असे निष्कर्ष त्यांनी काढले आहेत. या सत्रामध्ये डॉ. दा. धो. काचोळे, सौ. मनिशा राणे व डॉ. चिरमाडे यांनीही आपले शोधनिबंध सादर केले.

'दलित साहित्य: समाजशास्त्रीय विश्लेषण' या विषयांवर चौथे सत्र आयोजित केले होते. सुरत येथील डॉ. एस. पी. पुनाळेकर या व्यासंगी संशोधकाने सादर केलेला शोधनिबंध व त्या अनुषंगाने झालेली चर्चा ही एक उत्कृष्ट बौध्दिक मेजवानीच होती. 'दलितांच्या स्वकथनाचे समाजशास्त्र' हा त्यांच्या शोधनिबंधाचा विषय होता. १९६० ते १९९३ या काळामध्ये महाराष्ट्रात दलित लेखकांची वीसाहून अधिक स्वकथने लिहिली गेली असून त्यात सात–आठ दलित स्त्रियांच्या स्वकथनांचा समावेश आहे. सवर्णांच्या हातांमध्ये नैसर्गिक, राजकीय, सांस्कृतिक व इतर साधनसामुग्री आहे. त्यांनी इथल्या दलितांवर, आपले नियंत्रण ठेवले आहे. हे दलित साहित्य आता भारताच्या इतर राज्यांकडून कथा, कविता, कादंबरी, नाटक इ. वाड:मय प्रकारात पोहोचू लागले आहे. या दलित साहित्याचा समाजशास्त्राने विचार करावा कारण ते 'समाजदर्शी' साहित्य आहे. दलित साहित्य हे समुहमनाचे विचार असून त्यात सामाजिक स्पंदने स्पष्ट होतात, असे सांगून त्यांनी दलित साहित्याचे विश्लेषण सामाजिक स्वतंत्रता, मानवी हक्क आणि समानता या मूल्यांच्या संदर्भात केले. स्वसन्मान स्वभानाकडून स्वपरीक्षणाकडे दलित साहित्य चालले आहे. भेदभाव करणाऱ्या आणि मानवतेला काळिमा फासणाऱ्या सामाजिक संहिता आणि परंपरा यांच्यापुढे शरणागती पत्करून हे कसे पाळले जातात याच्या प्रवृत्तीचे दाखले दलित साहित्यात मिळतात असे त्यांनी सोदाहरण स्पष्ट केले. प्रा. जोगदंड यांनी 'सोशिऑलॉजी ऑफ लिटरेचर' आणि 'सोशिऑलॉजी ऑफ मुव्हमेंट' या दृष्टीकोनातून दलित साहित्याकडे पाहिले पाहिजे असे मत व्यक्त केले. प्रा. सुमन मुठे यांनी दलित साहित्याच्या संदर्भात दलित ही एक जात नसून ती एक जाणीव आहे. याच जाणीवेमुळे दलित जीवनाकडे बघण्याचा एक वेगळा दृष्टिकोन निर्माण होत आहे. दलित साहित्याची चळवळ ही सांस्कृतिक परिवर्तनाची चळवळ आहे. या चळवळीला वर्णव्यवस्था नाकारावयाची असून मनुष्यत्वाची प्रतिष्ठा या मूल्यांची स्थापना करावयाची आहे. केवळ दलितांसाठीच हे साहित्य नसून सर्वप्रकारच्या शोशितांसाठी, श्रमजीवी वर्गासाठी जे फक्त माणूस सर्वश्रेश्ठ मानतात त्यासाठी निर्माण झालेले साहित्य मानावे लागेल असे मत प्रदर्शित केले. प्रा. श्रीमती एस. जी. फुले यांनी दलित साहित्य हा मराठी साहित्यातील क्रांतीकारक साहित्यप्रवाह असून ते समाजशास्त्रीय अभ्यासाचे महत्वाचे साधन असल्याचे प्रतिपादन केले.

'खानदेश समाज व संस्कृती' या पाचव्या सत्रांमध्ये प्रा. दि. ह. महाजन यांच्या अध्यक्षतेखाली अत्यंत रोचक चर्चा झाली. डॉ. बावीसकर हे खानदेशाचेच सुपुत्र, त्यांनी या विषयांवर अत्यंत अभ्यासपूर्ण विचार मांडून खानदेश समाज संस्कृतीच्या विविध पैलूंचे समाजशास्त्रीय विश्लेषण अत्यंत ओघवत्या शैलीत केले. श्रीरामपूर, कोपरगांव, सातारा जिल्हा येथील जमीन, माती, शेती व पिके याची खानदेशची तुलना करून खानदेश हा विदर्भ, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्राला जोडणारा ''लिकिंग झोन'' असल्याचे कथन केले. खानदेशामध्ये मराठयांचे हुकमी वर्चस्व नव्हतं. इथं राजकीय पुढाऱ्यांमध्ये प्रामुख्याने जैन, मारवाडीच आहेत. तर मराठा हा इतरांप्रमाणे आक्रमक नाही उलट जातीविषयी सहिश्णूता जास्त आहे. खानदेशी माणूस 'काय भाऊ' म्हणतो तर सातारा जिल्हयात 'काय पाव्हंण' म्हणतात अस सांगून अहिराणी ही इथली संस्कृती असून तिच्यावर गुजराथींचा प्रभाव असल्याचे मत व्यक्त केले. खानदेशामधील दैवत, सुगरणपणा, खापरावरील मांडे, पुरणपोळी इ. ची वैशिष्टये सांगून खानदेशी माणसांची मवाळ, भावूक, स्वप्नाळू क्वचित ध्येयवादी ही वैशिष्टये विशद केली. प्रा. रत्नाकर विसपुते यांनी खानदेशांमधील विविध ग्रामदैवतांचा आढावा घेणारा पेपर सादर केला तर खानदेशमधील कवी प्रा. राजा महाजन यांनी आपल्या खुमासदार ओघवत्या शैलीत खानदेश व अहिराणीची वैशिष्टये स्पष्ट करत खसखस पिकविली.

'समाज, धर्म व राजकारण' या विषयांवर प्रा. पी. के. कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सहाव्या सत्रामध्ये डॉ. सुनील मायी यांनी 'जोपर्यंत लोकशाही प्रक्रियेमध्ये निवडून येणे या एकाच गोष्टीला महत्व आहे. तोपर्यंत राजकारणात धार्मिक गटांच्या आधाराशिवाय पर्याय नाही. भारतातील भा. ज. प. आणि शिवसेनेचे हिंदुत्वाधिष्ठीत राजकारण, कॉग्रेसचे मुस्लिमप्रणीत राजकारण, या सर्वामध्ये भारतीय समाजातील धर्म राजकारणाचे बटिक बनलेला आहे' असे मत नोंदविले. प्रा. प्रताप पांडूरंग शिरोळे यांनी प्रारंभीच समाज निर्मितीच्या व समाज धारणेच्या मुलभूत व शाश्वत प्रेरणा कोणत्या? असा प्रश्न उपस्थित करून धर्माच्या 'सनातन धर्म' व 'सांप्रदायिक धर्म' या दोन रूपांची राजकारणाच्या संदर्भात चिकित्सा केली. आज धर्म आणि राजकारण यांचे संबंध धर्ममुलवादी प्रवृत्तींनी डोके वर काढल्याने वातावरण अत्यंत तणावात्मक बनले आहेत असे सांगून राजकारणात नितीधर्माचा आधार असावा, यात धर्माचे राजकारण आणू नये ते देशहितास मारक ठरेल. तर बा. ह. कल्याणकर यांनी जेंव्हा धर्मावर टीका होते तेव्हां क्रांतीला सुरूवात होते असे सांगून आमचे प्रबोधन, विचार, माणूस हा आधी कोसळला आणि मग मशिद कोसळली असे सांगितले.

'लोकसंख्या धोरण आणि सामाजिक विकास' या विषयांवरील सातव्या सत्राचे सूत्रसंचालन डॉ. रा. बा. कोल्हे यांनी केले. उद्‌गीरच्या प्रा. पी. के. कुलकर्णी यांनी भारताच्या लोकसंख्यावाढीची आकडेवारी सादर करून भारताचे लोकसंख्याविषयक धोरण स्पष्ट केले. प्रतिबंधात्मक उपायाबरोबरच प्रबोधनात्मक उपायही महत्वाचे आहेत. पण भारतात प्रबोधनात्मक धोरणाकडे दुर्लक्ष होत असल्याचे सांगून त्यांनी डॉक्टर, वकील इ. सल्लागारांना व्यवसायाची परवानगी देतांना शिक्षणक्षेत्रातील शिश्यवृत्त्या, सर्व कर्मचाऱ्यात प्रवासभत्याची सवलत, व्यापारी, कारखानदार इ. ना सवलती देतांना दोन मुलांचेच बंधन घालावे इ. सुचना केल्या. तर डॉ. राम वाघ यांनी लोकसंख्या धोरणात्मक

उपाययोजना म्हणून राजकीय, वैद्यकीय व इतर प्रयत्न या तीन प्रकारातून कार्यवाही करण्यावर भर दिला.

'समाजशास्त्राची सद्य:स्थिती' या सर्वाच्यांच जिव्हाळयाच्या विषयांवर डॉ. विलास संगवे, डॉ. बावीसकर यांनी समाजशास्त्राचे अध्ययन, अध्यापन आणि संशोधन या तिन्ही आघाडयावरील ऐतिहासिक आढावा होऊन वर्तमान काळात केवळ डिग्रीसाठी संशोधन व तेही सक्तीने होऊ लागल्याने संशोधनाचा दर्जा घसरत चालल्याबदद्ल खेद व्यक्त केला. मा. खासदार भाईसाहेब महाजन योचे उद्बोधनपर व्याख्यानाने या अधिवेशनाची सांगता झाली. या अधिवेशनामध्ये महाराष्ट्र, गुजराथ, दिल्ली येथून सुमारे शंभर प्रतिनिधी, संशोधक उपस्थित होते. या अधिवेशनाच्या निमित्ताने एक सुबक, देखणी व संग्रही ठेवण्याजोगी स्मरणिका प्रसिध्द करण्यात आली. हे अधिवेशन यशस्वी करण्यामध्ये प्राचार्य नेमाडे, उपप्राचार्य महाजन दि. ह., प्रा. टी. के. अत्तरदे, प्रा. परदेशी, प्रा. डॉ. सौ. जंगले, प्रा. महेश कुलकर्णी इ. चा सिंहाचा वाटा होता.

अहवाल–प्रा. माणिक माने. वेणुताई चव्हाण महाविद्यालय, कराड.

परिषदेचे नववे अधिवेशन:– मराठी समाजशास्त्र परिषदेचे नववे अधिवेशन सरदार पटेल महाविद्यालयाच्या विद्यमाने दि. १७ ते २० नोव्हेंबर १९९४ या कालावधीत चंद्रपूर येथे यशस्वीपणे संपन्न झाले. दिल्ली, सुरतपासून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून १०० प्रतिनिधी यात सहभागी झाले होते. नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू मा. जी. टी. गाभे यांनी दिपप्रज्वलन करून या अधिवेशनाचे उद्घाटन केले. भारतातील एक ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ प्रा. ए. आर. देसाई यांना श्रध्दांजली वाहणारा प्रस्ताव प्रा. एस. एन. पवार यांनी मांडला व दोन मिनीटे स्तब्धता पाळून हा ठराव मंजूर होऊन कार्यक्रमाला सुरूवात झाली. स्वागताध्यक्ष खासदार मा. शांतारामजी पोटदुखे यांनी आपल्या भाषणात आदिवासींच्या सामाजिक जीवनाचा वस्तुनिश्ठ परामर्श घेतला. जैसलमेर, बस्तर आणि चंद्रपूर हे भारतातील तीन लोकसभा मतदार संघ असे आहेत की जेथे २५ टक्के आदिवासी राहतात. गडचिरोली जिल्हयामध्ये दर तीन माणसांमागे एक आदिवासी असे प्रमाण आहे. तेथे अजूनही मराठी पोहचलेली नाही. इंग्रज कोण? कधी आले? कधी गेले? माहीत नाही. औद्योगिकरणाचे परिणाम जाणवू लागले असून त्यातून निर्माण होणाऱ्या गुन्हेगारी, झोपडपट्टी या सारख्या समस्यांचे समजाशास्त्रीय अध्ययन करण्याचे आवाहन त्यांनी केले. मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष व शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाचे प्रमुख, प्रा. एस. एन. पवार यांनी मसप च्या स्थापनेपासून आढावा घेतला. मसप संक्रमणावस्थेतून जात असतांना परिषदेचा तात्विक व संघटनात्मक पाया भक्कम करण्याची गरज प्रतिपादन करून त्यावरच मसप चे भवितव्य अवलंबून असल्याचे त्यांनी नमूद केले.

समाजशास्त्र हे एक जिवंत शास्त्र असून अभ्यासकांनी त्याला प्रत्यक्षानुभवाची जोड द्यायला हवी. अशा अधिवेशनाचे उत्साही स्वरूप कमी होऊन, विचारमंथन जास्त व्हावयाला हवे. आदिवासींबाबत समाजात खुप गैरसमज आहेत. शासनाने आदिवासींच्या कल्याणासाठी अनेक योजना आखल्या पण शासनयंत्रणेमुळेच त्या त्यांच्यापर्यंत पोचल्या नाहीत. काही जमातीमध्ये विवाह करत नाहीत. मुलेबाळे होतात, संसार होतो. आम्ही विवाह करून घटस्फोट घेतो. प्रॉपर्टीसाठी भांडतो. आपली लाईफस्टाईल त्यांच्यावर का लादावी असा प्रश्न मा. कुलगुरू श्री. गाभे यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात उपस्थित करून समाजशास्त्राच्या प्राध्यापकाने समर्पित होऊन समाजापुढील आव्हाने स्वीकारावीत असे आवाहन केल.

या अधिवेशनास अध्यक्ष म्हणून महाराष्ट्रातील आदिवासींचे एक अभ्यासक व संशोधक म्हणून प्रसिध्द असलेले डॉ. गोविंद गारे यांनी 'आदिवासींच्या विकासाची सैध्दांतिक भूमिका, संस्कृती संघर्ष, शिक्षण आणि परिवर्तन' या विषयावर आपल्या प्रदिर्घ भाषणात अत्यंत अभ्यासपूर्ण संशोधनपर विचार मांडले.

भारतीय समाजशास्त्राचे जनक डॉ. गो. स. घुर्ये यांचे १९९३ हे जन्मशताब्दी वर्ष म्हणून साजरे केले जात आहे. हे निमित्त साधून या अधिवेशनात 'डॉ. जी. एस. घुर्ये यांचे समाजशास्त्रातील योगदान' या विषयावर परिसंवाद आयोजित करून मसप च्या कार्यकारिणी व आयोजकांनी समयसुचकता दाखविली. या सत्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ समाजशास्त्र विभागाचे माजी विभाग प्रमुख प्रा. एम. जी. कुलकर्णी यांचा निबंध त्यांच्या अनुपस्थितीत वाचून दाखविण्यात आला.

डॉ. घुर्ये यांनी समाजशास्त्रीय विपूल लेखन केले असून त्यांच्या विषयांना भारतीय संदर्भ होता. त्यांनी तथ्य संकलन व वस्तुस्थितीच्या मांडणीवर भर दिला. डॉ. घुर्ये पुराव्याशिवाय कोणतेही विधान करत नसत त्यांच्या लेखनात जातीव्यवस्था, आदिवासी जीवन, ग्रामीण समाजरचना याबदद्ल तपशीलवार माहिती आली आहे. राष्ट्रनिर्मितीस व राष्ट्रउभारणीत केंद्रबिंदू मानून त्यांनी लेखन केले आहे. परिणामी ईशान्यतील आदिवासी समाज आणि मध्यप्रदेशातील जनजीवनाबाबतची आत्मियता त्यांच्या लेखनात दिसते. चाळीस–पंचेचाळीस वर्षापूर्वीच त्यांनी परिस्थितीविज्ञानावर संशोधन केले आहे. इतर शास्त्रांच्या बरोबरीचा दर्जा समाजशास्त्राला मिळवून देण्याचे कार्य डॉ. घुर्ये यांनी केल्याचे प्रतिपादन एम. जी. कुलकर्णी यांनी केले.

डॉ. प्रदीप आगलावे यांनी 'डॉ. जी. एस. घुर्ये यांच्या जातीव्यवस्थेविषयीचे समाजशास्त्रीय विश्लेषण' हा निबंध सादर केला. जातीव्यवस्थेचे स्वरूप गुंतागुंतीचे असून जातीअंतर्गत गटात इतकी विविधता आढळते की, कोणत्याही एका सिध्दांताच्या आधारे जातीव्यवस्थेची उत्पत्ती शोधता येणार नाही याची जाणीव घुर्ये यांना होती. असे नमूद करून जातीव्यवस्थेच्या उत्पत्तीच्या संबंधात अचूक आणि निश्चित स्वरूपाचे विधान मात्र डॉ. घुर्ये यांनी क्वचित केले आहे हे डॉ. उत्तम भोईटे यांचे मत उद्धृत केले. डॉ. घुर्ये यांनी जातीव्यवस्थेच्या केलेल्या विश्लेषणाला काही मर्यादा आहेत. घुर्ये यांची अभ्यासपध्दती ही इंडालॉजीकल असल्याने त्यांचे बरेचसे लेखन हे वर्णनात्मक आहे. त्यांच्या लेखनात सैध्दांतिक अन्वेषण आढळत नाही. तथापि त्यामुळे घुर्येच्या अध्ययनामुळे जातीवरील समाजशास्त्रीय अध्ययनाला एक दिशा मिळाली असे डॉ. आगलावे यांनी नमूद केले. या सत्राचे अध्यक्ष प्रा. बी. एस. बावीस्कर यांनी या सत्राचा समारोप केला. डॉ. घुर्ये हे संस्कृतचे गाढे अभ्यासक असल्याने त्यांनी आपल्या

समाजशास्त्रीय लेखनामध्ये वेद वाड:मयाचा विपुल आधार घेतला. डॉ. घुर्ये यांनी स्वत: कधी क्षेत्र–कार्य पध्दतीचा फारसा अवलंब केला नाही. पण त्यांनी छोटया छोटया मुद्यांच्या स्पष्टीकरणासाठी जास्तीत जास्त तथ्यसंकलनावर भर दिला. त्यांचे कास्ट ॲंड रेस इन इंडिया, शेडुल्ड टाईब्स, कल्चर ॲण्ड सोसायटी, आफटर अे सेंचुरी ॲण्ड ए क्वॉर्टर, इत्यादी ग्रंथ अभिजात समजले जातात, असे सांगून डॉ. घुर्ये यांच्या व्यक्तिगत जीवनातील एक संशोधक, शिक्षक, माणूस म्हणून वेगवेगळया अज्ञात पैलूंचे केलेले विश्लेषण म्हणावे लागेल. डॉ. गोविंद गारे यांच्या अध्यक्षतेखाली 'महाराष्ट्रातील आदिवासींचे भवितव्य' या विषयांवरील सत्रामध्ये एकूण सहा शोध निबंध वाचले गेले. डॉ. वसंतराव वैद्य यांनी आपल्या निबंधात आदिवासींची सांख्यिकी माहिती देवून घटनात्मक पार्श्वभूमी विशद केली. केंद्रशासनाच्या धोरणाचा परिणाम आदिवासींच्या जीवनपध्दतीवर झाला. मानववंशशास्त्रज्ञ व समाजशास्त्रज्ञांच्या योगदानाचा आढावा होऊन खानदेशातील भिल्ल सेवा मंडळ, डांग सेवा मंडळ, इत्यादी स्वंयसेवी संस्थानी आदिवासींमधील शैक्षणिक, आर्थिक, आरोग्यविषयक,नशाबंदी इत्यादीबाबत केलेल्या कार्याची नोंद घेतली. आधुनिक काळात महाराष्ट्र शासनाने आदिवासी उपाययोजना, आदिवासी विकास महामंडळ इत्यादींद्वारे आदिवासींच्यासाठी केलेल्या प्रयत्नांची चर्चा करून शेवटी आदिवासींच्या भवितव्याबाबत समाजशास्त्राच्या अभ्यासकांची कोणती भूमिका असावी याकडे लक्ष वेधले.

डॉ. प्रकाश बोबडे यांनी 'मेळघाटातील कोरकू आदिवासींच्या जीवनावर काठीयावाडी लोकांचे झालेले परिणाम' या विषयांवर स्वानुभावाधिश्ठित शोधनिबंध सादर केला. त्यांच्या अभ्यासाला प्रत्यक्ष क्षेत्र कार्याची जोड असल्याने त्यांचे निवेदन वस्तुनिश्ठ व आत्मविश्वासपूर्ण झाले. १९७० च्या दुश्काळात ५० काठीयावाडी कुटुंबे आपल्या गायींसाठी मेळघाटात स्थलांतरीत झाली. त्यांच्या गायींची संख्याच १० हजारावर होती. या गायींनी कोरकूंच्या जमीनी, चारा इ. वर आक्रमण केले. दुध सोसायटयांमूळे सत्ताकेंद्रे निर्माण झाली. कोरकुना १० वर्ष पुरणारी वैरण एकाच वर्षात संपू लागली. जंगल संपत्तीचा –हास झाला. वार्शिक तीन–चार कोटीची दुधाची उलाढाल करणाऱ्या काठीयावाडीमुळे आदिवासींच्या जीवनावर काही परिणाम झाला नाही. उलट सत्ताकेंद्राची निर्मिती, वन संपत्तीचा –हास, दहशतवाद इत्यादी मुळे आदिवासी होते तिथेच राहीले. आदिवासींना कर्ज हेच काठियावाडी देतात आणि त्यांचे तंटे बखेडेपण सोडवितात. आदिवासींच्या समस्यांची तीव्रता ही स्थलांतरितांच्या संख्येनुसार बदलते असे त्यांनी दृष्टोत्पत्तीस आणले.

प्रा. एस. एल. मोहिते यांनी आदिवासींच्या भवितव्याचा विचार करतांना तो भारतीय समाजाचा एक अविभाज्य भाग समजून केला पाहिजे असे प्रारंभीच सांगितले. शासकीय विकासाच्या खावटी कर्ज, पतपुरवठा, मोफत विद्युतपंप, शिक्षणसंस्थातील सवलती इत्यादीबरोबरच स्वयंसेवी संस्थानी आदिवासींसाठी चालविलेले प्रयत्न विचारात घेतले तर आदिवासींचे भवितव्य चांगले आहे, असा आशावाद प्रकट केला. प्रा. सौ. मंगला पाटील यांनी राज्य व केंद्र शासनाकडून राबविल्या जाणाऱ्या योजनांतील त्रुटींकडे लक्ष वेधले. बिगर आदिवासींचे हितसंबंध, आदिवासींची उदासीनता इ. मुळे आदिवासींच्या विकास कार्यक्रमात अडचणी येतात असे नमूद करून आदिवासींच्या परंपरा व प्रगतीचा मेळ घालण्याची निकड प्रतिपादन केली. डॉ. सुनील मायी यांनी नंदूरबार तालुक्यातील धारोरा गावातील भिल्लांबाबत विशेषत: त्यांच्यातील अपहरण विवाहप्रथा, उच्च जनन व मृत्यूदर, आत्महत्या, विवाहपूर्व प्रसुती इ. बाबतची काही निरीक्षणे नोंदविली. तथापि या निरीक्षणांना वस्तुनिष्ठ तथ्यांची, सांख्यिकी पुराव्याची जोड देण्याची आवश्यकता चर्चेमध्ये प्रतिपादन केली. प्रा. रूक्मिणी नाईक–पवार यांनी आदिवासी बंजारांची सद्यस्थिती व परिवर्तनाची दिशा या शोधनिबंधामध्ये बंजाराची ऐतिहासिक पार्श्वभूमी, जातीय संघटन इ. चा आढावा होऊन साक्षरतेचा प्रसार, सुसंवाद साधण्याची गरज, समूह सहभाग वाढविणे, सांस्कृतिक मूल्यांची जपणूक करणे, इत्यादींची निकड प्रतिपादन केली. दारू पिणारे प्रतिश्ठित आणि गाळणारे मात्र गुन्हेगार ही कल्पना बदलून बंजारांना दारू गाळायला सरकारने परवानगी दिली पाहिजे असे मत नोंदिविले. या सत्राचे अध्यक्ष डॉ. गोविंद गारे यांनी या सर्व शोधनिबंधावर मत प्रदर्शन करतांना नेमके वर्मावरच बोट ठेवले. चर्चा आदिवासींच्या समस्यांची नव्हे तर भवितव्याची अभिप्रेत होती. १९०५ साली ना. गोखल्यांनी सर्व्हंट ऑफ इंडियाची स्थापना केल्याचे सांगून स्वयंसेवी संस्थाचा इतिहास फार जुना असल्याचे प्रतिपादन केले. भारतातील बहुतेक आदिवासी क्षेत्रांवर बाहय लोकांनी आक्रमण केले आहे. सुरत–धुळे रेल्वे झाली आणि निम्मा धुळे जिल्हा बिगरआदिवासी झाला. बाहेरील लोकांनी आदिवासींच्या शोषणाला सुरूवात झाली. हे शोशण वाढतच गेले असे नमूद करून या सत्राचा समारोप केला.

'मराठी संस्कृती: नागरी व ग्रामीण' या विषयांवर तिसरे सत्र संपन्न झाले. नागपूर विद्यापीठाचे प्रा. टी. जी. मेश्राम या चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी होते. प्राचार्य भा. कि. खडसे यांनी प्रारंभीच मराठी नागरी संस्कृतीवरचा हा निबंध आहे, शोधनिबंध नव्हे हे सांगून संस्कृतीबाबतची क्रोबर, इरावती कर्वे इ. ची मते उद्धृत केली. सांस्कृतिक भिन्नतेस भाषाभेद हे मुख्य कारण असून महाराष्ट्रात स्थायिक झालेल्या विविध जनसमुदायांनी मराठीचा स्वीकार दोन प्रकारे केला आहे. एक व्यवहार भाषा म्हणून आणि काही जनसमुहांनी नातेवाईकांच्या गटातील आणि व्यवहारातील भाषा म्हणून मराठी आत्मसात केले आहे. मराठी संस्कृतीचे आदिवासी संस्कृती, ग्रामीण संस्कृती आणि मराठी नागरी संस्कृतीचा विचार करतांना समाजरचना, अर्थकारण, राजकारण, धार्मिक जीवन तसेच सांस्कृतिक जीवनावर लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता प्रतिपादन करून बहुजिनसीपणा, सामाजिक स्तरीकरण, गतीशीलता, सामाजिक मूल्ये, विवाह–कुटुंब, स्त्री जीवन, सांस्कृतिक जीवन इत्यादी विविध पैलूंचा उहापोह केला. मराठी संस्कृती सर्वत्र सारखी नसली तरी संस्कृतीला गतीमान करणारी बहुतांशी केंद्रे नागरी जीवनात असल्यामुळे मराठी नागरी संस्कृती महाराष्ट्र संस्कृतीला दिशा देण्याचे कार्य करीत असल्याचे स्पष्ट केले. प्रा. डॉ. सुधा काळदाते यांनी 'मराठी संस्कृती: प्राचीन काळापासून आजतागायत' हा एक मराठी संस्कृतीचा आलेखच मांडणारा अभ्यासपूर्ण शोधनिबंध सादर केला. महाराष्ट्राची

प्रादेशिक संस्कृती निर्माण होण्यामध्ये आणि शेकडो वर्ष टिकून राहण्यामध्ये नैसर्गिक, ऐतिहासिक, भाषिक आणि सांस्कृतिक घटकांचा फार मोठा वाटा आहे. कोकण, विदर्भ, खानदेश आणि दक्षिण महाराष्ट्र या चार विभागात विविधता असलेली सांस्कृतिक वैशिष्टये जोपासली गेली. परंतु या विविधतेत महाराष्ट्रीय संस्कृती टिकून राहिली. इथला इतिहास भूगोलाशी जोडलेला आहे. इ. स. पू. २३० पासून सातवाहन राजापासूनचा पेशवाईपर्यंतच्या इतिहासाचा आढावा होऊन 'राजकारण्यामधली फूट हे पेशवाईच्या अंताला कारणीभूत ठरले. हेच कारण आज दोनशे वर्षानंतरही प्रभावी राहिले आहे' असे मत व्यक्त केले. स्वातत्र्यंपूर्व काळात महाराष्ट्रातील समाजसुधारकांच्या कार्याचा परामर्श होऊन स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील राजकीय चळवळीच्या संदर्भात महाराष्ट्रातील असमतोल विकासाकडे लक्ष वेधले. भाषिकदृश्टया मराठी संस्कृती वैशिश्टयपूर्ण असून ती भाषेवरूनच ओळखली गेली, कारण मराठी संस्कृतीला आणि पिढयानपिढया नांदलेल्या लोकांना वंशवादाचा शाप नाही. कारण येथील माणसांमध्ये वांशिक लक्षणे स्वतंत्र अशी नाहीत. येथील संस्कृती उत्तर दक्षिण संस्कृतीच्या संगमातून विकसित झाली. ओवी, काव्य, नाटय, तमाशा, लावणी, गण–गवळण, पोवाडा, वग ही महाराष्ट्राची मराठी भाषेत लिहिलेली, गायलेली सांस्कृतिक वैशिष्टये जपण्याचे कार्य आजतागायत चालू आहे. तथापि, वाङ:मय, साहित्य, कला, या व्यतिरिक्त मराठी माणसाची संस्कृती आणि समाजनिती अजूनही जूनाटच राहीली. या त्यांच्या मतांच्या पुश्टयार्थ ते भूकंपग्रस्त भागातील निरिक्षण नोंदवितात. भूकंपानंतर ६० टक्के विधुरांचे विवाह झाले. पण एकही विधवा विवाह झाला नाही. वैचारिक आणि मानसिक आधुनिकता असलेली मंडळी कमी आणि पारंपारिक उत्सवप्रियता व सर्वसामान्य जीवनात उदासीनता जपणारी मंडळी अधिक अशी परिस्थिती असल्याने सामाजिक न्यायासह टिकावू विकास येथे परिवर्तन घडवून आणेल की नाही, याबदद्ल सुधाताईंनी साशंकता व्यक्त केली. प्रा. स्मिता अवचार यांनी संस्कृती हा दोन पिढयांना जोडणारा सेतू असून मराठी कुटुंबात संघर्ष व संस्कृती या दोन्हीची तडजोड होते. ब्राम्हण व मराठयात हुंडयाचे प्रस्थ फार आहे, असे इरावती कर्वे यांनी १९५१ मध्ये म्हटले आहे. तथापि आज महाराष्ट्रात सर्वच जातीमध्ये ते वाढले असल्याचे निदर्शनास आणून ते शृंगारप्रधानता, भोगप्रधानता या पेशवाईच्या वैशिश्टयांचा उल्लेख करून आज घरात आणि बाहेरही स्त्री बळी ठरते. चंगळवादाचे मूल्य रूजविले जाते. मराठी संस्कृतीविरूध्दची मूल्ये रूजविली जातात. स्त्रियांबाबतचे गुन्हे वाढत आहे. इथे गुरू हा 'माऊली' होतो. पण खऱ्या माऊलींचे काय? स्मिता अवचारांचे विचार अंर्तमुख करायला लावणारे होते. या निबंधावर चर्चा करतांना डॉ. बावीसकर म्हणाले की, 'महाराष्ट्राबाहेर गेलो तर खरी मराठी संस्कृती समजते. मी गेली चाळीस वर्ष महाराष्ट्राबाहेर राहतो. महाराष्ट्रात जेवढे समाजसुधारक झाले व त्यांचा जेवढा प्रभाव महाराष्ट्रात पडला तेवढा इतर प्रातांत पडलेला दिसत नाही. पुण्यातल्या स्त्रिंया आत्मविश्वासाने स्कूटरवर फिरू शकतात. दिल्लीत हे दृश्य दुर्मिळ आहे. रात्रीचा सिनेमा पाहून स्त्रिया आपल्या घरी फक्त गुजरातमध्ये परतू शकतात. आम्ही शिवाजी महाराज, यशवंतराव चव्हाण यांचा खूप अभिमान बाळगतो. पण मनासारखे घडत नसले तर 'आम्हाला दिल्लीत कुणी विचारीत नाही' असे म्हणतो. याचा अर्थ आमच्यात अहंभाव तरी आहे किंवा न्यूनगंड तरी आहे. याच्या जोडीला मराठी संस्कृतीतील काही मोजक्या नकारात्मक बाबींकडे त्यांनी लक्ष वेधले. 'मराठी माणूस अल्पसंतुश्ट आहे. गांव, तालुका, जिल्हयापलीकडे जायला तो तयार नाही. आमच्या दिल्ली विद्यापीठात संबंध भारतातून विद्यार्थी येतात पण महाराष्ट्रातून किती येतात? गुजराथेतील एका खेडयातील चाळीस कुटुंबे परदेशात गेली. त्यांच्याकडे एंटरप्रिन्यूरशीप आहे.' डॉ. बावीसकरांनी सर्वांनाच अंतर्मुख केले.

'महाराष्ट्रातील स्वातंत्र्योत्तर काळातील सामाजिक चळवळी' या विषयांतर्गत स्त्री, पर्यावरण व युवकविषयक चळवळीवर सौ. सुधा काळदाते यांच्या अध्यक्षतेखाली चर्चा झाली. या सत्रात प्रा. माणिक माने यांनी 'स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील युवक चळवळी' या विषयावरील आपला आधारभूत निबंध वाचला. या निबंधाच्या पूर्वार्धात त्यांनी युवक चळवळींची सैध्दांतिक बाजू, चळवळीचे प्रकार व चळवळींबाबातच्या सिध्दांताचा विचार केला. तर उत्तरार्धात युवकांच्या चळवळीचे स्वरूप समजावे म्हणून अ.भा. वि.प. विद्यार्थी चळवळ, युक्रांद, दलित पॅंथर व आदिवासींमधील चळवळींचा आढावा घेतला. आशिया खंडातील सर्वात मोठे व जुनी असलेल्या अ.भा.वि.प. ला बहुजन समाजातील युवकांना का आकृश्ट करून घेता आले नाही? युक्रांदसारख्या चांगल्या आश्वासक चळवळी का फुटतात? दलित पॅंथर महारेत्तर समाजांना का आकृष्ट करून होऊ शकली नाही? असे प्रश्न उपस्थित करून या युवक चळवळीचे मूल्यमापन केले.

'स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील स्त्रियांच्या सामाजिक चळवळी' या विषयावर प्रा. नीता साने यांनी आपला निबंध वाचला. स्वत: साने या एक चळवळीतील कार्यकर्त्या असल्याने त्यांच्या विचाराला अनुभवाची जोड असल्याचे जाणवले. त्यांनी १९२७ सालच्या अखिल भारतीय स्त्री परिषदेपासून आजपर्यंतचा स्त्रियांविषयक चळवळीचा ऐतिहासिक आढावा घेतला. स्त्रियांच्या वेगवेगळया प्रश्नांना हाती होऊन निर्माण झालेल्या तत्कालीन चळवळी उदा. महागाई प्रतिकार आंदोलने, देवदासी पुनर्वसन, बलात्कार विरोधीमंच, महिला दक्षता समिती, परित्यक्ता परिषद, स्वाधार उभ्या राहिल्या. १९८६ नंतरच्या काळात ही चळवळ कामगार, शेतकरी, कश्टकरी, आदिवासी, दलित, मुस्लिम यांच्यापर्यंत पोहचलेली दिसते. तथापि दलित, आदिवासी, मुस्लिम या तीनही घटकात स्त्री चळवळीने अपेक्षित जीव धरला नाही. स्त्री चळवळीत महाराष्ट्र अग्रेसर असला तरी गुन्हेगारी व स्त्रियांच्या असुरक्षिततेत महाराष्ट्राचा देशात तिसरा क्रमांक आहे. याचे भान ठेवून स्त्री चळवळ अधिक जागरूकपणे चालविण्याची गरज असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.

प्रा. राजेंद्र पाटील यांनी महाराष्ट्रातील परित्यक्ता स्त्रियांची चळवळ आणि शासनाच्या महिला धोरणातील परित्यक्त्या स्त्रियांच्या संदर्भातील तरतुदींचा आढावा घेतला. प्रा. पी. के. कुळकर्णी यांनी 'पर्यावरण एक सामाजिक चळवळ' या विषयांवर चर्चा करतांना निसर्गनिर्मित व मानवनिर्मित असे पर्यावरणाचे दोन प्रकार सांगून पर्यावरण प्रदूशणाची कारणे व क्षेत्रे यांचा विचार

केला. भारतात झालेल्या चिपको चळवळ, अप्पीको चळवळ, नर्मदा बचाव, तेहरी प्रकल्प इत्यादींची चर्चा करून शेवटी पर्यावरण संरक्षणासाठी समाजाच्या विविध स्तरात काय प्रयत्न केले पाहिजेत याबाबत काही सूचना केल्या. याच सत्रांमध्ये सुरतच्या बाबा काझी यांचा 'मुस्लिम सत्यशोधक समाज' या विषयांवर पेपर सादर झाला. तसेच पर्यावरण विषयक चळवळींवर डॉ. एस. पी. पुनाळेकर यांचा निबंध त्यांच्या अनुपस्थितीत वाचून दाखविण्यात आला. या सत्रातील निबंधावर चर्चा करतांना या चळवळीचे आयडिऑलॉजिकल ओरिएंटेशन कोणते? असा प्रश्न प्रा. श्रीकांत यांनी उपस्थित केला. तर नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. पु. ल. भांडारकर यांनी चळवळी का फुटतात? या प्रा. माने यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या अनुरोधाने मार्मिक विश्लेषण केले. प्राचार्य माधव सोमण यांनी संघटनांना रचना आहे का? असा प्रश्न उपस्थित केला.

समारोप करतांना सुधाताई काळदाते यांनी 'युवक चळवळींना वैचारिक बैठक असायलाच हवी. घटनेने मानलेली सामाजिक मूल्ये त्यांना स्वीकारावी लागतील. संघटनात्मक ऐक्याअभावी संघटना फुटते' असे मतप्रदर्शन केले.

या चर्चासत्रानंतर अहेरी–भामरागड या आदिवासी प्रदेशात अभ्यास सहल आयोजित करण्यात आली होती. त्यांचे गोटुल हे युवागृहही प्रतिनिधींना पाहायला मिळाले. त्यामुळे आदिवासींच्या सांस्कृतिक जीवनाची जवळून ओळख झाली. हे अधिवेशन यशस्वी करण्यामध्ये मा.खासदार शांतारामजी पोटदुखे, प्राचार्य बाबासाहेब निंबाळकर आणि त्यांचे सहकारी यांनी परिश्रम घेतले.

अहवाल–प्रा. माणिक माने, वेणुताई चव्हाण महाविद्यालय, कराड.

परिषदेचे दहावे अधिवेशन :– मराठी समाजशास्त्र परिषदेचे दहावे अधिवेशन हुतात्मा बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमतनगर, जि. परभणी येथे १८ व १९ नोव्हेंबर, १९९५ रोजी यशस्वीपणे संपन्न झाले. समाजशास्त्राचे एक व्यासंगी, जाणकार प्राध्यापक व नाशिकच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. उत्तमराव भोईटे हे प्रमुख पाहुणे होते. डॉ. उत्तमराव भोईटे यांचा परभणी व मराठवाडयाशी असलेला ऋणानुबंध विचारात घेता त्यांना प्रमुख पाहुणे म्हणून अध्यक्षीय भाषणांसाठी निमंत्रित करून मराठी समाजशास्त्र परिषदेने औचित्य साधले. अधिवेशनाचे संघटक सचिव प्रा. एस. टी. मुळे यांनी प्रास्ताविक करून सर्व उपस्थितांचे स्वागत केले. मा. कुलगुरू भोईटे व मसप चे अध्यक्ष प्रा. डॉ. एस एन. पवार यांनी हुतात्मा बहिर्जी व स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमांना पुश्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन केले. प्रा. पंजाब अंभोरे व सहकाऱ्यांनी, 'अज्ञान की अंधेरो से हमे ज्ञान के उजालों की ओर ले चलो' हे स्वागतगीत सादर करून कार्यक्रमास योग्य अशी वातावरणनिर्मिती केली.

हुतात्मा बहिर्जी स्मारक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष मा. दत्ताजीराव अडकिणे यांनी स्वागतपर भाषणांमध्ये बदलत्या सामाजिक वास्तवाचा आढावा घेतला. 'समाज परिवर्तन होऊ लागले आहे, पण या बदलत्या सामाजिक परिस्थितीत समाज विघातक प्रवृत्तीचाही अभ्यास व्हायला हवा. समाजशास्त्राच्या अभ्यासकांनी या विघातक प्रवृत्ती टाळण्यासाठी काही उपाय सुचवावेत' असे आवाहन केले.

मसप चे सचिव डॉ. राजेंद्र पाटील यांनी या परिषदेसाठी आलेल्या संदेशाचे वाचन केले. मा. मुख्यमंत्री मनोहर जोशी, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू मा. द. ना. धनागरे, प्रा. एम. जी कुलकर्णी, सुरतच्या सेंटर फॉर सोशल स्टडिज मधील डॉ. एस. पी. पुनाळेकर यांचे अधिवेशनाला शुभेच्छापर संदेश आले होते. त्यानंतर डॉ. राजेंद्र पाटील यांनी मसप च्या स्थापनेपासूनचा आढावा घेतला. आत्तापर्यंत समाजशास्त्रातील दिग्गज मानले जाणारे डॉ. विलास संगवे, डॉ. द. ना. धनागरे, डॉ. बी. एस. बावीसकर, डॉ. एस. पी. पुनाळेकर इ. नी अध्यक्षीय भाषण केल्याचे नमूद करून ही परंपरा समृध्द करणारे डॉ. उत्तमराव भोईटे हे प्रमुख पाहुणे लाभल्याबदद्ल आनंद व्यक्त केला. प्रा. एस. एन. पवार यांचे भाषण सर्वांना अंतर्मुख करणारे ठरले. प्रा. पवार म्हणाले, ''अत्यंत हुशार विद्यार्थी विज्ञान व तंत्रशाखेकडे वळतात. उरलेले विद्यार्थी आपल्याकडे येतात. युरोप–अमेरिकेत सर्व हुशार विद्यार्थी सर्वच ज्ञान शाखांमध्ये समान विभागले जातात. वास्तविक पाहता भारतामध्ये सामाजिक शास्त्रांमध्ये हुशार विद्यार्थ्यांना खूप वाव आहे. प्राध्यापकांना शिकवावेसे वाटत नाही. विद्यार्थ्यांना वर्गात बसावेसे वाटत नाही. उच्च शिक्षणामध्ये समाजशास्त्राला नवचैतन्य प्राप्त करून देणे यासाठी मराठी समाजशास्त्र परिषदेच्या सामायिक विचारपीठांवर आले पाहिजे.''

यानंतर कुलगुरू मा. उत्तमराव भोईटे यांचे अध्यक्षीय भाषण झाले. डॉ. भोईटे यांनी प्रारंभी हुतात्मा बहिर्जी शिंदे व स्वामी रामानंद तीर्थ यांनी केलेल्या असीम त्यागाला वंदन करून कृतज्ञता व्यक्त केली. डॉ. भोईटे यांनी आपल्या खुसखुशीत व नर्मविनोदी शैलीमध्ये प्रचलित सामाजिक वास्तव, समाजव्यवस्था व समाजशास्त्राचे अध्ययन, अध्यापन, व संशोधन याबाबत अभ्यासपूर्ण विचार मांडले.

अधिवेशनाच्या पहिल्या सत्रात डॉ. राम वाघ यांनी 'भूकंप: सामाजिक आंतराची संकल्पना' हा निबंध सादर केला. या निबंधात त्यांनी नांदुर्गा व त्या परिसरातील भूकंपाने झालेली हानी व भूकंपाच्या परिणामाचा प्रत्यक्ष निरीक्षण पध्दतीने सामाजिक अंतराची संकल्पना मांडली. गरीब वस्तीत व सिमेंटच्या घरात राहणाऱ्या लोकांचे मनुष्यहानीत प्रमाण जास्त आढळले. गावकऱ्यांच्या दृष्टीने शासनाची भूमिका चुकीची होती. राजकीय नेत्यांच्या भेटीमुळे गावाची नाकेबंदी केल्याने स्वंयसेवकांना मदतकार्य करता आले नाही. नाकेबंदीमुळे गावाची तीन भागात विभागणी झाली. मात्र भौतिक व मानसिक अंतर पूर्वीचेच राहिले. सोय लक्षात न घेता घरबांधणी झाली, त्यामुळे लोकांनी नव्या घरासमोर स्वत:ला हव्या त्या सोयी करून घेतल्या. पूर्वी केंद्रीभूत खेडी होती. आता मात्र रेशाकृती रचनेची खेडी निर्माण झाल्याचे डॉ. वाघ यांनी नमूद केले.

डॉ. चौधरी यांनी १२ भूकंपग्रस्त गावांचे सामाजिक स्वरूप हा निबंध सादर केला. हा अभ्यास मूलत: सांख्यिकी स्वरूपाचा होता. त्यात लोकसंख्येशी वाहनाचे, दुधाचे प्रमाण किती आहे वगैरे आकडेवारी होती.

प्रा. बोबडे यांनी या चर्चासत्राचा समारोप करतांना काही प्रश्न उपस्थित केले. आपत्तीच्या वेळी माणसाच्या मूलभूत सहजप्रवृत्ती काम करतात का? मृत्यू हे शाश्वत सत्य आहे, याचा विदारक अनुभव येऊनही किंवा मृत्यूच्या इतक्या जवळ जावूनसुध्दा माणसाच्या जाती, धर्म, समूहाबाबतच्या निष्ठा इतक्या चिवट का? इतकेच नव्हे तर त्यांच्या मातीशीही निश्ठा आहेत. पुनर्वसनाचा भाग म्हणून लोक दुसऱ्या गावातसुध्दा जायला तयार नाहीत. अडचणीत संदर्भहीनता निर्माण होते. पण नंतर संदर्भ शोधणे ही प्रवृत्ती असते. पुनर्विवाह करतात याचा अर्थ पुन: नवीन संदर्भ शोधतात. माणसाची प्रयत्न करण्याची प्रामाणिक इच्छा असते पण त्यात संघटनाचा अभाव असतो. हे किल्लारीच्या भुकंपाच्यावेळी जाणवले म्हणून प्रशिक्षण व्यवस्था केली पाहिजे. आपत्तीमुळे निर्माण होणाऱ्या समस्या बहुमितीय असतात. म्हणून सर्व तज्ञांनी एकत्र येऊन याचा विचार करावा. क्रायसिस मॅनेजमेंट हा विचार प्रत्यक्षात राबवायला हवा. अशाप्रकारे भूकंपासारख्या नैसर्गिक आपत्तीची समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विश्लेषण होऊन अभ्यासकांना याही क्षेत्रातील संशोधनाची नवीन प्रेरणा मिळाली. या चर्चासत्रात प्रा. पी. के. कुलकर्णी, प्रा. सौ. मनिशा राणे, शिवकुमार सोळुंके, प्रा. पी. एस. साळुंखे यांनी भाग घेतला.

या अधिवेशनामध्ये तिसरे सत्र हे खुले सत्र होते. मसप च्या अधिवेशनात पहिल्यांदा खुले सत्र देवून संयोजकांनी नवा स्वागतार्ह पायंडा पाडला. पीएच. डी. प्रबंधावर आधारित पेपर्स या सत्रात सादर करावेत असे आवाहन करण्यात आले. त्यामुळे असेल कदाचित, पण या सत्रातील पेपर्सचा दर्जा उच्च होता.

डॉ. राजेंद्र पाटील यांनी इचलकरंजीमधील कापड, साखर व इंजिनियरिंग या प्रमुख उद्योगधंद्यातील ३०२ कामगारांच्या मुलाखतीच्या आधारे केलेल्या अभ्यासातील निष्कर्ष सुसंगतपणे मांडले. 'औद्योगिक कामगारांची व्यावसायिक बांधिलकी : एक अध्ययन' या पेपरमध्ये त्यांच्या अध्ययनातील बहुतांश कामगारांनी कारखान्याच्या व शहरातील कामाला पसंती दर्शविली आहे. कारखान्यातील काम कंटाळवाणे असले तरी तेच काम जास्त समाधान देणारे वाटते. तसेच ते पूर्ण समाधानी असल्याचे आढळते. सर्वात जास्त कामगारांचे केंद्रीकरण उच्च बांधिलकी या वर्गवारीत आढळते. शहरी जन्मस्थान असणाऱ्या कामगारांची बांधिलकी खेडयातील जन्मस्थान असणाऱ्या कामगारांपेक्षा जास्त आढळली. शेतीविषयक पार्श्वभूमी नसणाऱ्या कामगारांची बांधिलकी शेतीविषयक पार्श्वभूमी असणाऱ्या कामगारापेक्षा जास्त आढळली. कमी शिक्षण, तांत्रिक शिक्षणाचा अभाव व कमी अनुभव असणाऱ्यांची बांधिलकी कमी असल्याचे आढळते, असे नमूद केले. डॉ. सर्जेराव साळुंखे यांनी 'स्थानिक पातळीवरील कामगार संघटनाचे नेतृत्व – स्वरूप आणि मर्यादा' हा निबंध सादर केला. कोल्हापूर आणि इचलकरंजी या दोन शहरातील औद्योगिक कामगार संघटनाचे नेतृत्व कामगार वर्गातूनच निर्माण होण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे हे नमूद करून या नेतृत्वाला काही मर्यादा असल्याने ते आत्मनिर्भर नसल्याचे सांगितले. अभ्यास केलेल्या कामगार संघटनाचे नेते हे प्रामुख्याने तरूण, विवाहित, हिंदूधर्मीय, शेतकरी कुटुंबातून आलेले, ग्रामीण पार्श्वभूमी असलेले होते. कामगार नेत्यांमध्ये राजकीय जाणीव असल्याचे आढळून आले. काही नेते कोणत्या ना कोणत्या राजकीय पक्षाचे क्रियाशील कार्यकर्ते होते. या नेतृत्वाच्या डॉ. साळुंखे यांनी काही मर्यादा पण स्पष्ट केल्या. त्यामध्ये प्रामुख्याने सापेक्षत: कमी शैक्षणिक पातळी, इंग्रजीचे अपुरे ज्ञान, परिणामी व्यवस्थापनातील उच्चशिक्षित अधिकाऱ्यांशी वाटाघाटी, चर्चा करतांना येणारी मर्यादा, कामगार संघटनेसाठी पुरेसा वेळ देता न येणे, कामगार संघटनाविषयक नेतृत्वाचे प्रशिक्षण नसणे, व्यवस्थापनाच्या दबावाखाली काम करावे लागणे, इ. असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. डॉ. शुभांगी गोटे यांनी 'भारतातील स्त्री गुन्हेगारी: समाजशास्त्रीय विश्लेषण' या विषयांवर अत्यंत अभ्यासपूर्ण, चिकित्सक निबंध नेटकेपणाने सादर केला. एकूण गुन्हेगारीमध्ये स्त्री गुन्हेगारीचे प्रमाण पुरूषांच्या तुलनेत कमी असून ती पुरूष गुन्हेगारीपेक्षा कमी घातक मानली जाते. त्यामुळे स्त्री गुन्हेगारी हे अभ्यासक्षेत्र जगात विशेषत: भारतात दुर्लक्षित राहिले असे सुरूवातील नमूद करून या विषयांची व्याप्ती आणि पार्श्वभूमी डॉ. गोटे यांनी विशद केली.

प्रा. जी. बी. माने यांनी 'पर्यावरण प्रदूशण : एक सामाजिक समस्या' हा विषय मांडला. मानवी वर्तन हेच पर्यावरण प्रदूशित करण्यास कारणीभूत आहे. भविश्यकाळात जमीन, हवा, पाणी या घटकांचा सुनियोजित वापर आणि व्यवस्थापन केले नाही तर मानवी जीवन धोक्यात येईल याचा विचार करून समाजशास्त्रज्ञांनी या प्रश्नांकडे लक्ष दिले पाहिजे असे आवाहन त्यांनी केले.

प्रा. माणिक माने यांनी 'मराठा : सिध्दांत आणि वास्तव' हा निबंध सादर केला. मराठा जातीत जन्मला तो मराठा, अशी अभ्यासाची चौकट मर्यादित करून मराठयांची पूर्वपीठिका व महाराष्ट्रातील त्यांचे लोकसंख्येतील स्थान याचा उहापोह केला. अगदी ग्रामपंचायतीपासून ते मंत्रिमंडळापर्यंत सर्वत्र मराठयांचा दीर्घकाळ सत्तेत सहभाग असूनही सर्वसामान्य मराठा हा उपेक्षितच राहिला. जमिनींच्या वाटण्या होऊन पुढच्या पिढीच्या वाटयाला फक्त बांधच येतील, असे सांगून छत्रपती शिवाजी महाराज, यशवंतरावजी चव्हाण यांच्यानंतर दखल घेण्यायोग्य नेतृत्व मराठयांच्यात निर्माण झाले नाही. जवळपास ९५ टक्के सहकारी साखर कारखाने मराठयांनी उभे केले, चालविले पण नाव घेण्यासारखे उद्योगपती निर्माण झाले नाहीत. साहित्य, कला, क्रिडा, संशोधन वगैरे क्षेत्रात दिसणारी नावेही अपवादात्मकच आहेत, असे त्यांनी नमूद केले.

सी. श्लेसिंगर, या मिशिगन विद्यापीठातील समाजशास्त्राच्या अभ्यासकाने मराठीत समाजशास्त्रावर बोलून सर्वांना आश्चर्याचा धक्काच दिला. १९७५ सालापासून ते सातारा जिल्हयातील खेडयातून सहभागी निरीक्षण पध्दतीने अभ्यास करीत आहेत. मला अजूनही येथील ग्रामीण समाजरचना समजली नाही. इथे वरची आळी, खालची आळी, मधली आळी आहे. मराठयांच्यात पाच कुळे, सात कुळे, ९६ कुळे आहे. पश्चिम महाराष्ट्रात गावागावात दोन मुलकी पाटील, पोलीस पाटील आहेत. प्रत्येक गावात दोन पाटर्या असतात. अजूनही भारतातील ग्रामीण समाज रचनेचे वर्णन पूर्णपणे केले जात नाही. ते झाले पाहिजे असे मत त्यांनी प्रदर्शित केले.

डॉ. स्मिता अवचार यांनी 'औरंगाबाद शहरातील व्यावसायिक व बिगर व्यावसायिक कामगारांच्या जीवनाचा अभ्यास' या निबंधामध्ये प्रारंभी येथील औद्योगिकीकरणाची व मराठवाडा आंदोलनाची पार्श्वभूमी विशद केली. प्रा. जे. पी. करवा हे या चर्चासत्राचे अध्यक्ष होते. प्रा. करवा यांनी या चर्चासत्राचा समारोप करतांना नवीन संशोधकांना मार्गदर्शन केले. यानंतर या अधिवेशनाच्या समारोपप्रसंगी मराठवाडयातील खासदार डॉ. बापूसाहेब काळदाते हे प्रमुख पाहुणे लाभले होते. बापूसाहेबांनी अधूनमधून खसखस पिकवीत तर कधी हास्याचे फवारे उडवत पण चिंतनप्रचुर असे विचार मांडले. अशाप्रकारे मसप चे दहावे अधिवेशन संपन्न झाले. हे अधिवेशन यशस्वी करण्यामध्ये संघटक सचिव प्रा. एस. टी. मुळे, प्रा. पंजाब अंभोरे, प्रा. वसमतकर, स्वंयसेवक कु. ज्योती, सुनीता कुटे पाटील, रेखा स्वामी, दैवशाला साठे इ. चे परिश्रम यशस्वी ठरले.

अहवाल—प्रा. माणिक माने, वेणुताई चव्हाण महाविद्यालय, कराड.

परिषदेचे अकरावे अधिवेशन :— मराठी समाजशास्त्र परिषदेचे ११ वे अधिवेशन टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे येथे ४ व ५ नोव्हेंबर, १९९६ रोजी संपन्न झाले. अध्यक्षस्थानी पुणे विद्यापीठाचे माजी विभाग प्रमुख व ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ. य. भा. दामले होते. कुलगुरू डॉ. उत्तम भोईटे, डॉ. पुनाळेकर, डॉ. बाविस्कर, डॉ. वाळूंजकर, डॉ. सुधा काळदाते, डॉ. अनुराधा भोईटे, डॉ. देशपांडे या ज्येष्ठ सदस्यांची उपस्थिती व चर्चेत त्यांचा सक्रीय सहभाग हे या अधिवेशनाचे वेगळे वैशिश्टय. अधिवेशनाच्या नेटक्या व आकर्शक आयोजनाबद्दल मराठी समाजशास्त्र परिषद कुलगुरू डॉ. वि. मा० बाचल, डॉ. हिरा अद्यंताया व त्यांच्या सहकाऱ्यांची आभारी आहे.

मराठी समाजशास्त्र परिषदेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. एम. जी. कुलकर्णी यांचे काही महिन्यापूर्वी दीर्घ आजारानंतर पुणे येथे निधन झाले. परिषदेला भक्कम पायावर उभे करण्यात डॉ. कुलकर्णी यांचा सिंहाचा वाटा होता. डॉ. एम. जी. कुलकर्णी यांच्या निधनाने परिषदेचा एक ज्येष्ठ मार्गदर्शक हरपला. परिषदेच्या व आपणा सर्वांच्या वतीने मी आपल्या शोक संवेदना श्रीमती कुलकर्णी यांना कळविल्या आहेत.

गेल्या नोव्हेंबर पर्यंत ५६ नवीन सदस्यांनी नोंदणी झाली होती. यावर्षी देखील साधारण तेव्हढीच सदस्य नोंदणी व्हावी असा आमचा प्रयत्न होता. परंतु यावर्षी केवळ ४० नवीन सदस्य आम्ही नोंदवू शकलो. परिषदेची एकूण सदस्य संख्या आता ६०० च्या घरात पोहचली आहे. सदस्य नोंदणीत कार्यकारिणीच्या सदस्यांचे मला पूर्ण सहकार्य मिळाले. गेल्या अधिवेशनात महाविद्यालये व विद्यापीठांचा आजीव सदस्य म्हणून नोंदवून घेण्यासंबधी विचार आला होता. आपल्या घटनेत तशी तरतूद आहे पण या संदर्भात मला फारसे काही करता आले नाही. यावर्षी पुन्हा तसा प्रयत्न करता येईल.

स्व. जय जोशी स्मृती पारितोषिकांकरीता यावेळी पुरेशी पुस्तके आली होती व संशोधनपर मराठी ग्रंथाच्या प्रकारात डॉ. लता मुरूगकर यांचे 'दलित पॅथर' हे पुस्तक होते. यावर्षीच्या पुरस्काराची घोशणा आम्ही मार्च ९७ मध्ये केली. पाठयपुस्तक गटात कोल्हापूरच्या डॉ. सर्जेराव साळुंखे यांच्या 'समाजशास्त्रातील मुलभूत संकल्पना' व डॉ. प्रदीप आगलावे, नागपूर यांच्या 'पाश्चात्य व भारतीय समाजशास्त्रज्ञ' या दोन पुस्तकांना १००० रूपयांचे हे पारितोषिक विभागून देण्यात आले. समाजशास्त्रातील संशोधनपर मराठी ग्रंथाचे १००० रूपयाचे पारितोषिक डॉ. लता मुरूगकर यांच्या 'दलित पॅथर चळवळ' या ग्रंथास मिळाले. या सर्व लेखकांचे मराठी समाजशास्त्र परिषदेतर्फे हार्दिक अभिनंदन. पुस्तक परीक्षणात डॉ. सुधा काळदाते व डॉ. भा. ल. भोळे यांनी दिलेल्या सहकार्याबदद्ल परिषद त्यांची आभारी आहे.

समाजशास्त्र संशोधन पत्रिका हा समाजशास्त्र परिषदेचा एक महत्वाचा उपक्रम. मार्च, १९९७ ला संशोधन पत्रिकेचा सहावा अंक प्रकाशित करून पत्रिका प्रकाशनातील सातत्य आम्हाला राखता आले. पत्रिकेचा अंक बहुतेक सर्व सदस्यांना मिळालाच असेल. पत्रिका दर्जेदार निघण्याच्या दृष्टीने आपल्या सूचना आम्हाला सहायक ठरू शकतील. अंक प्रकाशनाकरीता जाहिरात व देणगीच्या माध्यमातून निधी संकलीत व्हावा असा संकेत आहे. यावर्षी १० हजार रू. च्या जाहिराती आम्ही गोळा केल्या होत्या. पत्रिका प्रकाशनाकरीता ९ हजार रू. खर्च आला. १ हजार रू. आपल्याला पुढच्या अंकात वापरता येतील. यावर्षी साहित्य संस्कृती मंडळाकडे देखील आम्ही अनुदानाची मागणी केली आहे व १० ते १५ हजाराचे अनुदान मिळण्याची आम्हाला आशा आहे. यात यावर्षीचा अंक निघू शकेल. गेल्या अधिवेशनात पत्रिकेकरीता लेख पाठविण्याची विनंती मी सर्व सदस्यांना केली होती. काहींना स्वतंत्र पत्रे देखील पाठविली होती, पण म्हणावा तेवढा प्रतिसाद मिळाला नाही. उदयोन्मुख संशोधकांना आपले संशोधनपर निबंध प्रकाशित करता यावेत ही पत्रिकेमागची मूळ भूमिका आहे. या दृष्टीने यावर्षी मी आपल्या सहकार्याची अपेक्षा करतो. पत्रिकेचा आकार यावर्षी थोडा मोठा झाला. अनेकांना तो फारसा रूचला नाही असे माझे लक्षात आले. पुढील अंकाचे वेळी मी याबाबत आवश्यक ती काळजी घेईल. परिषदेने आत्तापर्यंत प्रकाशित केलेल्या ६ अंकात असे काही लेख आहेत जे स्पर्धा परिक्षेस बसणाऱ्या व संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरू शकतात. अशा लेखांचे पुस्तकरूपाने प्रकाशन करणे देखील शक्य आहे. अर्थात ही योजना आपल्या अनुमतीकरीता सविस्तर रूपाने मी मांडीनच. परिषदेला मिळणाऱ्या देणग्यांना आयकरातून सूट मिळण्याचे दृष्टीने एक अर्ज संबंधित कार्यालयाकडे केला आहे. पण अजून त्याबाबतचा आदेश प्राप्त झाला नाही पण लवकरच तो मिळेल अशी आशा आहे. गेल्या वर्षभरात अनेक सदस्यांचे, कार्यकारिणी सदस्यांचे मला सहकार्य मिळाले त्या सर्वांचे आभार मानून मी हा अहवाल येथेच संपवितो. धन्यवाद.

अहवाल—प्रा. प्रकाश बोबडे, सचिव, मराठी समाजशास्त्र परिषद.

१९९६ ते १९९८ अध्यक्ष — डॉ. पु. ल. भांडारकर, **सचिव** — डॉ. प्रकाश बोबडे, **कोषाध्यक्ष** — प्रा.मनोहर बुटे. **कार्यकारिणी सदस्य** — डॉ. शुभांगी गोटे, प्रा. एस. टी. फुले, डॉ. वसंत वैद्य, डॉ. हिरा अद्यांतया, प्रा. माणिक माने, प्रा. मनिशा राणे, प्रा. के. पी. सिरसाट, डॉ. एच. टी. पाटील, प्रा. विजय मारूळकर, प्रा. बाळासाहेब काझी. **कार्यालय,** समाजशास्त्र विभाग, संताजी महाविद्यालय, नागपूर. नागपूर विद्यापीठ, नागपूर.

परिषदेचे बारावे अधिवेशन :— मराठी समाजशास्त्र परिषदेचे १२ वे अधिवेशन गोगटे—जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी यांच्या विद्यमाने दि. ६ व ७ नोव्हेंबर, १९९७ रोजी संपन्न झाले. मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. स्नेहलता देशमुख या प्रमुख पाहुण्या म्हणून लाभल्या होत्या. प्रारंभी विजय रानडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी स्वागतगीत सादर केल्यावर मा. प्राचार्य सुभाश देव यांनी उपस्थित सर्व निमंत्रितांचे पुश्पगुच्छ देवून स्वागत केले. समाजाचे आरोग्य टिकवायचे असेल तर समाजशास्त्रीय अभ्यास झाला पाहिजे असे त्यांनी प्रतिपादन केले. यानंतर मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. स्नेहलता देशमुख, डॉ. सुधा काळदाते इ. नी दिपप्रज्वलन केले. उद्घाटनाची औपचारिक घोशणा डॉ. देशमुख यांनी केल्यावर प्रा. संजय जोशी यांनी सुधाताईंचा परिचय करून दिला. या अधिवेशनाच्या निमित्ताने कार्याध्यक्ष अरूआप्पा जोशी यांचे हस्ते स्मरणिकेचे प्रकाशन झाले. मसप चे सचिव डॉ. प्रकाश बोबडे यांनी अहवाल सादर केला. उद्घाटक डॉ. सौ. स्नेहलता देशमुख यांनी आपले पूर्वलिखित भाषण बाजूला ठेवून उत्स्फूर्तपणे आपले विचार मांडले.

समाजाची मानसिकता बदलण्यासाठी अशा परिषदा व्हायलाच हव्यात असे म्हणून त्यांनी या परिषदेच्या निमित्ताने चर्चिल्या जाणाऱ्या विषयांच्या संदर्भात विचार मांडले. नुसते मूल्याधिष्ठित शिक्षण नको, तर ते माय मराठीतूनच दिले पाहिजे. मूल्यांचे जतनीकरण हवे, नुतनीकरण नको. आपल्याला जे भावलं ते भाषांतरित करून लोकांपर्यंत पोहचविले पाहिजे. प्रत्येकान आपलं काम मनापासून करावे असे म्हणून त्यांनी 'सुजन असा पण कुजन मातता, हत्यार हातामध्ये धरा, सौजन्याच्या बुरख्याखाली शेपूट घालून पळू नका' या कुसुमाग्रजांच्या कवितेने केला.

त्यानंतर डॉ. बी. एस. बावीसकर यांच्या अध्यक्षतेखाली 'स्वातंत्र्योत्तर भारतीय समाज: पूर्वावलोकन आणि भवितव्य' या विषयावरील प्रथम सत्राला सुरूवात झाली. डॉ. एस.पी. पुनाळेकर यांनी आधारभूत शोधनिबंध सादर केला. स्वांतत्रयोत्तर ५० वर्षात काय मिळविले? काय हरविले? हरविले ते मिळविण्यासाठी काय केले? अशी विभागणी करून काही निरिक्षणे त्यांनी नोंदविली. डॉ. राजेंद्र पाटील यांनी स्वातंत्र्योत्तर भारतातील साक्षरता: पूर्वावलोकन' या शोधनिबंधात १९५१—९१ च्या आकडेवारीवर आधारित साक्षरतेचा आढावा घेतला. १९४७ नंतर स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांनी निरक्षरतेची समस्या सोडविली. परंतु त्यांच्या तुलनेत आपण 'सर्वांसाठी शिक्षण' या ध्येयापर्यंत पोहचू शकलो नाही या वास्वतेकडे लक्ष वेधले. डॉ. प्रदीप आगलावे यांनी आजही अस्पृश्यता आहे फक्त स्वरूप बदलल्याचे नमूद केले. प्रा. शिवकुमार सोळंकी यांनी 'पती—पत्नी संबधाचे पुनरावलोकन' हा शोधनिबंध सादर केला. प्रकाश पाटील यांनी बहुजनवादी राजकारणाचा परामर्श घेतला. फुले—शाहू—आंबेडकर ही विचारधारा केंद्रीभूत मानून होणारे राजकारण म्हणजे बहुजनधारी राजकारण असे त्यांनी म्हटले. हिंगोली येथे सती मंदीर बांधल्याचे सांगून परंपरावादी विचारसरणीचा प्रभाव आजही समाजमनावर आहे असे 'स्वातंत्र्योत्तर भारतीय समाजापुढील आव्हाने' या विषयावरील शोधनिबंध वाचतांना प्रा. आनंद अनभुले यांनी स्पष्ट केले. प्रा. भाऊराव खोब्रागडे यांनी स्वातत्र्यंपूर्वकालीन आणि नंतरच्या काळातील समाजशास्त्रीय संदर्भात भारतीय समाजाचा आढावा घेतला.

'कोकण विकास : कल्पना आणि वास्तव' या विषयांवर द्वितीय सत्र प्रोफेसर एस. एन. पवार यांच्या अध्यक्षतेखाली झाले. डॉ. के. के. खान यांनी आधारभूत शोधनिबंधाची सखोल व्यासंगपूर्ण मांडणी केली. 'कोकणवर नेहमीच अन्याय होतो असे नेहमीच म्हटले जाते', यात तथ्य आहेही आणि नाहीही. मी स्वत: २५ वर्ष कोकणात राहूनही मला स्वत:ला कोकण समजला नाही अशी सुरूवातीलाच कबुली देवून कोकणची भू—वैज्ञानिक वैशिष्टये स्पष्ट केली. स्थानिक बलाटी, खलाटी आणि डोंगर या कोकण विकासाच्या संदर्भात कोकण दरिद्री आहे, कोकणी माणूस आळशी आहे, कोकणचा कॅलीफोर्निया करायचा आणि कोकणचा अनुशेश हे पाच संभ्रम कोकणच्या भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक संदर्भात स्पष्ट केले. कोकणची भौगोलिक वैशिष्टये विचारात घेता कोकणसाठी एकच विकास योजना राबविता येत नाही. कोकणातील १५ ते ५५ वयोगटातील माणुस मुंबईला पोटापाण्यासाठी स्थलांतरीत झाला. कुळकायद्याचे गंभीर दुश्परिणाम झाले. संपातील गिरणीकामगार पुन्हा कोकणात आले आणि नवीनच प्रश्न निर्माण झाले. कोकणी माणसासारखी तडजोडीची वृत्ती महाराष्ट्रात कुठेच नाही. ते अत्यंत चिकित्सक आहेत. कोकणचा कॅलीफोर्निया कसला करताय? कॅलीफोर्नियाचाच कोकण व्हायला लागला आहे, इतके आपले लोक तिकडे आहेत. कोकणचा केवळ अनुशेशावर विकास होणार नाही तो गरजांवर आधारित झाला पाहिजे. कुमारीमाता, कौटुंबिक तणाव, सामाजिक तणाव आमच्या कोकणात नव्हते आता हे सगळे मुंबईहून कोकणात येत आहे. कोकणची स्त्री ही जास्त साक्षर आणि चिकित्सक आहे. कौटुंबिक निर्णय तीच घेते. कुटुंब तीच चालविते. विकासाच्या योजना हायब्रिड असतात. अनेक प्रश्न सोडविता सोडविता नवीन प्रश्न निर्माण झाले. कोकणात येणाऱ्या प्रत्येक योजनेला उदा. फिनोलेक्स, एन्रॉन. विरोधच झाला. अशाप्रकारे डॉ. खान यांनी कोकण विकासासंदर्भात अत्यंत अभ्यासपूर्ण असे विश्लेषण केले. यानंतर 'दक्षिण कोकणच्या विकासाची सामाजिक बाजू' हा शोधनिबंध प्रकाश पाटील यांनी सादर केला. कोकण विकास संकल्पना केवळ निवडणूकांच्या जाहिरनाम्यातील एक घोशणाच राहीली. येथील परिस्थितीला भौगोलीक, राजकीय तसेच सामाजिक स्थितीही कारणीभूत असून विशेषत: चाकरमानी संस्कृती, अतिचिकित्सक वृत्ती, सहकार प्रवृत्तीचा अभाव, जातीयवादाचे प्राबल्य आणि कोर्ट कचेरी इ. कारणे या परिस्थितीला जबाबदार असल्याचे नमूद केले. डॉ. अश्विनी आ. महाडेश्वर यांनी 'कोकण विकास: अपेक्षा आणि वास्तव' या शिर्शकाचा एक प्रदिर्घ आढावा घेतला. पौराणिक कालखंड, ऐतिहासिक कालखंडाची पाश्वभूमी सांगून शैक्षणिक, राजकीय, औद्योगिक, दळणवळण इ. च्या जोडीने दुग्धविकास, पशुपालन, मत्स्यव्यवसाय, व्यापार, पर्यटन आणि बंदरविकासाच्या प्रश्नांशी निगडीत सामाजिक तथ्यांचे विश्लेषण केले. या सत्रामध्ये सौ. पाठक, प्रा. सावंत, डॉ. श्रीरंग कजरेकर यांचेही शोधनिबंध सादर झाले.

'स्त्रियां आणि आरक्षण धोरण' हा तृतीय सत्राचा विषय होता. या सत्रांमध्ये डॉ. लेले हे अध्यक्ष होते तर श्रीमती शारदा साठे यांनी आधारभूत विचार मांडले. डॉ. लेले यांनी प्रास्ताविकांमध्ये 'सामाजिक कार्यकर्त्याच्या ठिकाणी अभिनिवेश किंवा एकांगीपणा चालू शकतो, समाजशास्त्रज्ञाच्या ठिकाणी तो असू नये' असे नमूद करून चर्चासत्राचा प्रारंभ केला. श्रीमती साठे यांनी स्त्रियांच्या आरक्षणाची पार्श्वभूमी स्पष्ट करून स्त्रियां राजकारणात कधी नव्हत्या? असा प्रश्न उपस्थित केला. स्त्रियांसाठी आरक्षण असावे काय? हा प्रश्नच उपस्थित होत नाही. स्त्रियांच्या आकांक्षामध्ये आता बदल होत आहेत. स्त्रियांचे राजकारण केवळ निवडणूकीपुरते मर्यादित नाही. स्त्रियांना माणूसपणाचे हक्क बजावता आले पाहिजेत असे त्यांनी नमूद केले. या अधिवेशनाच्या अध्यक्षा डॉ. सुधा काळदाते यांनी या विषयांवर विचार व्यक्त केले. आरक्षणाचे कवच केल्याने वंचित समूहांचा काही फायदा झाला का? असा प्रश्न उपस्थित करून त्याचे होकारार्थी उत्तर त्यांनी दिले. प्रतिष्ठेने जगता यावे म्हणून आरक्षण हवे. निवडणूकीच्या माध्यमातून पुरूषी मनोवृत्ती बदलता येईल असे म्हणून त्यांनी जिथे जिथे स्त्रिला आजपर्यंत संधी नाकारली तिथे तिथे आरक्षण हवे असे आग्रहपूर्वक प्रतिपादन केले. या सत्रात प्रा. सुमन मुडे यांनी नाशिक महानगरपालिकेतील २२ नगरसेविकांच्या प्रत्यक्ष मुलाखतीवर आधारित शोधनिबंध सादर केला. डॉ. अनुराधा सामंत यांनी कोल्हापूर शहरातील ५०–५० स्त्री व पुरूषांच्या अभ्यासावर आधारित 'महिला आरक्षण विधेयकासंबंधी नागरिकांमधील जागृती व प्रतिक्रिया' हा शोधनिबंध सादर केला. महिलांना मागीतल्याशिवाय काहीही मिळत नाही असे म्हणून आतापर्यंतच्या निवडणूकीतील आकडेवारीच्या सहायाने स्त्रियांच्या राजकीय सहभागाचे विदारक चित्र दाखविले. या संदर्भात स्त्रिंया आणि पुरूषांची आरक्षण विधेयकासंबधीच्या मतांचे विश्लेषण करून केले. शिक्षणामध्ये आरक्षण असू नये तेथे फक्त गुणवत्ता असावी असे मत व्यक्त करणाऱ्यांमध्ये बहुसंख्य मराठा, जैन व लिंगायत पुरूष होते. स्त्रियांची निवड फक्त लिंग व जातीच्या निकशांवर न करता त्यांच्या शैक्षणिक, शारिरीक, मानसिक सुदृढतेवर असावी, केवळ पैशाच्या जोरावर व घराणेशाही टिकविणारे आरक्षण नसावे असे मराठा व ब्राम्हण स्त्रियांचे मत होते. प्रा. एस. एन. गंदेवार यांनी सुध्दा आपल्या शोधनिबंधात स्त्रियांना केवळ आरक्षण देवून चालणार नाही तर आरक्षणांबरोबर संरक्षण देणेही अत्यंत आवश्यक आहे. शासनाचे आरक्षण धोरण स्त्री मुक्ती चळवळीस कितपत पूरक आहे हे तपासून पाहण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले. प्रा. कमल बन यांनी विविध क्षेत्रांतील स्त्रियांची पिछेहाट, अत्याचार इ. मुळे आरक्षणाची गरज आहे असे सांगीतले. सौ. अर्चना कांबळे यांनी 'ग्रामपंचायतीतील महिला सदस्यांचा सहभाग' हा शोधनिबंध सादर केला. तसेच प्रा. दा. धो. काचोळे, कोल्हटकर, अशोक सालोटकर यांनी आपले शोधनिबंध या सत्रात सादर केले.

या अधिवेशनात 'समाज आणि साहित्य' या विषयांवर चवथे सत्र झाले. डॉ. एस. पी. पुनाळेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सत्रांमध्ये नागपूरचे प्रा. प्रकाश बोबडे यांनी आधारभूत निबंध वाचला. 'भाषा ही एक जैवसामाजिक वास्तविकता असून सामाजिक जीवनाचे ते एक अविभाज्य अंग आहे तसेच सामाजिक आंतरक्रियांचे ते प्रभावी साधन आहे' असे प्रारंभीच नमूद करून साहित्य व समाज यातील परस्परसंबधाचे विश्लेषण करणारे एच. डी. डंकन यांचा आंतरक्रिया दृष्टिकोन, जॉर्ज हुको यांचा सामाजिक संघटनात्मक दृष्टिकोण स्पष्ट करून संस्कृती ही साहित्य निर्मितीचा उगमस्त्रोत कशी असू शकते? हे स्पष्ट केले. साहित्य ही एक सामाजिक प्रक्रियाच आहे. सामाजिक वास्तव लेखकांच्या मनात एक असहय असा मानसिक ताण निर्माण करते तेंव्हा उच्च प्रतीच्या साहित्याची निर्मिती होते. समाजाचा एक सदस्य म्हणून साहित्यिकांचे व्यक्तिमत्व, त्यांची संवेदनक्षमता समाजच घडवत असतो व हाच साहित्यिक पुढे त्यांच्या क्षमतेनुसार समाजचित्रण करतो.

या सत्रात प्रा. मनिशा राणे यांनी समाज आणि साहित्य यांच्या परस्परसंबंधाची चर्चा करून हे कार्य समाजशास्त्रज्ञांआधीही समीक्षकांनी केल्याचे नमूद केले. महानुभाव साहित्यात तत्कालीन समाजजीवनाची आपल्याला माहिती मिळते. तथापि साहित्य हे तत्कालीन समाजजीवनाचे प्रतिबिंब पूर्णपणे आहे असे म्हणता येणार नाही. प्रा. जे. पी. करवा यांनी 'साहित्याला समाजशास्त्रीय दृष्टीने अभ्यास करतांना काय आहे? यापेक्षा काय असावयास पाहिजे यावर भर देवून सामाजिक घटनांचे चिकित्सक विश्लेषण करणे आवश्यक आहे, असे प्रारंभीच नमूद केले. साहित्याला समाजनिरपेक्ष अस्तित्व असूच शकत नाही. आजच्या गतिमान युगात साहित्य आणि समाजाचा विचार नवीन पध्दतीने करणे अपरिहार्य ठरले आहे. कारण भविश्यकालीन समाजाची संरचना, समाजव्यवस्था आणि त्या काळातील प्रश्नांचा अंदाज बांधणे आज कठीण झाले आहे. 'विनोदी साहित्यातील स्त्री चित्रण' या शोधनिबंधात प्रा. मुमताज खान–देशपांडे यांनी स्त्रीची प्रतिमा डागाळली जाते. समाजाशी बांधीलकी या नात्याने विनोदी साहित्यात अश्लील वर्णनासाठी स्त्री चा वापर न करणे ही जेवढी लेखकांची जबाबदारी आहे तेव्हढीच अशा निकृश्ट विनोदी साहित्याचा निशेध करणे, त्यावर बहिश्कार घालणे ही जबाबदारी वाचकवर्गाची आहे, असे आवाहन केले. प्रा. मुरलीधर कोल्हटकर यांनी 'ग्रामीण जीवनाचे साहित्यातून दर्शन' या शोध निबंधामध्ये कोकणातील ओव्या, उखाणे, फुगडी, इतर गीतातून कोकणातील समाजजीवनाचे प्रतिबिंब कसे उमटले ते स्पष्ट केले. प्रा. सौ. सुहासिनी काहोक यांनी 'भाषा पदव्युत्तर विद्यार्थ्यांचे संपर्क माध्यम' हा प्रत्यक्षानुभवाधिश्ठित शोधनिबंध सादर केला. औद्योगिकरण, यांत्रिकीकीकरण व शैक्षणिक प्रगतीमुळे भाषेत व भाषेच्या प्रसारमाध्यमांत बदल झाला. १०० विद्यार्थ्यांच्या त्यांनी केलेल्या पाहणीत वृत्तपत्र, टी. व्ही. यासारख्यां प्रसार माध्यमांच्याबाबत विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रियांचे विश्लेषण केले. समायोजन साधण्यासाठी भाषा समाजाच्या विकासाप्रमाणे विकसित करणे गरजेचे आहे. बोलीभाषा समृध्द असेल तरच समाज निर्मित होईल व संस्कृतीचे प्रतिनिधित्व करू शकेल, असे मत व्यक्त केले. सदर सत्रात प्रा. के. आर. अहेर यांनी सुध्दा शोधनिबंध सादर केला.

गोगटे–जोगळेकर महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. सुभाश देव यांच्या अध्यक्षतेखाली या अधिवेशनाचा समारोप झाला. प्रा. प्रतिमा पवार यांनी प्रतिनिधींच्यावतीने प्रतिक्रिया व्यक्त केल्या. या अधिवेशनाचे एक वैशिश्टय म्हणजे तांदुळापासून केलेले खास कोकणी शाकाहारी भोजन आणि कोकणी लोककलांचे मनोवेधक दर्शन हे होते. प्रस्तुत अधिवेशन यशस्वी करण्यामध्ये प्राचार्य सुभाश देव, प्रा. संजय जोशी, प्रा. श्रध्दा राणे, इ. चे अनमोल सहकार्य लाभले. अतिशय सुंदर टीमवर्क या निमित्ताने अनुभवायला मिळाले.

अहवाल–प्रा. माणिक माने, वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड.

१९९८ ते १९९९ अध्यक्ष – डॉ. पु. ल. भांडारकर, **सचिव** – डॉ. प्रकाश बोबडे, **कोषाध्यक्ष** – प्रा.मनोहर बुटे. कार्यकारिणी सदस्य – डॉ. दा. धो. काचोळे, प्रा. बा. गो. आंबेकर, प्रा. रा. वा. कोल्हे, प्रा. अंजली पळनीटकर, प्रा. एन. डी. जत्राटकर, प्रा. एन. आर. चौधरी, प्रा. सुनालीनी सत्तूर, प्रा. संजय जोशी, प्रा. र. ह. वाघ, प्रा. विजय मारूळकर, प्रा. आम्रपाली. **कार्यालय,** समाजशास्त्र विभाग, संताजी महाविद्यालय, नागपूर. नागपूर विद्यापीठ, नागपूर.

परिषदेचे तेरावे अधिवेशन:– मराठी समाजशास्त्र परिषदेचे तेरावे अधिवेशन दिनांक २७ व २८ ऑक्टोबर, १९९८ रोजी नागपूर विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाद्वारे नागपूर येथे आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनाचा अहवाल उपलब्ध होऊ शकला नाही. त्यामुळे तो इथे समाविष्ट करता आला नाही.

परिषदेचे चौदावे अधिवेशन:– मराठी समाजशास्त्र परिषदेचे चौदावे अधिवेशन दिनांक २१ व २२ नोव्हेंबर, १९९९ रोजी महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर येथे आयोजित करण्यात आले होते. सदर अधिवेशनाचा अहवाल उपलब्ध झाला नाही.

१९९९ ते २००१, अध्यक्ष – डॉ. आनंद आनभूले, **सचिव** – प्राचार्य राम वाघ, **कोषाध्यक्ष** – डॉ. श्रीकांत गायकवाड. सदर कार्यकारिणीच्या संदर्भात अधिक माहिती प्राप्त होऊ शकली नाही.

परिषदेचे पंधरावे अधिवेशन:– मराठी समाजशास्त्र परिषदेचे पंधरावे अधिवेशन दिनांक ३ व ४ नोव्हेंबर, २००१ महात्मा फुले प्रतिष्ठान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, आणि देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद येथे आयोजित करण्यात आले होते. प्रस्तुत अधिवेशनाचा अहवाल उपलब्ध होऊ शकला नाही.

२००१ ते २००६, अध्यक्ष – डॉ. सुरेश वाघमारे, **सचिव** – प्रा. वैजनाथ मलशेटट्टे, **कोषाध्यक्ष** – डॉ. शिवाजी गायकवाड. **कार्यकारिणी सदस्य** – डॉ. मृणालीणी सत्तुर, पुणे. डॉ. जगन्नाथ कराडे, पुणे. प्रा. किशोर राउत, अमरावती. डॉ. विवेक प्रेमसागर, मुंबई. प्रा. मनिशा राणे, नाशिक. डॉ. स्मृती भोसले, मुंबई. डॉ. प्रदीप आगलावे, नागपूर. प्रा. एम. आर. पाटील, सोलापूर. प्रा. माणिक माने, कोल्हापूर. डॉ. विजयकुमार सुर्यवंशी, परभणी. डॉ. जी. बी. माने, उमरगा. प्रा. किरण सुरवसे, पुणे. प्रा. डी. एम. महाकाळे, वर्धा. प्रा. जी. एस. वेल्हे, अमरावती. प्रा. एन. जी. पाटील, जळगांव. डॉ. नलिनी औरंगाबादकर, सोलापूर. प्रा. प्रियदर्शन भवरे, जालना. प्रा. एस. एन. गंदेवार, उदगीर. **कार्यालय** – डॉ. सुरेश वाघमारे, 'साकेत', प्रकाश नगर, लातूर.

सन २००२ मधील मराठी समाजशास्त्र परिषदे च्या अधिवेशना संदर्भात माहिती उपलब्ध होऊ शकली नाही.

परिषदेचे सोळावे अधिवेशन:– २७, २८ नोव्हेंबर, २००३, बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना.

XVI Marathi Samajshastra Parishad Conference of Maharashtra Samajshastra Parishad was held on 27 and 28 of November 2003 at Mahyco Research Foundation Trust's Badarinarayana Barwale College of Arts and Science. Jana. The theme of the conference was Crisis in Higher Education with sub themes such as Collective Violence against Dalits and Women. Dr. Ambedkar and Nationalism, Rajarshi Shahu Maharaj and Social Justice, Dr. Prakash Bobade, Former Head, Department of Sociology, Nagpur University inaugurated the Conference. There were four simultaneous sessions in which 80 papers were presented in the concluding session. Dr. Suresh Waghmare, President of Conference thanked the management of Barwale College and the delegates. In the valedictory session Dr. Gajanan Surase, Registrar of Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, emphasised that the sociologists have to play a vital role to lead the society in the right moral way.

२००४ व २००५ मधील मसप चे अधिवेशना संदर्भात माहिती उपलब्ध होऊ शकली नाही.

परिषदेचे सतरावे अधिवेशन:– मराठी समाजशास्त्र परिषदेचे सतरावे अधिवेशन दि. ६ व ७ जानेवारी २००६ ला एस. एन. मोर कला, वाणिज्य व श्रीमती जी. डी. सराफ विज्ञान महाविद्यालय, तुमसर येथे संपन्न झाले. या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून भारती विद्यापीठ, पुणे चे कुलगुरू डॉ. उत्तमराव भोईटे व उद्घाटक म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एस. एन. पठाण, स्वागताध्यक्ष गोंदिया शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष मा. पुरूषोत्तमजी मोर हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर, विचारधारा विभागाचे प्रमुख डॉ. प्रदीप आगलावे, समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. सुरेश वाघमारे, सचिव प्रा. वैजनाथ मलशेटट्टे उपस्थित होते.

प्रस्तुत अधिवेशनाच्या उद्घाटन प्रसंगी कुलगुरू डॉ. एस. एन. पठाण म्हणाले की, 'मराठी समाजशास्त्र परिषदेचे हे अधिवेशन इतर अधिवेशनापेक्षा वेगळे आहे. कारण या अधिवेशनात चर्चेला घेतलेला स्वायत्त शिक्षणाचा विषय हा वर्तमानकाळातील अत्यंत महत्वाचा असा विषय आहे. या विषयाच्या संदर्भात विशेषत: प्राध्यापकांनी अधिक सखोल चर्चा करणे आवश्यक आहे. भविश्यात शिक्षणाचे संपूर्ण खाजगीकरण होणार असल्याने यासंदर्भात मोठे क्रांतीकारी परिवर्तन घडून येणार आहे. आणि या परिवर्तनासाठी आपण आतापासूनच तयार असले पाहिजे.' या अधिवेशनाचे अध्यक्ष व भारती विद्यापीठ, पुणे चे माजी कुलगुरू, डॉ. उत्तमराव भोईटे अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, गेल्या काही दशकात उच्च शिक्षणाच क्षेत्रात मोठया प्रमाणात धक्कादायक अशा घडामोडी घडत आहेत. प्राध्यापक, महाविद्यालये आणि विद्यापीठे यांचा शैक्षणिक दर्जा व कार्यक्षमता वाढविणे आवश्यक

झाले आहे. लोकशाही कल्याणकारी शासन व्यवस्थेत सर्वांना आवश्यक ते उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शासनाची आहे, असे म्हटले जाते. स्वतंत्रता मिळाली तेंव्हा आपल्या देशात जेमतेम २० विद्यापीठे आणि १२० महाविद्यालये होती. ब्रिटीश सरकारने तीन विद्यापीठे १८५७ साली स्थापन केलेली होती. आज आपल्या देशात ३३० निरनिराळया प्रकारची विद्यापीठे व १६,००० पेक्षा जास्त महाविद्यालये व यात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ९.५ दशलक्ष इतकी आहे. या शिक्षण संस्थामध्ये ३,५०,००० प्राध्यापक असून आज आपल्या देशातील उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थाचे जाळे हे जागतिक पातळीवर तिसऱ्या क्रमांकावर आहे. उच्च शिक्षणाची संस्थारूपी वाढ जरी लक्षणीय असली तरी उच्च शिक्षण घेणाऱ्या वयोगटातील फक्त ७ टक्के तरूण उच्च शिक्षणाचा लाभ घेत आहेत. हे लक्षात घ्यायला हवे. आपल्या देशात उच्च शिक्षणाच्या खर्चाचा बराचसा भाग जरी शासन सहन करीत असले तरी गरिबीमुळे अनेक विद्यार्थ्यांना आपल्या कुटुंबांना आर्थिक सहकार्य देण्यासाठी शिक्षण अर्ध्यावर सोडून नोकरी, व्यवसाय किंवा मोलमजुरीकडे वळावे लागते. इतर देशाच्या तुलनेत ही स्थिती दयनीय वाटते. आतापर्यंत उच्च शिक्षणावर शासकीय तिजोरीतून मोठया प्रमाणात खर्च होत असे, परंतु अलिकडच्या काळात महाराष्ट्र शासनाने विद्यापीठे व महाविद्यालये यांना देण्यात येणाऱ्या अनुदानामध्ये मोठया प्रमाणात कपात केली आहे. या बाबतीत शासन दुहेरी अडचणीत सापडले आहे. एका बाजूला उच्च शिक्षण घेण्याची गरज व आकांक्षा असणाऱ्यांची संख्या वाढते आहे. तसेच ज्ञानाची नवनवीन दालने निर्माण होत आहेत. शिक्षणाची संधी जर समाजातील मोजक्यांनाच मिळाली व इतर त्यापासून वंचित राहिले तर समाजात 'आहे रे' व 'नाही रे' असे दोन परस्परांशी संघर्ष करणारे गट निर्माण होतील आणि सामाजिक स्वास्थ्याला बाधा निर्माण होईल. असा इशारा देवून ते पुढे म्हणाले, सध्या परदेशातील अनेक विद्यापीठे आपल्या देशातील उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात प्रवेश मिळावा, यासाठी धडपड करीत आहेत. जागतिकीकरणाचा हा एक अपरिहार्य परिणाम आहे, असे मानावे लागेल. ही बाबही त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून स्पष्ट केली. याप्रसंगी अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष मा. पुरूषोत्तमजी मोर यांनी मनोगत व्यक्त केले. उद्घाटन कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. आर. एस. फलझेले व कार्यक्रमाचे संचालन सहसंयोजक डॉ. राहुल भगत यांनी केले.

प्रस्तुत अधिवेशनाचे पहिले सत्र 'सामाजिक विज्ञानातील संशोधन व संशोधन पध्दती' या विषयांवर आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्राचे अध्यक्ष म्हणून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा. किशोर राउत यांनी विषयाची मांडणी केली. या चर्चासत्रात विद्याभारती महाविद्यालय, अमरावतीचे डॉ. अरूणसिंह चौहान, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, इस्लामपूर चे प्रा. पी. एस. साळुंखे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबादचे डॉ. पद्माकर सहारे, बयाबाई कदम कन्या महाविद्यालय, कडेगांवच्या डॉ. दयावती पडाळकर, डॉ. वेदप्रकाश मलवाडे, इत्यादी संशोधकांनी आपले शोधनिबंध सादर केले. या चर्चासत्राचे सूत्रसंचालन आनंद निकेतन महाविद्यालय, वरोरा येथील डॉ. रंजना लाड यांनी केले.

प्रस्तुत अधिवेशनाचे दूसरे सत्र ६ जानेवारी २००६ ला दुपारी ३.४० ते ५.१० या वेळात 'स्वायत्त शिक्षणाची संकल्पना: एक समाजशास्त्रीय अध्ययन' या विषयावर आयोजित करण्यात आले होते. 'स्वायत्त शिक्षण किंवा स्वायत्त महाविद्यालय ही संकल्पना आधुनिक जागतिकीकरणाच्या युगात शिक्षणाचा दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने एक आदर्श अशी संकल्पना आहे. स्वायत्ततेमुळे महाविद्यालयांचा व शिक्षणाचा दर्जा निश्चितच सुधारेल यात शंका नाही. परंतु स्वायत्ततेमुळे शिक्षण इतके महाग होईल की ते सर्वसामान्य लोकांच्या आवाक्याबाहेरचे होऊन सर्वसामान्य लोक शिक्षणाला पारखे होतील आणि शिक्षण केवळ पैसेवाल्यांचीच मक्तेदारी होईल. त्यामुळे स्वायत्त शिक्षणाच्या बाबत शासनाने पुन्हा विचार करणे आवश्यक आहे' असे स्पष्ट प्रतिपादन या चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानावरून बोलतांना लातूरच्या राजर्षी शाहू महाराज महाविद्यालयाचे समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुरेश वाघमारे यांनी केले. या चर्चासत्रात विषयाची मांडणी करतांना रा. तु. म. नागपूर विद्यापीठाचे समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बी. के. स्वांई यांनी असे प्रतिपादन केले की, 'शैक्षणिक स्वायत्तता सर्वकष कधीही चांगली राहणार नाही. यामुळे संपूर्ण शिक्षणाचे खाजगीकरण होऊन बहुतांश लोक शिक्षणापासून वंचित राहतील. विशेषत: उच्च शिक्षणाच्या बाबतीत स्वायत्ततेचे धोरण प्रचंड स्पर्धेला जन्म देईल व त्यातून एक नवा संघर्ष समाजात निर्माण होईल. त्यामुळेच या संकल्पनेचा नव्याने विचार होणे आवश्यक आहे.' या चर्चासत्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या माजी समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुधाताई काळदाते यांनीही आपले विचार व्यक्त केले. तसेच कला, वाणिज्य महाविद्यालय, बदनापूर, जालना चे प्रा. राहुल हजारे, आदर्श कला महाविद्यालय, निजामपूर धूळे येथील प्रा. सुधाकर एल. जाधव, मनोहरराव कामडी महाविद्यालय, नागपूरच्या प्रा. उज्वला कावरे, महिला महाविद्यालय, नंदनवन नागपूरच्या डॉ. सरोज आगलावे, फुलसिंग नाईक महाविद्यालय, पुसदचे डॉ. कल्याण साखरकर, प्रा. कमलताई तंबाखे, प्रा. सोनटक्के इत्यादींनी आपले शोध निबंध सादर केले. या चर्चासत्राचे सुत्र संचालन वसंतराव नाईक समाजविज्ञान संस्था, नागपूर चे प्रा. भाऊ दायदार यांनी केले. या चर्चासत्रात एकूण १२ प्राध्यापकांनी आपले शोधनिबंध सादर केले.

प्रस्तुत अधिवेशनाचे तिसरे सत्र दि. ७ जानेवारी २००६ ला सकाळी ९.०० ते १०.३० या वेळात 'विदर्भातील आदिवासींचा सामाजिक, आर्थिक दर्जा' या विषयांवर आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या माजी समाजशास्त्र विभाग प्रमुख व मराठी समाजशास्त्र परिषदेच्या माजी अध्यक्षा डॉ. सुधाताई काळदाते होत्या. विषयाची मांडणी दादासाहेब देवतळे महाविद्यालय, चामोर्शी चे समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बाबु कन्हाडे यांनी केली. या चर्चासत्रात अमरावतीच्या डॉ. मंगला तांबेकर, डॉ. वंदना गुडधे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभाग, रा. तु. म. नागपूर विद्यापीठाचे विभाग प्रमुख, डॉ. प्रदीप

आगलावे, आनंद निकेतन महाविद्यालय, वरोराच्या प्रा. रंजना लाड, इत्यादी प्राध्यापकांनी आपल्या शोधनिबंधाचे वाचन केले. या चर्चासत्राचे सूत्रसंचालन हिस्लॉप महाविद्यालय, नागपूर चे समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा. सत्येन भूषण यांनी केले.

अधिवेशनाचे चवथे सत्र दि. ७ जानेवारी २००६ ला सकाळी १०.४० ते १२.३० या कालावधीत '१९५६ च्या धर्मांतराचे सामाजिक जीवनावरील परिणाम' या विषयांवर आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी रा. तु. म. नागरपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभागाचे विभाग प्रमुख डॉ. प्रदीप आगलावे हे होते तर टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे चे डॉ. जगन कराडे यांनी या विषयाची मांडणी केली. सदर चर्चासत्रात मुक्तानंद महाविद्यालय, गंगापूर औरगांबादचे प्रा. ह. दा. मिसाळ, नागपूरच्या प्रा. प्रतिभा पटवर्धन, नाशिकच्या प्रा. सरीता जाधव, लातूर चे डॉ. सुरेश वाघमारे, सांगली च्या प्रा. सुजाता कराडे, अमरावती च्या प्रा. देविका ढंगारे, भारतीय महाविद्यालय, अमरावती चे प्रा. प्रदीप अंभोरे, औरंगाबादच्या प्रा. विभावरी सोमकुंवर, कोल्हापूर चे प्रा. कृष्णा निर्मळे, प्रा. सिंधू काकडे, नाशिक, पुणे विद्यापीठाचे प्रा. संजय कोळेकर, हदगांव जि. नांदेड चे प्रा. उल्हास कदम, देवगांव औरंगाबाद चे प्रा. नंदकुमार कुकलारे, मुंबई विद्यापीठाचे समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रल्हाद जोगदंड, खोलेश्वर महाविद्यालय, अंबेजोगाईच्या डॉ. विजया खंडाळे, इत्यादी प्राध्यापकांनी आपले शोधनिबंध सादर केले.

या चर्चासत्राचा समारोप करतांना चर्चासत्राचे अध्यक्ष डॉ. प्रदीप आगलावे सर्व शोधनिबंधाचा आढावा होऊन म्हणाले की, 'बाबासाहेबांच्या धम्मपरिवर्तनामुळे केवळ पूर्वीच्या अस्पृश्य व आत्ताच्या बौध्द समाजावरच सामाजिक परिणाम झाले नाहीत तर इतर धर्मीयांवर सुध्दा या धम्मक्रांतीचे परिणाम झाले आहेत, हे स्पष्ट करतांना म्हणाले की, 'ज्या ब्राम्हण धर्माने अस्पृश्यांना वाळीत टाकले होते त्याच ब्राम्हण धर्मातील अनेकांनी पुढे बौध्द धम्माचा स्विकार केलेला आहे व अजूनही ही प्रक्रिया सतत सुरू आहे.' हा बाबासाहेबांच्या विचारांचा विजय आहे. आता केवळ भारतातच नव्हे तर थायलंड, मलेशिया, तैवान, चीन, जपान, श्रीलंका इत्यादी देशातही बौध्द धम्म आज फोफावत आहे. या चर्चासत्राचे सूत्रसंचालन वुमेन्स कॉलेज, नंदनवन नागपूर चे डॉ. दिपक पवार यांनी केले.

सदर अधिवेशनाचा समारोप सांयकाळी ५.३० वाजता झाला. 'समाजशास्त्र परिषदेच्या अधिवेशनात समाजशास्त्राच्या प्राध्यापकांनी परिषदेत केवळ हजेरी लावण्याकरिता येऊ नये, तर या अधिवेशनातील प्रत्येक चर्चासत्रात भाग होऊन त्या चर्चासत्रातील विचारांचा फायदा समाजाला देण्याचे कार्य केले पाहिजे, असे प्रतिपादन मुंबई विद्यापीठाचे समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. पी. जी. जोगदंड यांनी केले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. सुरेश वाघमारे, सचिव प्रा. वैजनाथ मलशेटटे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. एस. फुलझेले उपस्थित होते. दि. ६ व ७ जानेवारी असे दोन दिवस चाललेल्या या अधिवेशनाच्या या चारही चर्चासत्रात एकूण जवळपास ६० प्राध्यापकांनी आपले शोधनिबंध सादर केलेत. प्रस्तुत अधिवेशनाला संपूर्ण महाराष्ट्रातून जवळपास २०० प्राध्यापकांनी हजेरी लावली होती. समारोपीय कार्यक्रमाचे संचालन अधिवेशनाचे सहसंयोजक डॉ. राहुल भगत यांनी केले तर प्रास्ताविक अधिवेशनाचे संयोजक प्राचार्य डॉ. आर. एस. फुलझेले यांनी केले. समारोपीय कार्यक्रमात मराठी समाजशास्त्र परिषदेकडून प्राचार्य डॉ. आर. एस. फुलझेले व डॉ. राहुल भगत यांचा शाल व पुश्पगुच्छ देवून मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. सुरेश वाघमारे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सदर अधिवेशनाच्या यशस्वितेसाठी एस. एन. मोर महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी भरीव सहकार्य केले.

मसप च्या १७ व्या अधिवेशनातील ठराव :–

ठराव क्र. १. समाजशास्त्र हा विषय सर्व विद्यापीठातील सर्वच विद्याशाखेत आवश्यक करण्यात यावा. विशेषत: एम. बी. ए., एल. एल. बी., डी. बी. एम., एम. बी. बी. एस., यासारख्या अभ्यासक्रमातही हा विषय शिकविण्यात आला तर समाज व समाजाविषयींची विपूल माहिती मिळून सामाजिक एकता निर्माण होऊन, त्यातून राष्ट्रीय ऐक्यता अधिक दृढ होईल.

ठराव क्र. २:– आधुनिक काळात समाजात बालगुन्हेगारी, दारिद्रय, बेकारी, गुन्हेगारी, आंतकवादी, दहशतवाद, गलिच्छवस्ती, जुगार, व्यसनाधिनता यासारख्या सामाजिक समस्या अतिशय उग्र स्वरूप धारण करीत आहेत. या समस्यांची जाणिव होण्यासाठी विद्यार्थी व युवक समाजात जाणे आवश्यक आहे. विद्याथी जर प्रत्यक्ष समाजात जावून या समस्यांचे निरीक्षण करू लागला तर त्याला या समस्यांचे दुश्परिणाम प्रत्यक्ष पाहता येतील. या प्रात्यक्षिकांमध्ये विद्यार्थ्यांना एखादी समस्या अभ्यासायला देता येईल. या समस्येची कारणे व दुश्परिणाम काय आहेत. हे त्यांना स्वत:च शोधता येतील. प्रस्तुत समस्यांच्या निराकरणासाठी योग्य ते उपाय सुचविता येतील. यासाठीच समाजशास्त्र या विषयातंर्गत ३० गुणांचे प्रात्यक्षिक ठेवण्यात यावे असा ठराव या परिषदेत घेण्यात आला.

ठराव क्र. ३.:– सामाजिक संशोधन समाजाभिमुख होण्यासाठी विद्यापीठांनी संशोधकांना अधिक सोयी उपलब्ध करून द्याव्यात.

ठराव क्र. ४:– स्वायत्त शिक्षण किंवा स्वायत्त महाविद्यालयाच्या संकल्पनेमूळे शिक्षणाचा दर्जा निश्चितच सुधारेल यात शंका नाही. शासनाची आज जी अनुदानीत महाविद्यालये आहेत यापैकी काही महाविद्यालयांची निवड करून, त्यामध्ये जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देवून आणि जागतिक दर्जाचा शिक्षकवर्ग नेमून अशा महाविद्यालयांमध्ये ज्यांचे वार्शिक उत्पन्न १ लाख रूपयांच्या आत आहे अशा व्यक्तींच्या पाल्यांना त्यात सामायिक परिक्षेच्या माध्यमातून प्रवेश देण्यात यावा.

ठराव क्र.५:– 'विदर्भातील डोंगरदऱ्यात, विशेषत: गडचिरोली व मेळघाट सारख्या भागात राहणाऱ्या आदीवासींचा दर्जा अजूनही निम्न प्रतीचा आहे. त्यांना शिक्षण, रोजगार, व्यवसाय या गोष्टी अजूनही मुबलक प्रमाणात मिळत नाही, त्यांचा आर्थिक व सामाजिक दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने शासनाने कसून प्रयत्न

करावेत व या कामात सामाजिक संशोधकांना व विद्यार्थ्यांनाही समाविष्ट करून घ्यावे असे ही परिषद सुचिवते.

ठराव क्र. ६:— मागासवर्गीयांचे आरक्षण व शिक्षणविषयक सोयी सवलती यापुढेही सुरू ठेवण्यात याव्यात अशी शिफारस ही परिषद करते आहे.

ठराव क्र. ७:— मराठी समाजशास्त्र परिषदेचे अधिवेशन दरवर्षी घेण्यात येते. परंतु अधिवेशनाच्या वाढत्या खर्चामुळें हे अधिवेशन दरवर्षी घेणे शक्य होत नाही किवा खर्चामुळे कोणीही हे अधिवेशन घेण्यासाठी पुढाकार घेत नाहीत. यासाठी शासनाकडून मराठी समाजशास्त्र परिषदेच्या अधिवेशनाला दरवर्षी रू. १ लाखाचा निधी शासनाकडून देण्यात यावा, असे ही परिषद सुचवित आहे.

अहवाल लेखन :— डॉ. राहुल भगत, समाजशास्त्र विभाग प्रमुख, एस. एन. मोर महाविद्यालय, तुमसर जि. भंडारा.

जानेवारी, २००६ ते फेब्रुवारी, २००९ — अध्यक्ष — डॉ. किशोर राउत, **सचिव** — डॉ. के. बी. नायक. **कोषाध्यक्ष** — डॉ. एस. एस. सोमवंशी, **कार्यालय,** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती. **कार्यकारिणी सदस्य** — डॉ. पी. जी. जोगदंड, मुंबई. प्रा. बा. ह. कल्याणकर, औरंगाबाद. डॉ. आर. एन. साळवे, कोल्हापूर. प्रा. एस. आर. भूशण, नागपूर. डॉ. स्मृती भोसले, मुंबई. डॉ. सुरेश वाघमारे, लातूर. डॉ. दिलीप खैरनार, औरंगाबाद. प्रा. एन. आर. पाटील, सोलापूर. डॉ. सुनिल मायी, जळगांव. प्रा. रणजित मेश्राम, नागपूर. डॉ. जगन्नाथ कराडे, पुणे. प्रा. एस. सी. शेटे, सातारा. डॉ. स्मिता अवचार, औरंगाबाद. प्रा. सी. टी. कांबळे, नांदेड. डॉ. ए. एस. पैठणे, डॉ. श्रुति तांबे, पुणे. प्रा. आर. जी. मस्के, सोलापूर. प्रा. निशांत गडपायले, पुणे. प्रा. सुजाता सुदर्शनी, सांगली. डॉ. मनिशा राणे, नाशिक.

परिषदेचे अठरावे अधिवेशन:— मराठी समाजशास्त्र परिषदेचे अठरावे अधिवेशन २००७ मध्ये अण्णाभाऊ साठे महाविद्यालय, मुखेड येथे आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनाच्या संदर्भात अधिकची माहिती प्राप्त होऊ शकली नाही.

२००८ मधील मराठी समाजशास्त्र परिषदे च्या अधिवेशना संदर्भात माहिती उपलब्ध होऊ शकली नाही.

परिषदेचे एकोणविसावे अधिवेशन:— मराठी समाजशास्त्र परिषदेचे १९ वे अधिवेशन दि. २ व ३ फेब्रुवारी २००९, देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद येथे यशस्वीपणे संपन्न झाले. सदर अधिवेशनात 'जागतिकीकरण: समाजशास्त्र अध्ययनाचा एक संदर्भ' हा प्रमुख विषय होता व या अधिवेशनासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून ३७० प्रतिनिधी सहभागी झाले होते. सदर अधिवेशनात बीजभाषण प्रसिध्द विचारवंत डॉ. आनंद तेलतुंबडे यांनी केले. तर कार्यक्रमाचे उद्घाटन ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ, माजी कुलगुरू, इंडियन सोशिओलॉजिकल सोसायटीचे अध्यक्ष डॉ. उत्तम भोईटे यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देवगिरी महाविद्यालयाच्या स्थानिक नियामक मंडळाचे सदस्य तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे माजी अध्यक्ष प्राचार्य डॉ. पी. बी. शिंदे हे होते. अधिवेशनाच्या बीजभाषणप्रसंगी डॉ. आनंद तेलतुंबडे यांनी 'जागतिकीकरणाच्या लाटेमध्ये समाजाला मार्गदर्शन करण्याची जबाबदारी समाजशास्त्र अभ्यासकांची आहे. त्यामुळे जागतिकीकरणाच्या जगात समाजशास्त्राने आपल्या अध्ययनाची पारंपारिक चौकट मोडून अध्ययनाचा नवा संदर्भ शोधणे गरजेचे आहे', असे मत प्रतिपादित केले. तर डॉ. उत्तम भोईटे यांनी 'जागतिकीकरणाचा प्रभाव भारतीय समाजावर पडून सामाजिक संरचनेमध्ये बदल घडून येत आहे. जागतिकीकरणाने दूरगामी स्वरूपाचे परिवर्तन समाजव्यवस्थेत घडून येऊन अनेक स्वरूपाच्या आव्हानांना भारतीय समाजाला सामोरे जावे लागेल. अशावेळी समाजशास्त्राच्या अध्यापकांनी ही जबाबदारी पेलण्याची क्षमता आपल्यामध्ये निर्माण करणे आवश्यक आहे, असे मत मांडले. त्याचबरोबर मराठी समाजशास्त्र परिषदेने आपला संघटनात्मक पाया जास्तीत जास्त मजबूत करून मराठी भाषिक अभ्यासकांकरीता अभ्यासपूर्ण, संशोधनात्मक ग्रंथ लिखाणासाठी लेखकांना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. त्यामुळे परिषदेने यादृष्टीने विचार करून पाउले उचलावीत. परिषदेच्या अधिवेशनात केवळ उत्साहच नसावा तर, या अधिवेशनातून विचारमंथनही घडून यावे. अभ्यासकांनी सादर केलेल्या शोधनिबंधाना ग्रंथाचे स्वरूप प्राप्त करून द्यावे, अशी अपेक्षाही व्यक्त केली.

अधिवेशनाच्या पहिल्या सत्रात 'जागतिकीकरण व सामाजिक संरचना' या सत्रांतर्गत जागतिकीकरणाचा सामाजिक, सांस्कृतिक प्रभाव, जागतिकीकरणाचा दुर्बल घटकांवरील परिणाम आणि सामाजिक संस्थाचे वैश्वीकरण, जागतिकीकरणाचा व्यक्ती व समाज सहसंबधावर प्रभाव या विषयांवर डॉ. प्रल्हाद जोगदंड, डॉ. विजय मारूळकर, डॉ. डी. डी. धोंगडे, प्रा. रमेश राठोड, डॉ. मंगला तांबेकर, डॉ. अशोक गायकवाड, डॉ. अरूण चव्हाण, डॉ. श्याम सोमवंशी व इतर ३७ अभ्यासकांनी आपले अभ्यासपूर्ण शोधनिबंध सादर केले. या सत्राचे अध्यक्ष प्रसिध्द विचारवंत माजी खासदार श्री. बापूसाहेब काळदाते हे होते तर सदर सत्राला संदर्भून प्रमुख विषयाची मांडणी ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ. उत्तम भोईटे यांनी केली.

अधिवेशनाच्या दुसऱ्या सत्रात 'जागतिकीकरण व सामाजिक आर्थिक प्रभाव' या विषय संत्रार्तगत जागतिकीकरण — नवे अर्थकारण व महिला, जागतिकीकरण व ग्रामीण सामाजिक आर्थिक संरचना या विषयांवर विचारमंथन झाले. सत्राचे अध्यक्ष प्रा. बा. ह. कल्याणकर हे होते तर प्रसिध्द अर्थतज्ञ डॉ. आर. पी. कुरूंदकर यांनी जागतिकीकरणाचा मराठवाडा विभागावर झालेल्या परिणामाची विस्तृतपणे मांडणी केली. डॉ. सुधाताई काळदाते, प्रा. किशोर राउत, डॉ. पद्माकर सहारे, प्रा. कमलताई तंबाखे, डॉ. पंडित शिंदे इ. अभ्यासकांसोबत २५ अभ्यासकांनी शोधनिबंध सादर केले. अधिवेशनाच्या तिसऱ्या सत्रात 'जागतिकीकरण, शिक्षण व शासन व्यवस्था' या विषयांतर्गत उच्चशिक्षण व्यवस्थेचे जागतिकीकरणा बरोबरच समायोजन, जागतिकीकरणाच्या प्रभावक्षेत्राखाली शासनव्यवस्था, जागतिकीकरण व स्त्री दिशा या विषयांवर डॉ. दिलीप खैरनार, डॉ. संजय साळुंके, डॉ. पो. म. साळुंके, डॉ. पद्मजा जाधव व इतर १७ अभ्यासकांनी आपले शोधनिबंध सादर केले. सत्राचे अध्यक्षस्थान मुंबई विद्यापीठातील डॉ. प्रल्हाद जोगदंड यांनी भूषविले.

दि. २ फेब्रुवारी २००९ रोजी सांयकाळी ५.०० वाजता परिषदेची आमसभा बोलाविण्यात आली होती. सदर आमसभेत परिषदेच्या नवीन कार्यकारिणीची निवडणूक घेण्यात आली. आमसभेत परिषदेच्या संशोधन पत्रिकेचा अंक सातत्यपूर्ण प्रसिध्द व्हावा व अंक प्रसिध्द करण्यासाठी लागणारा निधी उपलब्ध करण्यासाठी परिषदेच्या सर्व सदस्यांनी प्रयत्न करावा असे ठरले. मसपच्या नवनिर्वाचित कार्यकारिणीच्या अभिनंदनाचा ठराव होऊन पुढील काळात परिषदेची जबाबदारी योग्यरीतीने नवनिर्वाचित कार्यकारिणीने पार पाडावी असे आमसभेकडून सुचविण्यात आले.

अधिवेशनाच्या शेवटच्या समारोपाच्या सत्राचे अध्यक्ष प्रसिध्द समाजशास्त्रज्ञ डॉ. सुधाताई काळदाते या होत्या. तर प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य आर. टी. देशमुख, प्राचार्य प्रदीप जवदे हे उपस्थित होते. याप्रसंगी परिषदेचे नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. दिलीप खैरनार, सचिव डॉ. दादासाहेब मोटे व कोषाध्यक्ष प्रा. सिध्दार्थ निसर्गंध यांचा सत्कार करण्यात आला.

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. विठठ्लराव लहाने, सचिव मा. मधुकरराव मुळे, स्थानिक नियामक मंडळाचे सर्व सदस्य, देवगिरी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रदीप जबदे यांच्या मार्गदर्शनामूळे व सहकार्यामूळेच सदर अधिवेशन मराठी समाजशास्त्र परिषदेला यशस्वीपणे पार पाडता आले.

फेब्रुवारी २००९ ते फेब्रुवारी २०१२ – अध्यक्ष, डॉ. दिलीप खैरनार – दि. २ व ३ फेब्रुवारी २००९, देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद येथे आयोजित मराठी समाजशास्त्र परिषदेच्या १९ व्या अधिवेशनात डॉ. दिलीप खैरनार यांची मराठी समजाशास्त्र परिषदेचे अध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली. डॉ. दिलीप खैरनार यांच्या कार्यकारिणीत डॉ. दादासाहेब मोटे यांची **सचिवपदी** व **कोषाध्यक्षपदी** प्रा. सिध्दार्थ निसर्गंध यांची निवड करण्यात आली. तसेच **कार्यकारिणी सदस्य** म्हणून महाराष्ट्रातील विविध विद्यापीठातून मसपच्या कार्यकारिणीवर डॉ. विजय मारूळकर, एस. एन. डी. टी. विद्यापीठ, मुंबई. प्रा. महेद्रकुमार जाधव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. डॉ. अशोक गायकवाड, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर. डॉ. श्रुती तांबे, पुणे विद्यापीठ, पुणे. प्रा. ए. जी. कांबळे, मुंबई विद्यापीठ, मुंबई. प्रा. सुलभा गावंडे, रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर. डॉ. अरूण चव्हाण, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती. डॉ. नारायण चौधरी, य. च. म. मु. वि.नाशिक. डॉ. पी. एम. शिंदे, एस. आर. टी. एम. विद्यापीठ, नांदेड. प्रा. डी. एल. तोरवणे, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव. डॉ. जगन कराडे, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे अशी बिनविरोध निवड करण्यात आली होती.

परिषदेचे विसावे अधिवेशन:– मराठी समाजशास्त्र परिषदेचे २० वे अधिवेशन दि. २८ व २९ जानेवारी, २०१० रोजी शिक्षण प्रसारक मंडळ, कोल्हापूर संचालित बॅ. बाळासाहेब खर्डेकर महाविद्यालय, वेंगुर्ला येथे संपन्न झाले. या अधिवेशनात एकूण ३६८ प्रतिनिधी सहभागी झाले होते. सदर अधिवेशनासाठी 'दहशतवाद आणि समाज' हा प्रमुख विषय होता. अधिवेशनात बीजभाषण डॉ. उध्दव कांबळे, तुरूंग महानिदेशक, मुंबई यांनी केले. याप्रसंगी डॉ. अनुराधा भोईटे, डॉ. राम वाघ, डॉ. दिलीप खैरनार, डॉ. दादासाहेब मोटे, प्रा. सिध्दार्थ निसर्गंध व प्राचार्य एम. बी. फडतरे हे उपस्थित होते.

अधिवेशनाच्या बीजभाषणप्रसंगी डॉ. उध्दव कांबळे यांनी भारतातील दहशतवाद समस्येसंबधी सखोल मार्गदर्शन केले. दहशतवादाच्या समस्येची उकल करण्याच्यादृष्टीने समाजशास्त्रज्ञांनी योगदान देण्याचे आवाहन त्यांनी केले. दहशतवाद आणि समाज या विषयाच्या अनुषंगाने अधिवेशनात सखोल चर्चा व्हावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

अधिवेशनाचे पहिले सत्र 'सांस्कृतिक, भाषिक व कौटुंबिक दहशतवाद' या विषयाशी संबंधित होते. सत्राचे अध्यक्षपद डॉ. स्मृती भोसले यांनी भूषविले तर अहवाल लेखनाचे कार्य डॉ. कल्पना देवकर यांनी केले होते.

अधिवेशनाचे दूसरे सत्र 'कोकण विकास: अपेक्षा आणि वास्तव' याच्याशी संबंधीत होते. या सत्राचे अध्यक्षपद प्राचार्य एस. बी. फडतरे तर संचालन डॉ. पाटोळे यांनी केले. या सत्रात श्री. श्रीधर मराठे यांना विचार व्यक्त करण्यासाठी पाचारण करण्यात आले होते. या सत्रात त्यांनी कोकण विभागाच्या विविध समस्यांची मांडणी केली. पर्यटनदृश्टया अनुकूल स्थिती असतांनाही आणि काजू, आंबा यांचे आगार असतांनाही या भागाचा विकास न होऊ शकल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. नैसर्गिक विविधता, समुद्रकिनारा यादृष्टीने विकासाची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

दि. २९ जानेवारी २०१० रोजी अधिवेशनाचे चवथे सत्र 'राजकीय दहशतवाद' या विषयावर होते. सत्राचे अध्यक्षपद डॉ. विजय मारूळकर यांनी भूषविले तर प्रा. अरूण पौडमल यांनी अहवाल लेखन केले. सूत्रसंचालन प्रा. होडावडेकर पी डी. यांनी केले. अधिवेशनाचे पाचवे सत्र 'नक्षलवाद, जैविक व सायबर दहशतवाद' या विषयाशी संबंधित होते. या सत्राचे अध्यक्षपद डॉ. माणिक माने, कराड यांचेकडे होते तर सूत्र संचालन ए. एम. माने यांनी केले, तर अहवाल लेखन प्रा. कमलताई तंबाखे यांनी केले. अधिवेशनाचे शेवटचे सत्र सपन्न झाल्यानंतर त्याच ठिकाणी डॉ. दिलीप खैरनार अध्यक्ष मराठी समाजशास्त्र परिषद यांच्या अध्यक्षतेखाली आमसभेचे आयोजन करण्यात आले होते. मराठी समाजशास्त्र परिषदेचे विद्यापीठ पातळीवर काम करणाऱ्या कार्यकारिणी सदस्यांमध्ये डॉ. पंडीत शिंदे, ज्ञानोपासक महाविद्यालय, जिंतूर, जि. परभणी यांनी विक्रमी आजीव सभासद नोंदणी केल्याबदद्ल आणि प्रा. महेंद्रकुमार जाधव व प्रा. अरूण पौडमल यांनी अधिवेशन संयोजनासाठी उत्कृष्ट मदत केल्याबदद्ल आमसभेच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. अधिवेशनाच्या समारोप कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून आमदार दिपकभाई केसरकर आणि माजी आमदार शंकाभाई कांबळी हे लाभले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य एस. बी. फडतरे यांनी भूषविले होते.

मराठी समाजशास्त्र परिषदेचे २० वे अधिवेशन यशस्वीपणे संपन्न करण्यासाठी शिक्षण प्रसारक मंडळ, कोल्हापूरच्या अध्यक्षा श्रीमती शिवानी देसाई, चेअरमन श्री. व्ही. एल. पाटील, सचिव प्रा. जयकुमार देसाई, महाविद्यालय पातळीवर प्राचार्य एस. बी. फडतरे, समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा. आरोलकर डी. आर.

आणि त्यांचे सहकारी प्रा. डाके डी. के. यांच्याबरोबरच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अथक परिश्रम होऊन अधिवेशन यशस्वीपणे पार पाडले. मसप कार्यकारिणीचे अध्यक्ष डॉ. दिलीप खैरनार, सचिव डॉ. दादासाहेब मोटे आणि कोषाध्यक्ष प्रा. सिध्दार्थ निसर्गंध यांनी यावेळी मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे विद्यार्थी आणि वेंगुर्लावासीयांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. सर्वांच्या सहकार्यामूळे मसप चे २० वे अधिवेशन व्यवस्थितपणे पार पाडता आले.

अहवाल—डॉ. दादासाहेब मोटे, सचिव, मराठी समाजशास्त्र परिषद.

परिषदेचे एकविसावे अधिवेशन:— मराठी समाजशास्त्र परिषदेचे २१ वे अधिवेशन दि. ४ व ५ फेब्रुवारी २०११ रोजी शिवराज साहित्य, वाणिज्य आणि बी. एस. कदम विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज, जिल्हा कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनात ४३९ प्रतिनिधी सहभागी झाले होते. 'ग्रामीण विकास व परिवर्तन' हा अधिवेशनाचा प्रमुख विषय होता. अधिवेशनाचे उद्घाटन मा. ना. श्री. हसन मुश्रीफ यांनी केले होते. बीजभाषणासाठी डॉ. के. एल. शर्मा कुलगुरू, राजस्थान विद्यापीठ, जयपूर यांना निमंत्रित केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मा. प्रा. किसनराव कुराडे हे होते. व्यासपीठावर डॉ. सुधाताई काळदाते, डॉ. दिलीप खैरनार, डॉ. प्रल्हाद जोगदंड, डॉ. दादासाहेब मोटे, प्राचार्य एस. ए. जोडगुद्री, प्रा. सिध्दार्थ निसर्गंध यांची उपस्थिती होती. उद्घाटनपर भाषणामध्ये मा. ना. हसन मुश्रीफ यांनी ग्रामीण विकास व परिवर्तनाच्या अनुषंगाने अधिवेशनात जे शोधनिबंध सादर होतील त्याची एक प्रत महाराष्ट्र शासनाला सादर करण्याची सूचना केली. अधिवेशनाच्या बीजभाषणप्रसंगी डॉ. के. एल. शर्मा यांनी स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रामीण विकासाचा सखोल आढावा होऊन परिवर्तनाची दिशा स्पष्ट केली. ग्रामीण विकासासंबधी केंद्र शासनाच्या विविध योजनांचाही ग्रामपरिवर्तनाच्या संदर्भात त्यांनी आढावा घेतला. अध्यक्षीय समारोपामध्ये प्रा. किसन कुराडे यांनी ग्रामीण भागाच्या, शेतीच्या, उद्योगांच्या समोरील विविध प्रश्न उपस्थित करून ते प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने मराठी समाजशास्त्र परिषद समाज व शासनाला योग्य दिशा देण्याचे कार्य करू शकेल असा विश्वास व्यक्त केला.

अधिवेशनाचे पहिले सत्र ग्रामीण उद्योगातून रोजगार निर्मिती या विषयांवर संपन्न झाले. या सत्रात १३ प्रतिनिधींनी सहभाग होऊन शोधनिबंध सादर केले. ग्रामीण उद्योगातून रोजगार निर्मितीच्या विविध संधी कशा उपलब्ध होऊ शकतात यावर सविस्तर चर्चा झाली. दुसरे सत्र 'ग्रामीण विकासातील शासकीय योजनांची भूमिका' या विषयांशी संबंधित होते. या सत्रात २५ प्रतिनिधींनी सहभागी होऊन शोधनिबंध सादर केले. ग्रामीण विकासासाठी १९५२ पासून विविध पंचवार्षिक योजनांमध्ये ज्या योजना आखण्यात आल्या त्याचा सकारात्मक परिणाम म्हणून ग्रामीण भागाचे चित्र बदलत असल्याचे सर्व शोधनिबंधकर्त्यांच्या चर्चेतून जाणवले. कर्जबाजारीपणा, शेतकऱ्यांच्या आत्महत्या यासारख्या कृषीनिगडीत प्रश्नांवरही चर्चा झाली. सदरील सत्रात शोधनिबंधाची संख्या अधिक असल्यामुळे हे दोन विभागात विभागले होते. सत्र अध्यक्ष म्हणून डॉ. प्रल्हाद जोगदंड, मुंबई विद्यापीठ व डॉ. स्मिता अवचार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद हे होते.

तिसरे सत्र 'जागतिकीकरणाच्या संदर्भात भारतीय शेती' या विषयांवर संपन्न झाले. या सत्राचे अध्यक्ष डॉ. सुशिला फुले, औरंगाबाद या होत्या. सदर सत्रांतर्गत शेती आणि जोड व्यवसाय, निसर्ग आणि शेती, हरीत क्रांती, राष्ट्रीय—आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमधील संधी, शेतकऱ्यांच्या जीवनशैलीत झालेले बदल, कर्जबाजारीपणा, बी—बीयाणे, खते यांचा तुटवडा या सारख्या विविध पैलूंवर चर्चा झाली. या सत्रात प्रसिध्द समाजवादी विचारवंत माजी खा. डॉ. बापूसाहेब काळदाते यांनी भारतीय ग्रामीण विकासाच्या अनुषंगाने मोलाचे मार्गदर्शन केले. अधिवेशनाचे चवथे सत्र 'ग्रामीण विकासातील सहकार क्षेत्राचा सहभाग' या विषयांवर संपन्न झाले. सदर सत्रांमध्ये २७ प्रतिनिधींनी शोधनिबंधाचे सादरीकरण केले. सत्र अध्यक्ष म्हणून डॉ. जगन कराडे उपस्थित होते. सहकार क्षेत्राचा ग्रामीण समाज जीवनावर पडत असलेला प्रभाव, सहकारातून आर्थिक उन्नती, सहकारामधून सामाजिक व राजकीय क्षेत्रात झालेली जागृती यासारख्या पैलूंवर सकारात्मक चर्चा झाली. अधिवेशनाचे पाचवे सत्र 'सीमा भागातील सामाजिक व सांस्कृतिक समस्या' या विषयांवर संपन्न झाले. या सत्रात २८ प्रतिनिधींनी शोधनिबंधाचे सादरीकरण केले. सत्र अध्यक्ष म्हणून डॉ. सुर्यवंशी उपस्थित होते. आदिवासींचे शिक्षण, रोजगार, खानपान, पायाभूत सुविधा, पर्यावरण अशा विविध पैलूंना अनुसरून चर्चा झाली. बेळगांव भागातील सीमावासीयांच्या विविध समस्यांचाही आढावा या सत्रात घेण्यात आला.

दि. ४ फेब्रुवारी २०११ ला मसप ची आमसभा सायंकाळी ५.३० वाजता संपन्न झाली. यात मसपचे वार्शिक ताळेबंद, पुढील वर्षासाठीची आर्थिक तरतूद, समाजशास्त्र संशोधन पत्रिकेच्या अंकाचे वर्षातून २ वेळा प्रकाशन, निवडणूक प्रक्रिया इत्यादी विषयांवर चर्चा झाली. आमसभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. दि. ५ फेब्रुवारी २०११ ला समाजशास्त्र परिषदेच्या या अधिवेशनाचा समारोप कार्यक्रम मा. ना. लक्ष्मणराव ढोबळे, माजी पुरवठा मंत्री, महाराष्ट्र राज्य व डॉ. बी. बी. मलिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर केंद्रीय विद्यापीठ, लखनौ यांच्या प्रमुख उपस्थितीत व डॉ. सुधाताई काळदाते यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. परिषदेचे सर्व पदाधिकारी तसेच प्रा. अनिल कुराडे, प्रा. किसनराव कुराडे, श्री. अमृत बोरूडे इत्यादी विचारपीठांवर उपस्थित होते. समारोप कार्यक्रमप्रसंगी मा. ना. लक्ष्मणराव ढोबळे यांनी परिषदेसाठी अर्थसहाय्य म्हणून १ लाख रूपये, तर डॉ. सुधाताई काळदाते यांनी ५० हजार रूपये देणगी देण्याची घोशणा केली. प्रा. किसनराव कुराडे यांनीही संशोधन पत्रिकेची अंकछपाई व इतर कामांसाठी रू. १ लाख अर्थसहाय्य देण्याचे मान्य केले. प्रा. अनिल कुराडे यांनी आभार मानले व परिषदेच्या २१ व्या अधिवेशनाचा समारोप झाला.

अहवाल—डॉ. दादासाहेब मोटे, सचिव, मराठी समाजशास्त्र परिषद.

परिषदेचे बावीसावे अधिवेशन:— मराठी समाजशास्त्र परिषदेचे २२ वे अधिवेशन दि. ०५ व ०६ एप्रिल २०१२ रोजी वालचंद

कला व विज्ञान महाविद्यालय, सोलापूर येथे यशस्वीपणे संपन्न झाले. मराठी समाजशास्त्र परिषदेची धुरा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद अंतर्गत आमच्या खांद्यावर आल्यानंतर वेंगुर्ला–२०१०, गडहिंग्लज–२०११, आणि सोलापूर–२०१२ अशी सलग तीन अधिवेशने कार्यकारिणीच्या सहकार्याने आयोजित करण्यात आम्ही यशस्वी ठरलो. मराठी समाजशास्त्र परिषदेचे संकेतस्थळ (www.msp-maha.com), परिषदेच्या आजीव सदस्यांची अद्ययावत यादी, आजीव सभासद वर्गणी भरून देखील आजीव सदस्य यादीमध्ये नांव समाविष्ट न झालेल्यांचे नांव यादीत समाविष्ट करून घेणे, संकेतस्थळांवर जुने आर्टीकल्स उपलब्ध करून देणे, प्रत्येक वर्षाचे ऑडीट करून ते संकेतस्थळांवर टाकणे, आजीव सदस्यांचे प्रमाणपत्र तयार करणे, पदाधिकाऱ्यांवरील खर्चात कपात, मराठी संशोधन पत्रिकेचा अंक नियमित प्रकाशित करणे यासारखे उपक्रम आम्ही राबवू शकलो. परिषदेच्या आजीव सभासदांच्या सहायाने हे सर्व शक्य झाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जातीनिर्मूलन विषयक विचार हा सोलापूर येथील अधिवेशनाचा मुख्य विषय होता. या विषयाला अनुसरून इतर उपविषय दिले गेले होते. अधिवेशनाचे उद्घाटन सोलापूरच्या आमदार प्रणोती शिंदे यांच्या हस्ते झाले. उद्घाटन सोहळयाप्रसंगी विचारपीठावर खासदार डॉ. जनार्दन वाघमारे, डॉ. भालचंद्र मुणगेकर, डॉ. दिलीप खैरनार, डॉ. दादासाहेब मोटे, प्रा. सिध्दार्थ निसर्गगंध, प्राचार्य डॉ. अजित माणिकशेटे, डॉ. अशोक गायकवाड यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. भालचंद्र मुणगेकर होते. उद्घाटनपर भाषणांमध्ये आमदार प्रणोती शिंदे यांनी सहभागी सदस्यांचे स्वागत करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जातीनिर्मुलन विषयक विचारांवर भाष्य केले. परिषदेच्या आयोजनाच्या माध्यमातून चिंतनपर विचारांची देवाण–घेवाण होईल आणि त्यातून सामाजिक परिवर्तनाला चालना मिळेल, असे मत त्यांनी व्यक्त केले. प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माणिकशेटे यांनी महाविद्यालयाची वाटचाल आणि परिषदेच्या आयोजनासंबधी माहिती दिली. मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. दिलीप खैरनार यांनी मराठी समाजशास्त्र परिषदेची आजपर्यंतची वाटचाल, परिषद आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली.

अध्यक्षीय समारोपामध्ये डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जातीनिमूलन विषयक विचारावर अभ्यासपूर्ण मांडणी केली. जातीनिर्मूलनाचा संबंध हिंदू धर्म सुधारणांशी जोडून जातीनिर्मूलन हे राष्ट्रीय कार्य असल्याचे प्रतिपादन केले. भारतातील जातीनिर्मूलनासाठी डॉ. आंबेडकरांनी जे उपाय सुचविले त्याचा अवलंब करण्यामध्ये आपण कमी पडलो, समग्र क्रांतीची मशाल पेलण्यात कमी पडल्याचेही त्यंनी स्पष्ट केले. 'ॲनीहिलेशन ऑफ कास्ट' या ग्रंथावर त्यांनी सखोल भाष्य केले. परिषदेच्या अनुषंगाने बीजभाषण देण्यासाठी खासदार डॉ. जनार्दन वाघमारे यांना आंमत्रित केले होते. त्यांनी आपल्या बीजभाषणात डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक अस्पृश्यता निर्मुलन विषयक विचार मांडण्याबरोबरच त्यांच्या विचारांची सद्यस्थितीत आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले. कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. अशोक गायकवाड यांनी सर्वांचे आभार मानले.

अधिवेशनाचे पहिले सत्र सामाजिक असमानतेच्या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जातीनिर्मुलन विषयक विचार या विषयांवर संपन्न झाले. या सत्रांमध्ये डॉ. सुर्यकांत घुगरे, प्रा. मा. म. गायकवाड, प्रा. राजेंद्र गोणारकर, प्रा. चंद्रकांत कांबळे, डॉ. नभा काकडे, प्रा. प्रतिभा बिरादार, प्रा. विकास शिंदे, प्रा. बालाजी गंगावणे, प्रा. पी. एल. सुर्यवंशी, प्रा. संतोष राजगुरू, प्रा. राजेंद्रसिंह लोखंडे, बाळासाहेब मागाडे, प्रा. मीना गायकवाड, प्रा. भोसले एस. ई., प्रा. कंधारे नंदा, यांनी आपले शोधनिबंध सादर केले. या सर्वांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जातीनिर्मूलन विषयक विचारांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला. सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक परिस्थिती बदलण्यांमध्ये जातीनिर्मूलन विषयक विचारांचे योगदान महत्वाचे राहिल्याचे या चर्चेतून स्पष्ट झाले. अधिवेशनाचे दुसरे सत्र 'सामाजिक असमानता व मानव अधिकार' या विषयांवर संपन्न झाले. सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. नारायण कांबळे हे होते. या सत्रामध्ये मानव अधिकाराच्या अनुषंगाने विविध पैलूंवर शोधनिबंध सादर झाले. डॉ. भगवान डोंगरे, प्रा. प्रल्हाद गोरे, प्रा. सुमन केंद्रे, प्रा. पी. बी. देसाई, प्रा. किसन माने, प्रा. एन. बी. कांबळे, प्रा. अरविंद टेके, प्रा. संगमेश्वर निला, प्रा. वाल्मिक इंदासे, प्रा. कमलताई तंबाके, प्राचार्य सीताराम गोसावी, प्रा. सरोज गायकवाड इत्यादींनी आपले शोधनिबंध सादर केले. मानवी अधिकाराची संकल्पना, विचारप्रणाली, मानवाधिकार जाहीरनामा, मानव अधिकार आणि स्त्रियांची स्थिती, मानवाधिकार आणि सामाजिक विकास यासारख्या विषयांवर शोधनिबंध सादर होऊन त्यावर सकारात्मक चर्चा झाली. मानवाधिकारामधून सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि राजकीय अशा सर्वच क्षेत्रांमध्ये समानता आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न होण्याची गरज विचारमंथनामधून व्यक्त झाली. अधिवेशनाचे तिसरे सत्र 'शिक्षण विषयक संधी आणि असमानता व सामाजिक असमानता' आणि 'स्त्री भ्रूणहत्या' या दोन विषयांवर संपन्न झाले. या सत्राच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बी. आर. सुर्यवंशी हे होते. या सत्रामध्ये प्रा. सिध्दार्थ निसर्गगंध, प्रा. किसन माने, प्रा. पी. बी. देसाई, प्रा. एन. बी. कांबळे, प्रा. अरविंद टेके, प्रा. शिवाजी उकरंडे, प्रा. सुनंदा आहेर, प्रा. आर. डी. चव्हाण, प्रा. पाडुंरंग मुठठे, डॉ. पी. एम. शिंदे, प्रा. सुरेखा शिंदे व प्रा. वाडते आर. पी., डॉ. नवनाथ शिंदे, प्रा. शिवाजी दहिकांबळे इत्यादींनी आपले शोधनिबंध सादर केले. स्त्री भ्रूणहत्या हा अत्यंत संवेदनशील विषय असल्याने या सत्रात सहभागी सदस्यांची संख्याही अधिक होती. स्त्री–भ्रूण हत्येचे परिणाम, गर्भप्रतीबंधक कायदा, स्त्री भ्रूणहत्येची कारणे, लिंग गुणोत्तर प्रमाण, स्त्री–भ्रूणहत्या रोखण्यासाठी शासकीय प्रयत्न, समाजसेवी संस्थांचे योगदान अशा विविध अंगानी व्यापक चर्चा झाली. प्रा. मंगलमूर्ती धोकटे या सत्राचे समन्वयक होते.

दि. ०५ एप्रिल २०१२ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता वालचंद सभागृहामध्ये आजीव सदस्यांची सर्वसाधारण सभा आयोजित केली होती. या सभेमध्ये सर्वानुमते मराठी समाजशास्त्र परिषदेचे कार्यालय टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांच्याकडे सोपविण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला. सभेमध्येच अध्यक्ष म्हणून डॉ. जगन कराडे, सचिव म्हणून प्रा. किरण सुरवसे आणि

कोषाध्यक्ष म्हणून डॉ. विशाल जाधव यांची निवड करण्यात आली. आमसभेच्या माध्यमातून विद्यापीठांतर्गत एक प्रतिनिधी अशा स्वरूपात कार्यकारिणी सदस्यांचीही निवड करण्यात आली. सर्वसाधारण सभेमधील महत्वाचा निर्णय म्हणजे मराठी समाजशास्त्र परिषदेची जी घटना आहे त्यामध्ये किरकोळ स्वरूपाचे बदल करण्यास सर्वच सभासदांनी मान्यता दिली. दि. ०६ एप्रिल, २०१२ म्हणजे अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी सत्र क्र. ४ ला सुरूवात झाली. 'सामाजिक असमानता' आणि 'स्त्रीभ्रूणहत्या' या अर्धवट राहिलेल्या सत्राला सुरूवात झाली. डॉ. स्मिता अवचार या सत्राच्या अध्यक्षस्थानी होत्या. या सत्रामध्ये विषय प्रवर्तक म्हणून डॉ. जगन कराडे यांनी भूमिका पार पाडली. प्रा. सुरेश शिंदे, प्रा. सुनंदा भद्रशेटे, प्रा. शिवाजी उकरंडे आणि प्रा. चांगदेव मुंडे इत्यादींनी शोधनिबंध सादर केले. सत्र समन्वयक म्हणून प्रा. रामेश्वर मोरे यांनी काम केले. अधिवेशनाचे पाचवे सत्र स्थानिक विषयाला अनुसरून आयोजित केले होते. 'सोलापूर शहरातील बिडी व गिरणी कामगारांचे प्रश्न', 'विस्थापन व पुनर्वसन' असा या सत्राचा विषय होता. त्यावर मांडणी करण्यासाठी डॉ. रविंद्र मोकाशी यांना आमंत्रित करण्यात आले होते. प्रस्तुत सत्रात डॉ. मोकाशी यांनी बिडी आणि चादर उद्योगातील बंद गिरण्या, कामगारांचे विविध प्रश्न, त्यातून निर्माण झालेल्या समस्या, कामगारांची सद्यास्थिती यावर सखोल मार्गदर्शन केले. सत्राच्या अध्यक्षस्थानी प्रा. विलास बेत होते तर सत्र समन्वयक म्हणून प्रा. आर. जी. मस्के यांनी काम पाहिले.

सहावे सत्र अधिवेशनाच्या समारोपाचे होते. या सत्राला डॉ. रणजित गांधी लाभले होते. या सत्रामध्ये 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जातीनिर्मुलन विषयक विचार: एक चिंतन' या विषयावर डॉ. सुरेश वाघमारे यांनी मार्गदर्शन केले. 'ॲनीहिलेशन ऑफ कास्ट' या ग्रंथाच्या अनुषंगाने त्यांनी विचारांची मांडणी केली. प्राचार्य डॉ. अजित माणिकशेटे, डॉ. रणजित गांधी यांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वितरण करून समारोप सोहळा संपन्न झाला. डॉ. अशोक गायकवाड यांनी उपस्थितांचे आभार मानल्यानंतर परिषदेची सांगता झाली.

अहवाल लेखक – डॉ. दादासाहेब मोटे, सचिव, मसप.

२०१२ ते २०१४. अध्यक्ष, डॉ. जगन कराडे, सचिव–प्रा. किरण सुरवसे, कोषाध्यक्ष– डॉ. विशाल जाधव, कार्यकारिणी सदस्य:– डॉ. कल्याण साखरकर, प्रा. आर. जी. मस्के, प्रा. कमलताई तंबाखे, प्रा. भाऊसाहेब सोनावणे, प्रा. रामदास वैद्य, प्रा. प्रविण घोडेस्वार, प्रा. महेंद्रकुमार जाधव, डॉ. सुजाता कराडे, प्रा. दिपक धारवाडकर, प्रा. नंदा कंधारे इत्यादींचा सहभाग होता. **परिषदेचे कार्यालय**:– समाजशास्त्र विभाग, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

२०१२ ते २०१४ या कालावधीत मराठी समाजशास्त्र परिषदेची धुरा डॉ.जगन कराडे यांच्या खांद्यावर होती. डॉ. जगन कराडे यांनी आपल्या कार्यकाळात मराठी समाजशास्त्र परिषद अंतर्गत विविध पुरस्कार सुरू केलेत. या पुरस्कारामध्ये १. डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट शोध निबंध पुरस्कार, प्राध्यापकांसाठी. २. डॉ. जी. एस. घुर्ये उत्कृष्ट शोधनिबंध पुरस्कार, विद्यार्थ्यांसाठी. ३. डॉ. अनुराधा भोईटे प्रकाशित लेख पुरस्कार. सुरू करण्यात आले होते.

डॉ. जगन कराडे यांच्या कार्यकाळात समाजशास्त्र विषयासाठी पहिला जीवन गौरव सुरू करण्यात आला. डॉ. जगन कराडे यांच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात मराठी समाजशास्त्र परिषदेच्या इतिहासात प्रथमच कोल्हापूर व औरंगाबादच्या परीषदेसाठी आयसीएसएसआर कडून अनुक्रमे १ लाख ५० हजार व ७५ हजार रूपयाचे अनुदान प्राप्त झाले. मसपच्या इतिहासात प्रथमच नांदेड येथे 'Academic Development in Teaching Profession' या विषयावर एका कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी आयसीएसएसआर, मुंबई यांच्याकडून ७५ हजार रूपयाचे अनुदान डॉ. जगन कराडे यांनी मसप ला मिळवून दिले होते. डॉ. जगन कराडे यांच्या कार्यकाळातच मराठी समाजशास्त्र परिषदेची सभासद यादी तयार करण्यात आली. समाजशास्त्र संशोधन पत्रिकेचे चार जोड अंक डॉ. कराडे यांनी प्रकाशित केले. आणि यासाठी सुध्दा आयसीएसएसआर, दिल्ली यांचेकडून प्रतिवर्षी ४० हजार रूपये अनुदान प्राप्त झाले होते. त्यांच्या कार्यकाळात मराठी समाजशास्त्र परिषदेच्या विकासासाठी डॉ. सुधाताई काळदाते यांचेकडून २ लाख रूपये तर डॉ. उत्तमराव भोईटे यांच्याकडून २५ हजाराची देणगी प्राप्त झाली होती.

परिषदेचे तेविसावे अधिवेशन :– मराठी समाजशास्त्र परिषदेचे २३ वे अधिवेशन विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथे शुक्रवार दि. १८ व १९ जानेवारी २०१३ रोजी संपन्न झाले. महाविद्यालयाच्या मुख्य सभागृहामध्ये सकाळी ११ वाजता उद्घाटन झाले. उद्घाटक म्हणून शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर चे कुलगुरू मा. प्रा. डॉ. एन. जे. पवार उपस्थित होते तर बीजभाषण जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, दिल्ली येथील डॉ. नंदू राम यांनी केले. उद्घाटन सत्राच्या अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ. सुधाताई काळदाते होत्या. तसेच संस्थेच्या सचिव सौ. शुंभागीताई गावडे, महाविद्यालयाचे प्राचार्य हिंदुराव पाटील, समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. जगन कराडे, सचिव प्रा. किरण सुरवसे व कोषाध्यक्ष डॉ. विशाल जाधव, संयोजक प्रा. वसंतराव कदम तसेच महाराष्ट्रातील विद्यापीठ स्तरावर व महाविद्यालयीन स्तरावर कार्यरत असणाऱ्या मान्यवर व्यक्ती उपस्थित होत्या. उद्घाटनाच्या सत्रात परिषदेच्यावतीने महाराष्ट्रातील 'समाजशास्त्र' या विषयाच्या अनुषंगाने भरीव योगदान देणाऱ्या ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञा व परिषदेच्या माजी अध्यक्षा प्रा. डॉ. सुधाताई काळदाते यांना समाजशास्त्र परिषदेचा जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. अधिवेशनाचा मुख्य विषय 'सीमांतिक समूह' या विषयावर बीजभाषण करताना डॉ. नंदू राम यांनी संकल्पनात्मक मांडणी करून चिंतनात्मक भाष्य केले व उद्घाटन सत्राच्या अध्यक्षा डॉ. सुधाताई काळदाते यांनी अध्यक्षीय भाषण करतांना, परिषदेचे कार्य सुस्थितीत असल्याचे सांगत परिषदेस १ लाख रू. मदतीची घोशणा केली. उद्घाटन सत्रात प्राचार्य माणिक माने व प्रा. गडवाल यांनी लिहिलेला ग्रंथ 'भारतातील आदिवासींचे समाजशास्त्र' तसेच प्रा. पी. के. कुलकर्णी यांनी लेखन केलेल्या 'डायमंड समाजशास्त्र शब्दकोश', डॉ. दादासाहेब मोटे यांच्या

'समाजशास्त्रीय विचारांचे आधार' आणि 'ग्रामीण समाजशास्त्र' इत्यादी ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. दुपारी १.३० वाजता 'सीमांतिक समूह: सीमांतिकरण' या परिसंवादास सुरूवात झाली. या परिसंवादासाठी अध्यक्ष म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील समाजशास्त्र विभागातील डॉ. एस. एल. गायकवाड उपस्थित होते. या परिसंवादात डॉ. श्रुती तांबे, समाजशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे व डॉ. विजय मारूळकर, माजी समाजशास्त्र विभाग प्रमुख, एस. एन. डी. टी. विद्यापीठ, मुंबई यांनी आपले विचार व्यक्त केले. दुपारी २ ते ५ या वेळात तीन ठिकाणी प्रतिनिधींच्या शोधनिबंधाचे सादरीकरण करण्यात आले. यातील 'शिक्षणाचे बाजारीकरण' या उपविषयांवर डॉ. आर. एन. साळवे यांच्या अध्यक्षतेखाली प्रा. पी. के. कुलकर्णी यांनी बीजभूमिका मांडली. या सत्रात एकूण १७ प्रतिनिधींनी आपल्या शोधनिबंधाचे सादरीकरण केले. 'शेती व सीमांतिक समूह' या उपविषयांवरील शोधनिबंध सादरीकरण सत्राचे अध्यक्षपद डॉ.सुधाशू गोरे यांनी भूषविले तर या सत्राची बीजभूमिका डॉ. सर्जेराव साळुंखे यांनी विशद केली. या सत्रामध्ये सुध्दा १४ प्रतिनिधींनी शोधनिबंधाचे वाचन केले. 'सीमांतिक समूह व प्रसार माध्यमे' या उपविषयांवर प्रा. श्रीकांत यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. धनराज पाटील यांनी बीजभूमिका मांडली. या सत्रातही १३ प्रतिनिधींनी शोधनिबंधाचे वाचन केले. सायंकाळी ५.३० ते ७.०० या वेळात परिषदेची आमसभा परिषदेचे अध्यक्ष डॉ. जगन कराडे यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. शनीवार दि. १९ जानेवारी रोजी सकाळी ९.३० ते १२.०० या वेळेत तीन ठिकाणी शोधनिबंधाचे सादरीकरण करण्यात आले. या सत्रामध्ये डॉ. दयावती पाडळकर, प्राचार्य माणिक माने व डॉ. स्मृती भोसले यांच्या अध्यक्षतेखाली प्रतिनिधींनी शोधनिबंध सादर केले. दुपारी १२ ते १.३० या वेळेत 'जातीव्यवस्था आणि सीमांतिक समूह' या परिसंवादात अध्यक्ष म्हणून डॉ. रमेश कांबळे, मुंबई विद्यापीठ, मुंबई यांनी आपले विचार व्यक्त केलेत. दुपारी २ ते ३.३० या कालावधीत डॉ. मंदा वाघ, डॉ. विजय सुर्यवंशी, डॉ. प्रदीप आगलावे यांच्या अध्यक्षतेखाली प्रतिनिधींनी शोंधनिबंधाचे सादरीकरण केले. दुपारी ३.०० ते ४.०० या कालावधीत डॉ. जी. एस. घुर्ये उत्कृष्ट शोधनिबंधाचे, निवडक चार प्रतिनिधींच्या शोधनिबंधाचे सादरीकरण मुंबई विद्यापीठ, मुंबई चे प्रा. बाळकृश्ण भोसले यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. या शोधनिबंधाच्या परीक्षण समितीचे प्रमुख डॉ. नारायण चौधरी, डॉ. ज्योती गगनग्रास व डॉ. सुधांशु गोरे यांनी सादरीकरणाचे चिकित्सक परीक्षण केले.

या अधिवेशनाचा समारोप सांयकाळी ४.०० वाजता भारती विद्यापीठ, पुणे चे माजी कुलगुरू डॉ. उत्तमराव भोईटे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. समाजशास्त्र परिषदेच्यावतीने डॉ. जगन कराडे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यानंतर डॉ. पी. एम. शिंदे यांच्या 'आंध आदिवासी समाज आणि परिवर्तन' या ग्रंथाचे प्रकाशनही करण्यात आले. डॉ. उत्तमराव भोईटे यांच्या हस्ते 'जय जोशी संदर्भ ग्रंथ पुरस्कार' डॉ. बी. एम. कन्हाडे यांच्या 'भारतातील सामाजिक चळवळ' या ग्रंथास प्रदान करण्यात आला. तर निवडक शोधनिबंधातील सादर झालेल्या डॉ. कालीदास भांगे यांच्या 'अनुसूचित जमातींच्या मुलींची शैक्षणिक स्थिती: संदर्भ औरंगाबाद जिल्हा' या शोधनिबंधास डॉ. जी. एस. घुर्ये उत्कृष्ट शोधनिबंध पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कार वितरणानंतर डॉ. उत्तमराव भोईटे यांनी परिषदेच्या समारोप प्रसंगी उपस्थित असलेल्या प्रतिनिधींची संख्या पाहून समाधान व्यक्त केले. तसेच समारोपीय मनोगत व्यक्त करतांना परिषदेसाठी रू. २५ हजारांच्या देणगीचीही घोशणा केली. समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित असलेले महाविद्यालयाचे प्राचार्य हिंदुराव पाटील यांनी अध्यक्षीय भाषणात परिषदेकडून खूप काही शिकता आले याचे समाधान व्यक्त केले. शेवटी प्रा. व्ही. एम. कदम यांनी सर्वांचे आभार मानून सामूहिक राष्ट्रगीतानंतर परिषदेची सांगता झाली.

अहवाल लेखक – प्रा. किरण सुरवसे, सचिव, मसप.

परिषदेचे चोविसावे अधिवेशन:– मराठी समाजशास्त्र परिषदेचे २४ वे अधिवेशन विवेकानंद कला, सरदार दलिपसिंग वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद येथे दि. १८ व १९ जानेवारी २०१४ रोजी संपन्न झाले. या अधिवेशनाला उद्घाटक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय पांढरीपांडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान व बीजभाषण डॉ. उत्तमराव भोईटे, माजी कुलगुरू यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक आणि भारती विद्यापीठ, पुणे यांनी केले. उद्घाटन प्रसंगी स्वागताध्यक्ष म्हणून विवेकानंद शिक्षण संस्था औरंगाबादचे अध्यक्ष मा. श्री. अक्षय शिसोदे तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे कोषाध्यक्ष मा. श्री. तुशार शिसोदे हे होते. प्रमुख उपस्थितीत डॉ. बा. ल. जोशी, माजी समाजशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एस. साळुंखे, मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. जगन कराडे, सचिव प्रा. किरण सुरवसे व कोषाध्यक्ष प्रा. विशाल जाधव यांची उपस्थिती होती.

उद्घाटनाच्या सत्रात मसप च्या वतीने महाराष्ट्रातील व भारतातील समाजशास्त्र विषयाच्या अनुषंगाने भरीव योगदान देणारे ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ. द. ना. धनागरे व डॉ. उत्तमराव भोईटे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय पांढरीपांडे यांच्या हस्ते मराठी समाजशास्त्र परिषदेचा जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यानंतर अधिवेशनातील चर्चिल्या जाणाऱ्या 'लिंगभाव असमानता' या विषयांवर बीजभाषण करतांना सदर विषयाची संकल्पनात्मक मांडणी करून डॉ. उत्तमराव भोईटे यांनी चिंतनात्मक भाष्य केले. उद्घाटन सत्रामध्ये प्रा. गोपाळ गांगर्डे यांनी लिहीलेल्या 'लोकसंख्या आणि समाज' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. दुपारी १२.०० वाजता 'लिंगभाव आणि समाज' या परिसंवादास सुरूवात झाली. या परिसंवादात डॉ. सी. डी. नाईक व डॉ. श्रुती तांबे, पूणे विद्यापीठ, यांनी विचार व्यक्त केले. दुपारी २ ते ४ या वेळात चार ठिकाणी प्रतिनिधींच्या शोधनिबंधाचे सादरीकरण करण्यात आले. यातील 'लिंगभाव असमानता: धर्म सामाजिक प्रतिष्ठा आणि मालमत्ता' या उपविषयांवर डॉ. वैशाली दिवाकर यांनी बीजभूमिका मांडून प्रतिनिधींनी आपल्या शोधनिबंधाचे वाचन केले. तर 'लिंगभाव असमानता: शिक्षण

आणि आरोग्य' या उपविषयांवरील डॉ. शुभांगी गोटे यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. सिंधू काकडे यांनी बीजभूमिका मांडली व प्रतिनिधींनी आपल्या शोधनिबंधाचे वाचन केले. 'स्त्री हिंसाचार : मानवी हक्क आणि कायदे' यावर डॉ. मच्छिंद्र सकटे यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. स्मृती भोसले यांनी बीजभूमिका मांडल्यानंतर प्रतिनिधींच्या शोधनिबंधाचे सादरीकरण झाले. 'मराठवाडयाचा विकास : सद्यस्थिती' या उपविषयांवर डॉ. दादासाहेब मोटे यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. दिलीप खैरनार यांनी बीजभूमिका मांडली व प्रतिनिधींनी आपल्या शोधनिबंधाचे वाचन केले.

दुपारी ४.०० वाजता चवथ्या सत्रामध्ये 'इरावती कर्वे स्मृती व्याख्यान' आयोजित करण्यात आले होते. यामध्ये प्रमुख वक्ते म्हणून डॉ. आर. के. मुटारकर माजी विभाग प्रमुख, मानवशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे यांचे व्याख्यान झाले.

सांयकाळी ५.३० वाजता परिषदेच्या सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले. सर्वसाधारण सभेत विविध विषयांवर चर्चा झाली. जून्या कार्यकारिणीस दोन वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्याने नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. या निवड प्रक्रियेत डॉ. बी. सी. बारीक यांनी निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहिले. नवीन कार्यकारिणी व पदाधिकारी निवडीनंतर सर्वसाधारण सभेचा समारोप करण्यात आला. रात्री ७.०० ते ८.०० या वेळेत महाविद्यालयाच्या सांस्कृतिक व संगीत विभागातील विद्यार्थ्यांनी सर्वांचे मनोरंजनासाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

रविवार दि. १९ जानेवारी २०१४ रोजी सकाळी ९.३० ते १२.०० या वेळेत चार ठिकाणी शोधनिबंधाचे सादरीकरण करण्यात आले. या विविध चार सत्रांमध्ये डॉ. राजेंद्र पाटील, कोल्हापूर. डॉ. सरोज आगलावे, नागपूर. डॉ. संजय साळुंखे, औरंगाबाद. डॉ. स्मिता अवचार, औरंगाबाद. डॉ. सुशीला फुले, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली प्रतिनिधींनी शोधनिबंध सादर केले. दुपारी १२.०० ते १.३० या कालावधीत 'ऑनर किलींग' या परिसंवादाचे अध्यक्ष संबलपूर विद्यापीठ, ओरीसा चे कुलगुरू डॉ. बी. सी. बारीक यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. छाया दातार व डॉ. पुश्पेशकुमार, केंद्रीय विद्यापीठ, हैदराबाद यांनी आपल्या विचारांची मांडणी केली. दुपारी २.०० ते ३.३० या कालावधीत प्रा. बाळा भोसले, डॉ. सुनिल मायी, डॉ. एस. डी. गौरे, डॉ. राम वाघ, प्रा. व्ही. जी. मोगल यांच्या अध्यक्षतेखाली प्रतिनिधींनी शोध निबंधाचे वाचन केले. दुपारी ३.३० ते ४.३० या वेळेत प्राचार्य डॉ. डी. डी. काचोळे व प्राचार्य डॉ. डी. डी. घोडगे यांच्या अध्यक्षतेखाली प्रतिनिधींनी शोधनिबंधाचे वाचन केले. सायंकाळी ४.३० वाजता अधिवेशनाच्या समारोपीय कार्यक्रमाला सुरूवात झाली. समारोप समारंभाचे प्रमूख पाहूणे शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचे माजी कुलगुरू व ज्येष्ठ विचारवंत डॉ. द. ना. धनागरे उपस्थित होते. कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. के. बी. लघाने हे उपस्थित होते तर प्रमुख उपस्थितीत विवेकानंद शिक्षण संस्था औरंगाबादचे सचिव मा. श्री. श्रीमंतराव शिसोदे व संस्थेचे उपाध्यक्ष मा. श्री. अमर शिसोदे उपस्थित होते. मा. डॉ. द. ना. धनागरे यांच्या हस्ते जय जोशी ग्रंथ पुरस्कार डॉ. सुधाकर जाधव यांच्या 'भारतीय आदिवासी समाज' या ग्रंथास प्रदान करण्यात आला. तर निवडक शोधनिबंधामधील सादर झालेल्या प्रा. सुधीर येवले यांच्या शोधनिबंधास डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट शोधनिबंध पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सर्व पुरस्कारानंतर २४ व्या अधिवेशनाच्या उत्कृष्ट आयोजनाबदद्ल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एस. साळुंके व संयोजक प्रा. बाळासाहेब शेंडगे यांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्ष म्हणून उपस्थित असलेले महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. के. बी. लघाने यांनी अशाप्रकारच्या अधिवेशनाचे आयोजन सातत्याने झाले पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त करून या अधिवेशनातून बरेच काही शिकता आले अशी भावना व्यक्त केली.

अहवाल लेखक – प्रा. बाळासाहेब शेंडगे, सचिव, मसप.

२०१४ ते २०१६. अध्यक्षा – डॉ. स्मिता अवचार, **सचिव** – प्रा. बालासाहेब शेंडगे, **कोषाध्यक्ष** – डॉ. बी. एन कावळे. **कार्यकारिणी सदस्य** – डॉ. डी. डी. घोडगे, नांदेड. डॉ. सरोज आगलावे, नागपूर. प्रा. एम. एस. शिंदे, डॉ. गजानन वेल्हे, डॉ. विकास शेवाळे, पुणे. डॉ. सुधाकर जाधव, डॉ. धनराज पाटील, सोलापूर. डॉ. अमोल पाटील, प्रा. प्रवीण घोडेस्वार, नाशिक. प्रा. शिवाजी उकरंडे, रत्नागिरी. प्रा. डी. एच. उराडे, गडचिरोली. **कार्यालयाचा पत्ता**:– समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

परिषदेचे पंचविसावे अधिवेशन – मराठी समाजशास्त्र परिषदेचे २५ वे राष्ट्रीय अधिवेशन कॅम्प एज्युकेशन सोसायटीचे डॉ. अरविंद ब. तेलंग वरिष्ठ महाविद्यालय, निगडी, पुणे येथे २६ व २७ डिसेंबर २०१४ रोजी संपन्न झाले. या अधिवेशनाचा मुख्य विषय 'भारतीय समाजासमोरील आव्हाने' असा होता. या अधिवेशनाचे उद्घाटन शुक्रवार दि. २६ डिसेंबर, २०१४ रोजी सकाळी १० वाजता संपन्न झाले. अधिवेशनाचे उद्घाटक म्हणून ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ व माजी कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचे डॉ. द. ना. धनागरे हे होते. तर बीजभाषक म्हणून इंडियन सोशिओलॉजिकल सोसायटीचे अध्यक्ष डॉ. आनंदकुमार हे होते. अधिवेशनाच्या दुसऱ्या सत्रात 'भारतीय समाजशास्त्राचा विकास' या विषयांवरील परिसंवादामध्ये डॉ. द. ना. धनागरे यांनी अध्यक्षस्थान भूषविले तर प्रमुख वक्ते म्हणून डॉ. आनंद कुमार, डॉ. सी. एस. एस. ठाकूर, राणी दुर्गावती विद्यापीठ, जबलपूर. डॉ. प्रांजल सरमा, दिब्रुगड विद्यापीठ, आसाम. हे उपस्थित होते. परिषदेच्या तिसऱ्या सत्रामध्ये प्रमुख वक्ते म्हणून डॉ. श्रुती तांबे, पुणे विद्यापीठ, पुणे व डॉ. संपत काळे, टाटा समाजविज्ञान संस्था, तुळजापूर हे उपस्थित होते तर या सत्राचे अध्यक्षपद डॉ. स्मिता अवचार यांनी भूषविले. परिषदेचे चवथे सत्र 'डॉ. इरावती कर्वे स्मृती व्याख्यान' या सत्राचे अध्यक्ष म्हणून डॉ. स्मिता अवचार, प्रमुख वक्ते डॉ. विद्युत भागवत यांनी 'इरावती कर्वे यांचे स्त्रीवादी आकलन' या विषयावर व्याख्यान दिले. परिषदेचे पाचवे सत्र हे शोधनिबंध सादरीकरणाचे होते. या सत्रात एकूण ११० शोधनिबंध सादर झाले. परिषदेच्या पंचविसाव्या अधिवेशनाचा समारोप दि. २७ डिसेंबर, २०१४ रोजी सांयकाळी ४ ते ६ दरम्यान झाला. या समारोपप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. उत्तमराव भोईटे, ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ व माजी कुलगुरू, भारती

विद्यापीठ, पुणे यांची प्रमुख उपस्थिती होती. तर अध्यक्ष म्हणून डॉ. व्ही. बी. गायकवाड, संचालक, बी. सी. यु. डी. सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे हे उपस्थित होते. या अधिवेशनात कै. जय जोशी उत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार, २०१४ डॉ. दीपक पवार, नागपूर यांच्या 'महिलांचे राजकीय सक्षमीकरण' या ग्रंथास देण्यात आला. तर कै. अनुराधा भोईटे उत्कृष्ट प्रकाशित लेख पुरस्कार डॉ. राहुल भगत, तुमसर यांना देण्यात आला. सदर परिषदेसाठी २०० समाजशास्त्राचे अभ्यासक उपस्थित होते.

अहवाल लेखन – डॉ. स्मिता अवचार, अध्यक्षा, मसप

परिषदेचे सव्वीसावे अधिवेशन:– मराठी समाजशास्त्र परिषदेचे २६वे राष्ट्रीय अधिवेशन एल. जे. एन. जे. महिला महाविद्यालय, विले–पार्ले मुंबई येथे दिनांक २५ व २६ मार्च २०१६ या कालावधीत संपन्न झाले. या राष्ट्रीय अधिवेशनाचा मुख्य विषय 'भारतीय शिक्षण आणि बदलते वास्तव' असा होता. या अधिवेशनाच्या पहिल्या सत्रात उद्घाटन कार्यक्रम शुक्रवार दि. २५ मार्च २०१६ रोजी सकाळी १० वाजता संपन्न झाला. उद्घाटक म्हणून मा. डॉ. आर. बी. पाटील, माजी समाजशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर हे लाभले तर बीजभाषक म्हणून मा. प्रा. डॉ. उत्तमराव भोईटे, माजी कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक हे होते. अधिवेशनाच्या दुसऱ्या सत्रामध्ये 'शिक्षणातील बदलती वास्तवता' या विषयांवरील परिसंवादामध्ये डॉ. स्मिता अवचार यांनी अध्यक्षस्थान भुषविले तर प्रमुख वक्ते म्हणून अरविंद वैद्य, माजी प्राचार्य नंदादीप विद्यालय, गोरेगांव मुंबई, डॉ. बालाजी केंद्रे, समाजशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई हे उपस्थित होते.

अधिवेशनाच्या तिसऱ्या सत्रामध्ये प्राध्यापकांच्या शोधनिबंधाचे सादरीकरण झाले. अधिवेशनाच्या चौथ्या सत्रात डॉ. इरावती कर्वे स्मृती व्याख्यान मालिकेत वक्त्या म्हणून डॉ. स्नेहलता देशमुख, माजी कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, मुंबई या होत्या. शनिवार दिनांक २६ मार्च २०१६ रोजी पाचव्या सत्रातून शोधनिबंधाचे सादरीकरण झाले. सहाव्या सत्रांमध्ये 'बदलते जागतिक वास्तव आणि शिक्षणाचा प्रश्न' या विषयांवरील परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी डॉ. विजय मारूळकर हे होते. या परिसंवादात वक्ते म्हणून डॉ. श्रुती तांबे, समाजशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ व डॉ. अंबुजा साळगांवकर, संचालक दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई या होत्या. सातव्या सत्रातून शोधनिबंधाचे सादरीकरण झाले. या अधिवेशनाचा समारोप दिनांक २६ मार्च २०१६ रोजी ४.३० वाजता झाला. या समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. पद्मा वेलीसकर, प्रोफेसर, सेंटर फॉर स्टडीज इन सोशिऑलॉजी ऑफ एज्युकेशन, टाटा समाज विज्ञान संस्था देवनार, मुंबई यांची उपस्थिती होती तर अध्यक्ष म्हणून डॉ. स्मितर अवचार यांनी स्थान भूषविले,तर प्राचार्य डॉ. स्मृती भोसले, एल. जे. एन. जे. महिला महाविद्यालय, विले पार्ले, मुंबई व डॉ. भारती तेंडूलकर, मराठी विभाग प्रमुख, एल. जे. एन. जे. महिला महाविद्यालय, विलेपार्ले, मुंबई हे प्रमुख उपस्थित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट शोध निबंध पुरस्कार प्रा. डॉ. मंजूषा नळगीरकर यांना 'ग्रामीण भागातील इंग्रजी शिक्षणाकडे वाढता कल आणि इंग्रजी शाळांची गुणवत्ता: एक बदलते वास्तव' या शोधनिबंधास पुरस्कार देण्यात आला.

अहवाल लेखन – डॉ. स्मिता अवचार, अध्यक्ष, मसप

०३ मार्च २०१६ ते ०४ फेब्रुवारी २०१८. मसप अध्यक्ष, डॉ. महेंद्रकुमार जाधव. सचिव – डॉ.अरूण पौडमल, कोषाध्यक्ष – डॉ. संध्या पौडमल. कार्यकारिणी सदस्य – डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण, नांदेड. डॉ. ज्योती पोटे, मुंबई. डॉ. सिंधु काकडे, मुबंई. डॉ. प्रशांत सोनवणे, जळगांव. डॉ. दिपक पवार, नागपूर. डॉ. सुभाश पवार, अमरावती. डॉ. विकास शेवाळे, पुणे. प्रा. दिवाकर उराडे, गडचिरोली. व डॉ. प्रविण घोडेस्वार, नाशिक यांचा समावेश होता. **कार्यालयाचा पत्ता:–** समाजशास्त्र विभाग कोल्हापूर महानगरपालीकेचे वायएमसी कॉलेज, कोल्हापूर.

मराठी समाजशास्त्र परिषदेच्या २६ व्या अधिवेशनात परिषदेच्या आमसभेत अध्यक्ष डॉ. स्मिता अवचार यांच्या उपस्थितीत डॉ. विजय मारूळकर यांची निवडणूक अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या उपस्थितीत नूतन पदाधिकाऱ्यांची निवड झाली. अध्यक्ष डॉ. महेंद्रकुमार जाधव, कोल्हापूर. सचिव डॉ. अरूण पौडमल व कोषाध्यक्ष म्हणून डॉ. संध्या पौडमल सातारा यांची निवड करण्यात आली. डॉ. जाधव यांच्याकडे परिषदेचा कार्यभार आला परंतु परिषदेची ठेवी मात्र त्यांना एक वर्षानंतर मिळाली. अशा परिस्थितीत डॉ. जाधव व डॉ. पौडमल यांनी स्वत:जवळचे रू. १ लाख परिषदेच्या खात्यात टाकून परिषदेचा कार्यभार चालविला हे विशेष. डॉ. महेंद्रकुमार जाधव यांच्या कार्यकाळात कोल्हापूर येथून मराठी समाजशास्त्र परिषदेचे नवीन संकेतस्थळ सुरू करण्यात आले. तसेच प्रथमच मराठी समाजशास्त्र परिषदेच्या सदस्यांची यादी या संकेतस्थळावर देण्यात आली. याच कार्यकाळात परिषदेची आर्थिक बाजू अधिक मजबूत करण्यासाठी विविध विद्यापीठे व महाविद्यालये यांच्यांसोबत मसप चा सामंजस्य करार करण्यास सुरूवात झाली. तसेच जुन्या सदस्यांकडून परिषदेसाठी अधिकचे ५०० रू. सुध्दा जमा करण्यात आले. परंतु हे ५०० रू. जमा करणाऱ्या सदस्यांची संख्या फारच कमी होती. डॉ. जाधव यांच्या कार्यकाळात जळगांव आणि जुआरीनगर गोवा येथे अधिवेशने झालीत. एम. जे. कॉलेज, जळगांव येथील अधिवेशनात बिजभाषक म्हणून जागतिक किर्तीचे मानववंशशास्त्रज्ञ डॉ. व्हर्जिनियस खाका व उद्घाटक म्हणून जागतिक किर्तीच्या समाजशास्त्रज्ञ डॉ. गेल ऑम्वेट उपस्थित होत्या. आत्तापर्यंत मसप फक्त महाराष्ट्र राज्यातच सिमित होती. राज्याची सीमा ओलांडून गोवा राज्यात मसप चे अधिवेशन घेण्याचे श्रेय डॉ. महेंद्रकुमार जाधव व डॉ. अरूण पौडमल यांनाच आहे. एम. ई. एच. कॉलेज, जुआरीनगर, गोवा येथील मसप च्या अधिवेशना बिजभाषक म्हणून इंडीयन सोशिओलॉजिकल सोसायटीच्या डॉ. आर. इंदिरा उपस्थित होत्या.

परिषदेचे सत्ताविसावे अधिवेशन:– मराठी समाजशास्त्र परिषदेचे २७ वे राष्ट्रीय अधिवेशन मू. जे. महाविद्यालय, जळगांव येथे दिनांक ३ व ४ फेब्रुवारी २०१७ या कालावधीत संपन्न झाले. या अधिवेशनाचा मुख्य विषय 'भारतातील आदिवासी : प्रश्न आणि आव्हाने' असा होता. या अधिवेशनाच्या पहिल्या

सत्रात उद्घाटन कार्यक्रम शुक्रवार दि. ३ फेब्रुवारी २०१७ रोजी सकाळी १० वाजता संपन्न झाला. उद्घाटक म्हणून आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या समाजशास्त्रज्ञ आणि इतिहासकार मा. डॉ. गेल ऑम्वेट या लाभल्या होत्या. तर बीजभाषक म्हणून मा. डॉ. व्हर्जिनियस खाका, सुप्रतिष्ठित प्रोफेसर तेजपूर विद्यापीठ, आसाम हे होते. आणि प्रमुख उपस्थिती नजूंबाई गावीत, विशेष पुरस्कार नंदूरबार हया होत्या तर सत्रात अध्यक्षस्थानी मा. डॉ. व्ही. आर. पाटील, सदस्य के. सी. ई. सोसायटी, जळगांव हे होते. अधिवेशनाच्या दुसऱ्या सत्रात डॉ. इरावती कर्वे स्मृती व्याख्यान मालिकेत 'समाजशास्त्रातील नवे सिध्दांत आणि प्रवाह' या विषयावर वक्ते म्हणून प्रा. रमेश कांबळे, मुंबई विद्यापीठ, मुंबई हे होते तर डॉ. प्रदीप आगलावे, नागपूर विद्यापीठ, नागपूर हे अध्यक्षस्थानी होते.

अधिवेशनाच्या तिसऱ्या सत्रामध्ये 'जल, जंगल, जमीन आणि आदिवासी' या विषयांवरील परिसंवादामध्ये डॉ. बी. के. खडसे, ज्येष्ठ निवृत्त प्राचार्य यांनी अध्यक्षस्थान भुषविले तर प्रमुख वक्ते म्हणून मा. डॉ. भारत पाटणकर, डॉ. कुमार शिराळकर, मा. वाहरू सोनवणे हे उपस्थित होते. अधिवेशनाच्या चवथ्या सत्रामध्ये प्राध्यापक व संशोधक विद्यार्थी यांच्या शोधनिबंधाचे सादरीकरण झाले. शनिवार दि. ४ फेब्रुवारी २०१७ रोजी पाचव्या सत्रामध्ये 'आदिवासी चळवळींचा इतिहास आणि वर्तमान वास्तव: समाजशास्त्रीय दृष्टीक्षेप' या विषयावरील परिसंवादामध्ये अध्यक्षस्थानी डॉ. लभाणे, मू. जे. महाविद्यालय, जळगांव हे होते तर परिसंवादात वक्ते म्हणून मा. किशोर ढाले, डॉ.नारायण भोसले, प्रा. के. के. वळवी, प्रा. देवेंद्र इंगळे हे होते. सहाव्या सत्रातून शोधनिबंधाचे सादरीकरण झाले. या अधिवेशनाचा समारोप दिनांक ४ फेब्रुवारी २०१७ रोजी सांयकाळी ४.०० वाजता झाला. समारोप प्रसंगी प्रमूख पाहूणे म्हणून डॉ. ए. एस. पैठणे, माजी अधिष्ठाता, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांची उपस्थिती होती तर अध्यक्षस्थान डॉ. उदय कुळकर्णी, प्राचार्य मू. जे. महाविद्यालय, जळगांव यांनी भूषविले. कै. जय जोशी उत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार २०१७ प्रा. संजयकुमार कांबळे, सावित्रीबाई फुले विद्यापीठ,पुणे यांच्या 'दलित स्त्रियांच्या मुक्तीचा प्रश्न' या ग्रंथास देण्यात आला. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट शोधनिबंध पुरस्कार डॉ. बाबुराव जाधव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांना देण्यात आला. तसेच विद्यार्थ्यासाठी डॉ. जी. एस. घुर्ये उत्कृष्ट शोधनिबंध पुरस्कार प्रा. विजय चंद्रकांत गायकवाड, पीएच. डी. संशोधक विद्यार्थी, सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे यांना देण्यात आला. सौ. प्रतिभा कुलकर्णी स्मृती उत्कृष्ट महिला प्राध्यापक पुरस्कार प्राचार्य डॉ. स्मृती भोसले, एल. जे. एन. जे. महिला महाविद्यालय, विलेपार्ले, मुंबई यांना देण्यात आला. डॉ. भा. कि. खडसे व डॉ. शब्बीर शेख या दोन मान्यवरांना मराठी समाजशास्त्र परिषदेतर्फे दिल्या जाणाऱ्या जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. प्राचार्य डॉ. उदय कुळकर्णी, डॉ. एस. ए. पैठणे यांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वितरण करून समारोप सोहळा संपन्न झाला. प्रा. सागर बडगे यांनी उपस्थितांचे आभार मानल्यानंतर परिषदेची सांगता झाली.

अहवाल लेखक – डॉ. अरूण पौडमल, सचिव, मसप

परिषदेचे अठ्ठाविसावे अधिवेशन – मराठी समाजशास्त्र परिषदेचे २८ वे राष्ट्रीय अधिवेशन एम. ई. एस. कॉलेज ऑफ आर्टस अॅन्ड कॉमर्स, गोवा येथे दिनांक २ व ३ फेब्रुवारी, २०१८ रोजी संपन्न झाले. यर अधिवेशनाचा मुख्य विषय 'भारतातील पर्यटन आणि विकास: समस्या आणि चिंतन' असा होता.

या अधिवेशनाच्या पहिल्या सत्रात उद्घाटन कार्यक्रम शुक्रवार दिनांक २ फेब्रुवारी, २०१८ रोजी सकाळी १०.३० वाजता संपन्न झाला. उद्घाटक म्हणून मा. श्री. संतोष काबाल, मंत्री, पर्यटन विकास, गोवा हे लाभले तर बीजभाषक म्हणून मा. डॉ. आर. इंदिरा, अध्यक्ष, इंडियन सोशीऑलॉजीकल सोसायटी, न्यू दिल्ली या होत्या, आणि प्रमुख उपस्थिती मा. एस. एस. कामत, अध्यक्ष, मूरगांव एज्युकेशन सोसायटी, गोवा यांची होती. अधिवेशनाच्या दुसऱ्या सत्रात डॉ. इरावती कर्वे स्मृती व्याख्यान मालिकेत 'पर्यटन व पर्यावरण या वरील जागतिकीकरण आणि विकास याचा परिणाम' या विषयावर वक्ते म्हणून डॉ. संपत काळे, तुळजापूर व श्री. जयवंत ढवळे, गोवा हे होते तर प्रा. डी. श्रीकांत, कोल्हापूर हे अध्यक्षस्थानी होते. अधिवेशनाच्या तिसऱ्या सत्रामध्ये 'सामाजिक जीवन आणि पर्यावरणावर पर्यटनाचे परिणाम' या विषयावरील परिसंवादामध्ये डॉ. रमेश भांगलेकर, अधिव्याख्याता, कर्नाटक विद्यापीठ, धारवाड यांनी अध्यक्षस्थान भुषविले. चवथ्या सत्रामध्ये प्राध्यापक व संशोधक विद्यार्थी यांच्या शोधनिबंधाचे सादरीकरण झाले. शनिवार दि. ३ फेब्रुवारी, २०१८ रोजी पाचव्या सत्रामध्ये 'पर्यावरणाची सद्यस्थिती' या विषयांवरील परिसंवादामध्ये अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुरेश वाघमारे, लातूर हे होते, तर वक्ते म्हणून डॉ. दिलीप खैरनार, औरंगाबाद हे होते. सहाव्या सत्रांमध्ये शोधनिबंधाचे सादरीकरण झाले. या अधिवेशनाचा समारोप दि. ३ फेब्रुवारी, २०१८ रोजी सांयकाळी झाला.

या समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मा. प्रसाद कामत, के. एस. ई. सोसायटी, कर्नाटक यांची उपस्थिती होती तर अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. आर. बी. पाटील, एम. ई. एस. कॉलेज, गोवा यांनी भुषविले. या कार्यक्रमातच प्रा. डी. श्रीकांत, निवृत्त प्राध्यापक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व प्रा. सुकुमार शेटटे, निवृत्त प्राध्यापक, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा या दोन मान्यवरांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच डॉ. शुभांगी गोटे–गव्हाणे, औरंगाबाद यांना उत्कृष्ट महिला प्राध्यापिका या पुरस्काराने गौरविण्यात आले. कै. जय जोशी उत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार २०१८ डॉ. नारायण कांबळे, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, शिरूर ताजबंद यांच्या ''महात्मा फुल्यांची धर्मचिकित्सा'' या ग्रंथास देण्यात आला. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट शोधनिबंध पुरस्कार डॉ. माधवी रेणावीकर, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांना देण्यात आला. तसेच विद्यार्थ्यासाठी डॉ. जी. एस. घुर्ये उत्कृष्ट शोध निबंध पुरस्कार कु. स्नेहल पटट्नशेट्टी, संशोधक विद्यार्थीनी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर हीला देण्यात आला. तसेच प्राचार्य डॉ. आर. बी. पाटील, मा. प्रसाद कामत, डॉ. महेन्द्रकुमार जाधव, डॉ. अरूण पौडमल यांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करून समारोप सोहळा संपन्न झाला.

अहवाल लेखन – डॉ. अरूण पौडमल, सचिव, मसप

०४ फेब्रुवारी २०१८ ते २४ जानेवारी २०२०. अध्यक्ष – डॉ. सरोज प्रदीप आगलावे. **सचिव –** डॉ. दिपक पवार, **कोषाध्यक्ष –** डॉ. राहुल भगत. **कार्यकारिणी सदस्य –** प्रा. साहेबराव भालेराव, नांदेड. डॉ. ज्योती पोटे, मुंबई. डॉ. भरतसिंग पटले, मुंबई. डॉ. चुडामन पगारे, जळगांव. डॉ. सतीश देसाई, कोल्हापूर. प्रा. नंदकिशोर राऊत, अमरावती. डॉ. विकास शेवाळे, पुणे. डॉ. अशोक सालोडकर, गडचिरोली. प्रा. प्रवीण घोडेस्वार, नाशिक. डॉ. हनुमंत मिसाळ, औरंगाबाद. डॉ. रामेश्वर मोरे, सोलापूर. **कार्यालयाचा पत्ता**: समाजशास्त्र विभाग, महिला महाविद्यालय, नंदनवन, नागपूर.

मराठी समाजशास्त्र परिषदेचे २८ वे अधिवेशन एम. ई. एच. कॉलेज जुआरीनगर, गोवा येथे ०३ व ०४ फेब्रुवारी २०१८ ला संपन्न झाले. या अधिवेशनात परिषदेच्या आमसभेत अध्यक्ष डॉ. महेंद्रकुमार जाधव यांच्या उपस्थितीत डॉ. दिलीप खैरनार, निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या मार्गदर्शनात मराठी समाजशास्त्र परिषदेच्या नूतन पदाधिकाऱ्यांची निवड झाली. अध्यक्ष डॉ. सरोज आगलावे, नागपूर. सचिव डॉ. दिपक पवार व कोषाध्यक्ष म्हणून डॉ. राहुल भगत यांची निवड करण्यात आली. डॉ. सरोज आगलावे यांच्या कार्यकाळात मराठी समाजशास्त्र परिषद अधिक लोकाभिमूख करण्यात आली. या काळात डॉ. राहुल भगत यांनी मसप चे व्हॉटसअप ग्रुप व फेसबुक ग्रुप बनवून परिषद अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला. डॉ. सरोज आगलावे यांच्या कार्यकारिणीकडे कारभार हस्तांतरीत केला, तेव्हा १११६ आजीवन सभासद होते, त्यांनतर नवीन आजीवन सभासदांची भर टाकून आज एकूण आजीवन सभासदांची संख्या ११६२ आहे गेल्या काही वर्षात नवीन प्राध्यापक भरती झाली नसतांना ४६ नवीन आजीवन सदस्यांना मसप शी जोडले हे विशेष होय. डॉ. आगलावे यांच्या कार्यकारिणीला मागील कार्यकारिणी कडून रूपये ८,८२,२८२/– हस्तांतरीत करण्यात आले होते त्यापैकी या कार्यकारिणीने फिक्स डिपॉझिट रूपये ८,००,०००/– केले. उरलेले रूपये ८२,२८२/–. त्यामध्ये विद्यमान कार्यकारीनीने आजीवन सभासद शुल्क, २९ व्या अधिवेशनाच्या आयोजनकर्त्यांकडून दहा टक्के मिळालेली रक्कम, काही झालेले एम. ओ. यू., अतिरिक्त वाढीव शुल्क रूपये ५००/–, प्रवास व इत्तर खर्चात बचत आणि विशेष म्हणजे समाजशास्त्र संशोधन पत्रिकेच्या छपाई व प्रकाशन खर्चात केलेली मोठी बचत यामुळे उत्पन्नात खूप मोठी भर पडली. २०१९–२० करिता फिक्स डिपॉझिट रूपये ९,००,०००/– केले आहे. डॉ. आगलावे यांच्या कार्यकाळात समाजशास्त्र संशोधन पत्रिका 'पिअर रिव्हयू जर्नल' झाले असुन आजीवन सभासदांचे शोध निबंध प्रकाशित करण्याकरिता मोठा प्लॅटफार्म उपलब्ध झाला आहे, या काळात प्रकाशित शोध निबंधाची संख्या व गुणवत्ता वाढविण्यात परिषद यशस्वी राहिली. डॉ. सरोज आगलावे यांच्या कार्यकाळातील सर्वात मोठी उपलब्धी म्हणजे डॉ. प्रदीप आगलावे यांच्याकडून मराठी समाजशास्त्र परिषदेला मिळालेली **रू. १ लाखाची देणगी** हे होय. नागपूर विद्यापीठातील माजी प्राध्यापक व विभाग प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभाग व समाजशास्त्र विषयाचे ३५ ग्रंथाचे लिखाण करणारे डॉ. प्रदीप आगलावे यांनी परिषदेला रू. १ लाख देणगी स्वरूपात अमरावतीच्या अधिवेशात परिषदेकडे सुपूर्द केले. या देणगीच्या व्याजाच्या पैशातून समाजशास्त्र विषयातील उत्कृष्ट प्राध्यापक हा पुरस्कार सुरू करण्यात यावा अशी सुचना डॉ. प्रदीप आगलावे यांनी केली. मसप च्या ३१ व्या अधिवेशनापासून **'समाजशास्त्र विषयातील उत्कृष्ट प्राध्यापक'** हा पुरस्कार सुरू करण्यात येईल अशी ग्वाही अध्यक्षा डॉ. सरोज आगलावे यांनी दिली.

डॉ. सरोज आगलावे यांच्या कार्यकाळात मराठी समाजशास्त्र परिषदेचे २९ वे राष्ट्रीय अधिवेशन नागपूर येथे व ३० वे राष्ट्रीय अधिवेशन अमरावती येथे पार पडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, ब्रम्हपूरी यांनी नागपूर येथे आयोजित केलेल्या २९ व्या राष्ट्रीय अधिवेशनात बिजभाषक म्हणून जवाहरलाल नेहरू विद्यापीठ दिल्ली चे समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विवेककुमार उपस्थित होते. तर तक्षशिला महाविद्यालय, अमरावती यांनी आयोजित केलेल्या ३० व्या राष्ट्रीय अधिवेशनात बिजभाषक म्हणून इंडियन सोशिओलॉजिकल सोसायटी, दिल्ली चे माजी अध्यक्ष डॉ. आनंदकुमार उपस्थित होते.

अमरावती येथील ३० व्या अधिवेशनात मसप च्या नूतन कार्यकारिणीची निवड करण्यात आली असून त्यात अध्यक्ष म्हणून डॉ. नारायण कांबळे, सचिव – डॉ. वेदप्रकाश मलवाडे, कोषाध्यक्ष – प्रा. बळीराम पवार व कार्यकारिणी सदस्य म्हणून डॉ. श्रीराम खाडे, अमरावती. डॉ. प्रदीप गजभिये, नागपूर. डॉ. प्रविण घोडेस्वार, नाशिक. यांची निवड करण्यात आली.

परिषदेचे एकोणतिसावे अधिवेशन – मराठी समाजशास्त्र परिषदेचे २९ वे राष्ट्रीय अधिवेशन गोंडवाना विद्यापीठ संलग्नीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय, ब्रम्हपुरी, जिल्हा चंद्रपूर यांनी आयोजित केलेले, चिंतनसभागृह, वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (वनामती), धरमपेठ, नागपूर येथ दिनांक १८ व १९ जानेवारी २०१९ रोजी संपन्न झाले. या राष्ट्रीय अधिवेशनाचा मुख्य विषय जनसंवाद आणि सामाजिक माध्यमांचा भारतीय समाजावर प्रभाव' असा होता. या राष्ट्रीय अधिवेशनाच्या पहिल्या सत्रात उदृघाटन कार्यक्रम शुक्रवार दिनांक १८ जानेवारी २०१९ रोजी सकाळी १०. ०० वाजता संपन्न झाला. उदृघाटक म्हणून मा. डॉ. सिध्दार्थ विनायक काणे, कुलगुरू, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर हे लाभले होते. तर बिजभाषक म्हणून मा. डॉ. विवेककुमार, समाजशास्त्र विभाग प्रमुख, जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, दिल्ली हे होते, प्रमुख अतिथी मा. डॉ. बी. के. स्वाई, समाजशास्त्र विभाग प्रमुख, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर हे होते आणि अध्यक्ष म्हणून मा. गिरीश गांधी, अध्यक्ष, वनराई, नागपूर लाभले होते. अधिवेशनाच्या दुसऱ्या सत्रात 'नव सामाजिक समस्यांच्या उदयात सामाजिक माध्यमांची भुमिका' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. या परिसंवादाचे प्रमुख वक्ता मा. डॉ. जगन कराडे, व अध्यक्ष मा. सुरेश द्वादशीवार, संपादक, दैनिक लोकमत हे होते.

अधिवेशनाच्या तिसऱ्या सत्रात डॉ. इरावती कर्वे स्मृती व्याख्यान मालिकेत 'सामाजिक चळवळी, प्रतीचळवळी आणि

माध्यमांची भुमिका' या विषयावर वक्ते म्हणून डॉ. उमेश बगाडे, औरंगाबाद, हे होते तर डॉ. शेख शब्बीर, नागपूर हे अध्यक्षस्थानी होते. शनिवार, दिनांक १९ जानेवारी, २०१९ रोजी अधिवेशनाच्या सकाळच्या चवथ्या सत्रामध्ये प्राध्यापक व संशोधक विद्यार्थी यांच्या शोध निबंधाचे सादरीकरण झाले. दुपारच्या पाचव्या सत्रामध्ये 'सामाजिक माध्यमातून उदयास आलेल्या नवसमस्यांचे निराकरण' या विषया वरील परिसंवादा मध्ये प्रमुख वक्ते मा. मतीन भोसले, प्रश्नाचिन्ह आश्रमशाळा, मंगरूळ चव्हाळा, अमरावती आणि डॉ. राजेंद्र गोणारकर, माध्यमशास्त्र संकूल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, हे होते तर अध्यक्षस्थानी प्रा. भाऊराव खोब्रागडे, नागपूर हे होते.

या अधिवेशनाचा समारोप व पुरस्कार वितरण समारंभ दिनांक १९ जानेवारी २०१९ ला झाला. समारोपाच्या कार्यक्रमाला मुख्य अतिथी, 'माझे गांव माझे सरकार' ही चळवळ चालविणारे मा. देवाजी तोफा, आदीवासी समाजसेवक, मेंढा–लेखा ,जि. गडचिरोली, प्रमुख उपस्थिती मा. प्रा. देवेश कांबळे, सचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षण संस्था, चांदा आणि मा. प्राचार्य डॉ. अझिझुल हक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय, ब्रम्हपुरी, यांची होती. अध्यक्षस्थानी मा. निवृत्त न्यायमुर्ती किशोर रोही, नागपूर खंडपीठ यांनी भुषविले. या कार्यक्रमात डॉ. पी. जी. जोगदंड, माजी समाजशास्त्र विभागप्रमुख, मुंबई विद्यापीठ, मुंबई व डॉ. आर. बी. पाटील, माजी समाजशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या दोन मान्यवरांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच डॉ. स्मिता अवचार, समाजशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना उत्कृश्ट महिला प्राध्यापिका' या पुरस्काराने गौरविण्यात आले. २०१९ चा कै. जय जोशी संदर्भ/क्रमिक ग्रंथ पुरस्कार डॉ. खंडेरावजी एस. काळे, कला वाणिज्य महाविद्यालय, कोवाड, ता. चंदगड, जि. कोल्हापूर, यांच्या 'भारतीय सामाजिक चळवळी' या ग्रथांस देण्यात आला. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट शोध निबंध पुरस्कार प्रा. डॉ. माधवी रेणावीकर, समाजशास्त्र विभाग, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, यांना देण्यात आला. तसेच विद्यार्थ्यासाठी डॉ. जी. एस. घुर्ये उत्कृष्ट शोधनिबंध पुरस्कार, मोहिनी प्रकाश कनकदंडे, संशोधक विद्यार्थिनी, स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड यांना देण्यात आला. आणि डॉ. अनुराधा भोईटे उत्कृष्ट प्रकाशित लेख पुरस्कार प्रा. डॉ. श्रीनिवास पिलगुलवार, लोकमान्य महाविद्यालय, वरोरा, जि. चंद्रपूर यांना देण्यात आला. तसेच मा. निवृत्त न्यायमुर्ती किशोर रोही, मा. देवाजी तोफा, मसप च्या अध्यक्षा–डॉ. सरोज आगलावे, सचिव–डॉ. दीपक पवार, कोषाध्यक्ष–डॉ. राहुल भगत, प्राचार्य डॉ. अझिझुल हक यांच्या हस्ते स्मृती चिन्ह व प्रमाणपत्रांचे वितरण करून सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचालन डॉ. राहुल भगत यांनी केले तर सचिव डॉ. दीपक पवार यांनी आभार व्यक्त केले.

अहवाल लेखन – डॉ. दिपक पवार, सचिव, मसप

परिषदेचे तिसावे अधिवेशन:– मराठी समाजशास्त्र परिषदेचे ३० वे राष्ट्रीय अधिवेशन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नीत तक्षशिला महाविद्यालय, अमरावती यांनी आयोजित केलेले, 'राजवाडा' देशमुख लॉन समोर, शेगाव नाका रोड, अमरावती येथे दिनांक २३ व २४ जानेवारी २०२० रोजी संपन्न झाले. या राष्ट्रीय अधिवेशनाचा विषय 'भारतातील समाजशास्त्राची शतकपुर्ती' हा होता.

या राष्ट्रीय अधिवेशनाच्या पहिल्या सत्रात उदृघाटन कार्यक्रम गुरूवार दिनांक २३ जानेवारी २०२० रोजी सकाळी १०.०० वाजता संपन्न झाला. उदृघाटक म्हणून मा. डॉ. मुरलीधर चांदेकर, कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती हे लाभले होते. तर बिजभाषक म्हणून मा. डॉ. आनंदकुमार, माजी अध्यक्ष, इंडीयन सोशिआलॉजिकल सोसायटी, नवी दिल्ली व माजी प्राध्यापक समाजशास्त्र विभाग, जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, दिल्ली हे होते, प्रमुख अतिथी मा. डॉ. अविनाश मोहरील, अधिष्ठाता, मानव्यविज्ञान व सामाजिक शास्त्रे, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, डॉ. बी. के. नायक समाजशास्त्र विभाग – प्रमुख, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, आणि डॉ. सरोज आगलावे, अध्यक्षा, मराठी समाजशास्त्र परिषद, डॉ. मल्लू पडवाल, प्राचार्य, तक्षशिला महाविद्यालय, अमरावती, हे होते आणि अध्यक्ष म्हणून मा. सौ. किर्तीताई राजेश अर्जुन, अध्यक्ष, श्री दादासाहेब गवई चॅरीटेबल ट्रस्ट, अमरावती या लाभल्या होत्या. या कार्यक्रमात डॉ. प्रकाश बोबडे, माजी–समाजशास्त्र विभागप्रमुख, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर व डॉ. सुरेश वाघमारे, प्राध्यापक – राजश्री शाहू छत्रपती महाविद्यालय, लातुर या दोन मान्यवरांना 'जीवन गौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. उद्घाटन कार्यक्रमानंतर मा. डॉ. आनंदकुमार यांचे अभ्यासपुर्ण व छान बीजभाषण झाले. अधिवेशनाच्या दुसऱ्या सत्रात 'भारतातील समाजशास्त्राचा विकास' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. या परिसंवादाचे प्रमुख वक्ता मा. डॉ. शंकर गायकवाड, माजी समाजशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद आणि अध्यक्ष मा. डॉ. पी. जी. जोगदंड, माजी समाजशास्त्र विभाग प्रमुख, मुंबई विद्यापीठ, मुंबई हे होते. अधिवेशनाच्या तिसऱ्या सत्रात डॉ. इरावती कर्वे स्मृती व्याख्यानमालिकेत 'महाराष्ट्रातील मानवशास्त्रीय संशोधने' या विषयावर वक्ते म्हणून डॉ. शौनक कुळकर्णी, प्राध्यापक आणि प्रमुख, मानवशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, हे होते तर डॉ. डी. श्रीकांत, माजी प्राध्यापक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर हे अध्यक्षस्थानी होते.

संध्याकाळी ६.०० वाजता मराठी समाजशास्त्र परिषदेचे ३० वी आमसभा पार पडली, यामध्ये आमसभेच्या कार्यक्रम पत्रिकेनुसार विविध विषयावर चर्चा करून ठराव पारीत करण्यात आलेत. परिषदेचे कोषाध्यक्ष व संशोधन पत्रिकेचे कार्यकारी संपादक डॉ. राहुल भगत यांनी व्यक्ती परिचय ग्रंथाच्या संदर्भात आजपर्यंत झालेल्या कामाची माहिती सदस्यांना दिली. तसेच या ग्रंथासाठी समाजशास्त्राच्या प्राध्यापकांनी आपला परिचय लवकरात लवकर पाठवावा अशी विनंती सर्व सदस्यांना केली. परिषदेचे सचिव डॉ. दिपक पवार यांनी **परिषदेच्या फिक्स डिपॉझीटला**

कोणत्याही कार्यकारिणीने कोणत्याही परिस्थितीत हात लावू नये उलट यामध्ये भर कशी टाकता येईल याचा विचार नवीन कार्यकारिणीने करावा असा ठराव मांडला. या ठरावाला सभेच्या सर्व सदस्यांनी होकार देवून प्रस्तुत ठराव सर्वानूमते मंजूर करण्यात आला. या सभेत डॉ. प्रदीप आगलावे सर यांनी 'उत्कृष्ट पुरूष प्राध्यापक' या पुरस्काराकरीता रूपये एक लाख चा धनादेश दिला. वर्तमान कार्यकारिणीचा कार्यकाळ पुर्ण होत असल्यामुळे नवीन कार्यकारिणी निवडण्याचा ठराव मांडण्यात आला परंतु कोणत्याही स्थितीत सार्वमत न झाल्यामुळे निवडणूक घेण्यात आली. यावेळी मतमोजणी होऊन अध्यक्षपदी स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड चे प्रा. डॉ. नारायण कांबळे बहूमताने निवडून आले, सचिवपदी डॉ. वेदप्रकाश मलवाडे आणि कोषाध्यक्ष म्हणून डॉ. बळीराम पवार यांची निवड करण्यात आली. शुक्रवार, दिनांक २४ जानेवारी, २०२० रोजी अधिवेशनाच्या सकाळच्या चवथ्या सत्रामध्ये प्राध्यापक व संशोधक विद्यार्थी यांच्या शोध निबंधाचे सादरीकरण दोन सत्रात झाले. दुपारच्या पाचव्या सत्रामध्ये 'समाजशास्त्राचे समकालीन संदर्भ' या विषया वरील परिसंवादा मध्ये प्रमुख वक्ते मा. प्रा. रमेश कांबळे, मुंबई विद्यापीठ, मुंबई, हे होते तर अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. नारायण चौधरी, माजी प्राध्यापक, य. च. म. मु. वि. नाशिक हे होते.

या अधिवेशनाचा समारोप शनिवार, दिनांक २४ जानेवारी २०२० ला दुपारी ३.०० वाजता झाला. या पुरस्कार वितरण व समारोपाच्या कार्यक्रमाला अध्यक्षस्थानी मा. डॉ. कमलताई गवई, संस्थापक अध्यक्ष, श्री दादासाहेब गवई चॅरीटेबल ट्रस्ट, अमरावती तर मुख्य अतिथी, प्रा. पी. आर. एस. राव, सचिव, श्री दादासाहेब गवई चॅरीटेबल ट्रस्ट, डॉ. मल्लू पडवाल, प्राचार्य, तक्षशिला महाविद्यालय, अमरावती, डॉ. सुदाम भगत प्राचार्य, रामकृश्ण महाविद्यालय, दारापूर, जि. अमरावती, डॉ. सरोज आगलावे, अध्यक्षा, मराठी समाजशास्त्र परिषद, डॉ. दीपक पवार, सचिव, मराठी समाजशास्त्र परिषद, डॉ. राहुल भगत, मराठी समाजशास्त्र परिषद हे होते. या कार्यक्रमात डॉ. ज्योती गगनग्रास, समाजशास्त्र विभाग प्रमुख, मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पुणे यांना 'उत्कृष्ट महिला प्राध्यापिका' या पुरस्काराने गौरविण्यात आले. २०२० चा 'कै. जय जोशी संदर्भ/क्रमिक ग्रंथ' पुरस्कार प्रा. संजयकुमार कांबळे, साहाय्यक प्राध्यापक, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, यांनी लिहिलेल्या 'जातिअंताचे समाजशास्त्र या ग्रथांस देण्यात आला. तर 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट शोध निबंध' पुरस्कार प्रा. राकेश भगवान पाटील, सार्वजनिक कला व वाणिज्य महाविद्यालय, विसरवाडी, ता. नवापूर, जि. नंदुरबार, यांच्या ३० व्या राष्ट्रीय अधिवेशनात सादर केलेल्या 'महाराष्ट्रातील समाजशास्त्रीय संशोधनाचे स्वरूप: शोधगंगा संकेतस्थळावरील शोधप्रबंधांचे आशय विश्लेषण' या लेखास देण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांसाठी डॉ. जी. एस. घुर्ये उत्कृष्ट शोधनिबंध' पुरस्कार, डॉ. राजेंद्र फकिरा बगाटे, संशोधन विद्यार्थी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, यांच्या ३० व्या राष्ट्रीय अधिवेशनात सादर केलेल्या 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय समाजशास्त्रातील योगदान' या लेखास देण्यात आला. आणि डॉ. अनुराधा भोईटे उत्कृष्ट प्रकाशित लेख पुरस्कार डॉ. सुधीर येवले, सहाय्यक. प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख, कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरूर (का.), जि. बीड यांच्या प्रकाशित झालेल्या 'मसणजोगी जाती समोरील आव्हाने: शिरूर (का.) तालुक्याच्या संर्दभातील समाजशास्त्रीय अभ्यास' या लेखास देण्यात आला. तसेच मा. डॉ. कमलताई गवई, मा. सौ. किर्तीताई राजेश अर्जुन, प्रा. पी. आर. एस. राव, म.स.प. च्या अध्यक्षा– डॉ. सरोज आगलावे, सचिव–डॉ. दीपक पवार, कोषाध्यक्ष–डॉ. राहुल भगत यांच्या हस्ते स्मृती चिन्ह व प्रमाणपत्रांचे वितरण करून सोहळा संपन्न झाला. बक्षीस वितरणचे उत्कृष्ट संचालन डॉ. राहुल भगत यांनी तर डॉ. दीपक पवार यांनी आभार व्यक्त केले.

अहवाल लेखन – डॉ. दिपक पवार, सचिव, मसप

मराठी समाजशास्त्र परिषदेच्या सुरूवातीपासून ते आजपर्यंतचा आढावा घेण्याचा प्रयत्न सदर लेखात घेण्यात आला आहे. या लेखासाठी मराठी समाजशास्त्र परिषदेच्या सर्व सदस्यांना व्हॉटसॲप, इमेल व प्रत्यक्ष मोबाईलवर संपर्क साधून त्यांच्याकडे परिषदेविषयी असलेली माहिती पाठविण्याची विनंती करण्यात आली होती. परंतु याकामी फारच मोजक्या सदस्यांनी प्रतिसाद दिला. त्यात प्रामुख्याने नागपूर चे डॉ. प्रदीप आगलावे, डॉ. सरोज आगलावे, डॉ. दिपक पवार, रत्नागिरीचे डॉ. शिवाजी उकरांडे, जालन्याचे प्रा. प्रियदर्शन भवरे, लातूर चे डॉ. श्रीकांत गायकवाड, औसा चे प्रा. वैजनाथ मलशेटट्टे या मोजक्या सदस्यांचा समावेश आहे. या मान्यवरांनी पाठविलेले समाजशास्त्र संशोधन पत्रिकेचे अंक या लेखासाठी अत्यंत उपयोगी पडलेत त्यासाठी या मान्यवरांचे हार्दिक आभार. प्रस्तुत लेखातील सर्व माहिती त्या–त्या वेळी प्रकाशित झालेल्या संशोधन पत्रिकेतून जशीच्या तशी घेण्यात आलेली आहे.

डॉ. राहुल भगत,
संपादक, मराठी समाजशास्त्र परिषद व्यक्ती परिचय ग्रंथ.

मराठी समाजशास्त्र परिषदेच्या समाजशास्त्र संशोधन पत्रिकेचा प्रवास : १९८७ ते २०२०

मराठी समाजशास्त्र परिषदेच्या पुणे येथील चवथ्या अधिवेशनात 'समाजशास्त्र संशोधन पत्रिका' प्रकाशित करावी असे मराठी समाजशास्त्र परिषदेने ठरविले होते. मराठी मध्ये समाजशास्त्रावरील दर्जेदार ग्रंथ व लेख निर्माण होणे आवश्यक आहे. मराठीमध्ये दर्जेदार समाजशास्त्रीय साहित्य उपलब्ध नसल्यामुळे अडचणी निर्माण होत आहेत. मराठीतून उत्कृष्ट समाजशास्त्रीय साहित्य निर्माण करण्यात मराठी समाजशास्त्र परिषदेचा पुढाकार आणि सक्रिय सहभाग असावा या उद्देशाने परिषदेच्या स्थापनेच्या अवघ्या चार वर्षानंतरच डॉ. सुधा काळदाते यांच्या अध्यक्षपदाच्या कालावधीत डॉ. वि. वि. देशपांडे यांनी १९८७ मध्ये समाजशास्त्र संशोधन पत्रिकेचा पहिला अंक प्रकाशित केला आणि तेंव्हापासून मराठी समाजशास्त्र परिषद 'संशोधन पत्रिका' चा अंक नियमितपणे प्रकाशित करीत आहे. १९८७ पासून 'समाजशास्त्र संशोधन पत्रिका' चे विविध अंक, मुख्य संपादक, कार्यकारी संपादक, संपादक मंडळ, सल्लागार मंडळ, प्रकाशन स्थळ व त्या–त्या अंकात प्रकाशित झालेल्या लेखांची सूची इथे देण्याचा प्रयत्न करीत आहे. 'समाजशास्त्र संशोधन पत्रिका' चा इतिहास लिहीतांना परिषदेच्या सदस्यांकडून त्या–त्या काळात प्रकाशित झालेले संशोधन पत्रिकेचे अंक यासाठी संदर्भ म्हणून उपयोगात आणले आहेत.

वर्ष १ ले, अंक १ ला, डिसेंबर १९८७ :– **संपादक मंडळ** – डॉ. वि. वि. देशपांडे, डॉ. सौ. सुधा काळदाते, डॉ. द. ना. धनागरे, डॉ. पु. ल. भांडारकर, डॉ. रा. भी. बिलावर. **संपादकीय सल्लागार मंडळ** – डॉ. विलास संगवे, डॉ. मा. गु. कुलकर्णी, डॉ. टी. एन. वाळुंजकर, डॉ. बा. आ. बावीस्कर, डॉ. सि. पु. पुनाळेकर, डॉ. सौ. मिना दुबे, डॉ. व. भा. दामले. **प्रकाशन स्थळ** – समाजशास्त्र परिषद, द्वारा, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

मराठी समाजशास्त्र परिषदेच्या या पहिल्या संशोधन पत्रिकेत डॉ. मा. गु. कुलकर्णी यांचा 'महाराष्ट्रातील समाजशास्त्रांचा विकास', डॉ. द. ना. धनागरे यांचा 'शेतकरी संघटना आणि पक्षीय राजकारण', डॉ. य. मा. दामले यांचा 'सामाजिक संरचनेचे 'एक चळवळ' या दृष्टीने विवेचन', डॉ. विलास संगवे यांचा 'महाराष्ट्रातील धार्मिक चळवळी' हे संशोधनात्मक निबंध प्रकाशित करण्यात आले होते. तसेच डॉ. उत्तम भोईटे यांनी 'डॉ. रावसाहेब कसबे यांच्या 'आंबेडकर व मार्क्स' या ग्रंथाचे केलेले परीक्षण, डॉ. रा. भी. बिलावल यांनी एम. के. प्रेमी, ए. रमणम्मा आणि उशा बंबावाले यांनी लिहीलेल्या 'सामाजिक लोकसंख्याशास्त्र' या ग्रंथाचे केलेले समीक्षण, आणि डॉ. बा. ल. जोशी यांनी लेखक एम. एस. ए. राव यांच्या 'सोशल मुव्हमेंटस् इन इंडिया' या ग्रंथाचे केलेले परीक्षण प्रकाशित करण्यात आले आहे. संशोधन पत्रिकेच्या या पहिल्या अंकात मराठी समाजशास्त्र परिषदेची घटना सुध्दा प्रकाशित केली होती.

वर्ष २ रे, अंक २ रा, डिसेंबर, १९८८ :– **संपादक मंडळ** – डॉ. द. ना. धनागरे, डॉ. उत्तम भोईटे, प्रा. सु. दा. मोरे, डॉ. वि. वि. देशपांडे, डॉ. पु. ल. भांडारकर. **संपादकीय सल्लागार मंडळ** – डॉ. सुधा काळदाते, डॉ. य. भा. दामले, प्रा. सतीश पुनाळेकर, प्रा. प्रकाश पिंपळे, डॉ. सुमा चिटणीस, डॉ. श. नी. पवार. **प्रकाशन स्थळ** – मराठी समाजशास्त्र परिषद, द्वारा, समाजशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे.

संशोधन पत्रिकेच्या या दुसऱ्या अंकात अनेक मान्यवरांचे शोधनिबंध व लेख प्रकाशित करण्यात आले होते. त्यात प्रामुख्याने प्रा. लीला दुबे यांचा 'सामाजिक शास्त्रांपुढील एतदद्देशीकरणाचे आव्हान–काही विचार', प्रा. बा. श्री. बाविस्कर यांचा, 'ग्रामीण महाराष्ट्रातील कॉंग्रेसमधील गटबाजी – संघर्ष आणि पेचप्रसंग', डॉ. सि. ना. पुनाळेकर यांचा 'अस्मिता आणि जाणिवा – महाराष्ट्रातील दलित साहित्याचा एक आढावा', डॉ. त्रि. ना. वाळुंजकर यांचा 'डॉ. इरावती कर्वे यांचे जातिसंस्थेवरील विचार', प्रा. वि. वि. देशपांडे यांचा 'महाराष्ट्रातील आर्थिक विकास – स्वरूप आणि समस्या', प्रा. वि. कृ. जोशी यांनी केलेले 'महाराष्ट्रातील जातिसंस्था विषयक विचार' या ग्रंथाचे केलेले परीक्षण व प्रा. सुनिता पंधे गुप्ता यांनी 'पर्यावरण, विकास प्रक्रिया आणि स्त्रियांच्या अस्तित्वाचा प्रश्न' या ग्रंथाचे केलेले परीक्षण समाविष्ट आहे.

या नंतर ५ वर्षापर्यंत समाजशास्त्र संशोधन पत्रिकेचा अंक आर्थिक अडचणीमूळे प्रकाशित होऊ शकला नाही. डॉ. एस. एन. पवार यांच्या अध्यक्षीय कारकीर्दीत संशोधन पत्रिकेचा ३ रा अंक प्रकाशित झाला. या अंकात डॉ. पवार यांनी संशोधन पत्रिकेचा अंक नियमित प्रकाशित व्हावा यासाठी सभासदांना देणगी देण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत डॉ. सुधाताई काळदाते यांनी रू. ३००० ची देणगी संशोधन पत्रिकेसाठी दिली होती. तसेच प्रा. मच्छिद्रं सकटे, कोल्हापूर. प्रा. पांडुरंग साळुंखे, इस्लामपूर. मा. वसंतराव देशमुख, पिशोर. डॉ. पी. के. कुलकर्णी, उद्गीर. प्राचार्य डॉ. बी. के. खडसे, वर्धा. डॉ. शेख शब्बीर, नागपूर. प्रा. सी. टी. कांबळे, नांदेड. प्रा. डी. जी. गुडधे, अमरावती. डॉ. स्मिता अवचार, औरंगाबाद. प्रा. एस. टी. मुळे, वसमतनगर. डॉ. शुभांगी गोटे, औरंगाबाद. डॉ. रूक्मिणी नाईक, आंबेजोगाई. प्रा. टी. एस. थोरात, कोल्हापूर. डॉ. व्ही. व्ही. देशपांडे, औरंगाबाद. कु. ज्योती दतात्रय रेळकर, ठाणे. मा. इनामदार बंधू, कराड यांनी प्रत्येकी रू. १०० ची देणगी संशोधन पत्रिकेसाठी दिली होती. (संदर्भ:समाजशास्त्र संशोधन पत्रिका, अंक चवथा, १९९५.)

वर्ष ३ रे, अंक ३ रा, डिसेंबर, १९८९ प्रकाशित नोव्हेंबर १९९४:– संपादक मंडळ – डॉ. रा. भू. पाटील, डॉ. श. नि. पवार, डॉ. स. आ. साळुंखे, डॉ. अ. उ. भोईटे, प्रा. वि. वि. देशपांडे. **संपादकीय सल्लागार मंडळ** – डॉ. विलास संगवे, प्रा. एस. पी. पुनाळेकर, डॉ. बा. श्री. बावीसकर, डॉ. उत्तमराव भोईटे, डॉ. सुधा काळदाते, प्रा. शरयु अनंतराम. **प्रकाशन स्थळ** – समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

संशोधन पत्रिकेच्या या तिसऱ्या अंकामध्ये डॉ. श. नि. पवार यांचा 'भारतीय समाजशास्त्राचे जनक : प्राध्यापक गोविंद सदाशिव

घुर्ये', प्रा. एस. पी. पुनाळेकर यांचा 'आत्मकथन आणि समाजदर्शन :दलित आत्मचरित्रांचा एक अभ्यास', गोपाळ गुरू यांचा 'दलित चळवळीचे समाजशास्त्रातील विश्लेषण', प्रा. शब्बीर शेख यांचा 'आंबेडकरपूर्वकालीन महाराष्ट्रातील दलित चळवळ', उत्तरा शास्त्री यांचा 'डॉ. आंबेडकरांचे नेतृत्व व दलित वर्ग', प्रा. रमेश कांबळे यांनी 'पी. जी. जोगदंड यांच्या 'दलित मुव्हमेंट इन महाराष्ट्र' या ग्रंथाचे केलेले समीक्षण, तसेच प्रा. एस. पी. पुनाळेकर यांनी छाया दातार यांच्या 'द स्टगल अगेन्स्ट व्हायोलन्स' या ग्रंथाचे केलेले समीक्षण समाविष्ट आहे.

प्रस्तुत अंक १९९४ मध्ये म्हणजेच पाच वर्षाच्या विलंबाने प्रकाशित झाला. संशोधन पत्रिकेच्या अंक प्रकाशनासंदर्भात पडलेल्या पाच वर्षाच्या खंडासंदर्भात तिसऱ्या अंकाचे संपादक प्रा. राजेन्द्र पाटील 'तिसऱ्या अंकाच्या निमित्ताने....' या संपादकीय मध्ये असे लिहितात की, 'आत्तापर्यंत समाजशास्त्र संशोधन पत्रिकेचा पहिला अंक डिसेंबर ८७ मध्ये औरंगाबादहून आणि दुसरा अंक डिसेंबर ८८ मध्ये पुण्याहून प्रकाशित झाला. त्यानंतर पाच वर्षाच्या अंतराने हा तिसरा अंक कोल्हापूरहून प्रकाशित होत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेषांक पुण्याहून प्रकशित करण्याचे अर्जुननगरच्या नोव्हेंबर १९९१ च्या अधिवेशनामध्ये ठरले होते. परंतु काही अपरिहार्य कारणामुळे हा अंक पुण्याहून प्रकाशित होऊ शकला नाही. परिषदेचे कार्यालय कोल्हापूरला आल्यानंतर आम्ही या अंकात प्रसिध्द करण्यासाठी लागणाऱ्या संशोधनपर लेखांची जुळवाजुळव करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. या प्रयत्नामध्ये प्रसिध्द करण्याजोगे एक–दोनच लेख हाती लागले. म्हणून 'दलित समूह आणि दलित समस्या' या व्यापक विषयावर अंक काढण्याचे ठरविले आणि त्याचे फलित म्हणून हा अंक प्रकाशित होत आहे. हा अंक प्राध्यापक जी. एस. घुर्ये यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या चिरंतन स्मृतीस अर्पण करण्यात येत आहे. अंकाच्या प्रकाशनामध्ये सातत्य नसण्याची काही कारणे इथे नमूद करणे आवश्यक आहे. एक म्हणजे परिषदेचे कार्यालय दर दोन वर्षानी स्थलांतरीत होते. या प्रक्रियेमध्ये अंकाच्या प्रकाशनासाठी विलंब होतो. दुसरे असे की, अंकामध्ये सातत्य नसल्याने प्राध्यापक आपले संशोधनपर साहित्य परिषदेकडे पाठवत नाहीत आणि साहित्य उपलब्ध नाही म्हणून अंक प्रकाशित होत नाही, हे दृश्टचक्र सोडविणे आवश्यक आहे. तिसरे म्हणजे अंकाच्या प्रकाशनासाठीचा खर्च जाहिराती मिळवून करणे ही देखील एक अडचणीची बाब आहे. या सर्व अडचणींवर मात करून अंक प्रकाशित करणे ही अवघड बाब बनत चालली आहे.'

वर्ष ४ थे, अंक ४ था, डिसेंबर, १९९०, प्रकाशित १९९५:– कार्यकारी संपादक – डॉ. राजेंद्र पाटील. १९९० ते १९९४ या चार वर्षाच्या कालावधीत आर्थिक अडचणीमुळे समाजशास्त्र संशोधन पत्रिकेचे अंक प्रकाशित होऊ शकले नाही. त्यामुळे १९९० चा अंक १९९४ मध्ये प्रकाशित करण्यात आला. हा अंक प्रा. ए. आर. देसाई यांच्या स्मृतीस अर्पण करण्यात आला होता. या अंकाचे मनोगत लिहीतांना डॉ. आर. बी. पाटील यांनी असे म्हटले की, 'दलित समूह आणि दलित समस्या या विषयावरील हा अंक नोव्हेंबर ९४ नंतर अपेक्षेपेक्षा अधिक विलंबाने प्रकाशित होत आहे. नोव्हेंबर ९४ मधील तिसरा अंक व डिसेंबर ९४ मधील चौथा अंक असे दोन्ही अंक डिसेंबरमध्ये आजीव सदस्यांना पोस्टाने पाठवून द्यावयाचे असे नियोजन केलेले होते. परंतु आमच्या नियंत्रणबाहय घटकांमुळे ते प्रत्यक्षात अंमलात येऊ शकले नाही याबदद्ल दिलगिरी व्यक्त करतो.' या अंकाच्या छपाईसाठी लागणारा खर्च उभा करणे मोठे जिकीरीचे काम होते त्यासाठी डॉ. आर. बी. पाटील यांनी आजीव सदस्यांना अंक छपाईसाठी देणगी देण्याचे आवाहन केले होते.

संशोधन पत्रिकेच्या या चवथ्या अंकामध्ये प्रा. एस. पी. पुनाळेकर यांचा 'प्रा. ए. आर. देसाई: मानवतावादी विद्वत्तेचा वारसा–एक चिंतन', डॉ. गोविंद गारे यांचा 'आदिवासी विकासाची सैध्दांतिक भूमिका, संस्कृती संघर्ष, शिक्षण आणि परिवर्तनाची दिशा', डॉ. प्रल्हाद जोगदंड यांचा 'महाराष्ट्रातील दलितांच्या समस्या', प्रा. शंकर गायकवाड यांचा 'संरक्षित भेदभाव धोरणाने काय साधले? दलित जातीच्या समस्यावर एक दृष्टिक्षेप', डॉ. भा. कि. खडसे यांचा 'मांग जातीतील सामाजिक परिवर्तन', प्रा. दा. धो. काचोळे यांचा 'मांगाचे सामाजिक जीवन', प्रा. प्रकाश बोबडे यांनी शेख शब्बीर यांच्या 'मुस्लिम्स ॲड फॅमिली प्लॅनिंग' या ग्रंथाचे केलेले परीक्षण समाविष्ट आहे..

वर्ष पाचवे, अंक ५ वा, डिसेंबर, १९९१, प्रकाशित मार्च १९९६:– संपादक मंडळ : डॉ. राजेंन्द्र भू. पाटील, डॉ. श. नि. पवार, डॉ. सर्जेराव साळुंखे, डॉ. अ. उ. भोईटे, डॉ. वि. वि. देशपांडे. **संपादक सल्लागार मंडळ :–** डॉ. विलास संगवे, प्रा. एस. पी. पुनाळेकर, प्रा. बा. श्रा. बावीस्कर, डॉ. उत्तमराव भोईटे, डॉ. सुधा काळे, प्रा. शरयु अनंतराम. **प्रकाशन स्थळ** :– शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

मराठी समाजशास्त्र परिषदेच्या समाजशास्त्र संशोधन पत्रिकेचा ५ अंक जळगांव येथील कार्यकारी मंडळाच्या बैठकीतील निर्णयानुसार 'प्रबंध परिचय अंक' म्हणून १९९६ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. या अंकात महाराष्ट्रातील सर्व पीएच. डी. पदवीधारकांनी आपल्या पीएच. डी. संशोधनावर आधारित लेख पाठवून आपल्या संशोधनाची ओळख वाचकांना करून दिली. तसेच या अंकात कुलगुरू डॉ. द. ना. धनागरे यांचा स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमालेत, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे येथे झालेल्या व्याख्यानावर आधारित लेखाचा तसेच कुलगुरू डॉ. उत्तमराव भोईटे यांचा वसमतनगर अधिवेशनातील अध्यक्षीय अभिभाषणांवर आधारित लेखाचा समावेश केला आहे.

संशोधन पत्रिकेच्या पाचव्या अंकाच्या मनोगतात संपादक डॉ. राजेंद्र पाटील यांचे मनोगत समाजशास्त्र परिषदेच्या सर्वच सदस्यांना गंभीर विचार करायला लावणारे आहे. ते आपल्या मनोगतात म्हणतात, 'मसप च्या आजीव सदस्यांना तसेच समाजशास्त्रात पीएच. डी. पदवी प्राप्त केलेल्या महाराष्ट्रातील इतरांना पत्रिकेच्या अंकाद्वारे, पत्राद्वारे, व्यक्तीश: विनंती करण्यात आली. परंतु प्रतिसाद उत्साहजनक मिळाला नाही. एकूण २७ प्रबंध परिचयात्मक लेख या अंकात समाविष्ट करावे लागले. या अंकाच्या लेखकांच्या यादीवरून एक दृष्टिक्षेप टाकला तर एक गोष्ट नजरेत भरेल ती म्हणजे जे मसप चे आजीव सदस्य नाहीत, जे अध्यापन, संशोधन क्षेत्रात कार्यरत नाहीत, अशांनी

आपले लेख पाठविले. परंतु आजीव सदस्यांनी जी उदासिनता दर्शविली, ती निराशाजनक आहे.' डॉ. पाटील यांचे हे मत आजही आजीव सदस्यांना तंतोतंत लागू पडते.

